# अजिंठा

## मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव

## नियतकालिक १९८६-८७



विद्यार्थी प्रतिनिधी

१) श्री. वि. ह. पाटील

२) श्री. हे. सो. पाटील

३) कु. विनीता दि. महाजन

प्रमुख संपादक

प्रा. राजा महाजन




## मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव


LIBRARY RECEIVED
Date........
Signature........
LIBRARY RECEIVED
Date 29/11/88
Signature


# अजिंठा

KNOWLEDGE IS POWER

## नियतकालिक

१९८६-८७

# 'अ जिं ठा'

## : संपादक मंडळ :

### १९८६–८७

| | |
|---|---|
| द. स. नेमाडे | प्राचार्य |
| दि. ह. महाजन | उपप्राचार्य |
| मु. के. येवले | उपप्राचार्य |
| प्रा. राजा महाजन | ( प्रमुख संपादक ) |
| प्रा. श्री. र. याज्ञिक | |
| प्रा. डॉ. सौ. प्रमिला भिरूड | |
| प्रा. श. मु. छापेकर | |
| प्रा. ना. द. पाटील | |
| प्रा. शा. न. पाटील | |
| प्रा. अरविंद पाटील | |
| प्रा. अकबर रेहमानी | |
| श्री. वि. ह. पाटील | ( विद्यार्थी प्रतिनिधी ) |
| श्री. हे. सो. पाटील | ( विद्यार्थी प्रतिनिधी ) |
| कु. विनीता महाजन | ( विद्यार्थी प्रतिनिधी ) |

प्रकाशक :
प्रा. राजा महाजन
मू. जे. महाविद्यालय
जळगाव.

मुद्रक :
सुभाष के. चौधरी
श्रीकान्त मुद्रणालय,
१७४, बळीराम पेठ, जळगाव

# संपादकीय

ऋतुऋतूंचे चक्र क्रमाने
नवे जुने नित फुलवित जाते
निर्माल्यासह नव्या कळयांचे
सुगंध–सुंदर जीवन घडते !

**हा अंक –**

१९८६–८७ या शैक्षणिक वर्षात प्रकाशित होत असलेले हे आमचे अजिंठा नियतकालिक!

विद्यार्थ्यांच्या अंगी असलेले सुप्त लेखन–गुण विकसित व्हावेत, त्यांना शब्दरूपाने प्रकाशनाचे व्यासपीठ मिळावे, तसेच महा–विद्यालयाची वाटचाल, विकास, विविध गुणसंपन्न उपक्रम, कार्यक्रम, शैक्षणिक तसेच विविधांगी प्रगती इ. सर्व गोष्टी सर्व विद्या–र्थ्यांसमोर, समाजासमोर एकत्र सादर व्हाव्यात यादृष्टीने महाविद्यालयाचा हा एक आवश्यक आणि प्रगतिशील उपक्रम असतो. या अंकात आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी विविध प्रकारांतील गुणसंपन्न लेखन इंग्रजी, मराठी, हिंदी, उर्दू या भाषांतून सादर केलेले आहे, असे दिसून येईल. मात्र विद्यार्थ्यांनी लेखन करताना–

जैसा का मातीचा स्वभाव ।
तैसी कोंभाची लवलव ।
वरी सुगंधाचा जीव । भ्रमर जाणे ।।

ही भूमिका सतत अंगिकारली पाहिजे असे सुचवावेसे वाटते.

१९८६–८७ या वर्षात आमच्या महा–विद्यालयात विविध मंडळांद्वारे आयोजित केलेल्या कार्यक्रमांसंबंधीचे सविस्तर अहवाल या अंकात दिलेले आहेत. त्यावरून अध्ययन, अध्यापन, चाचणी, परीक्षा याबरोबरच किती विविध प्रकारचे उपक्रम, कार्यक्रम आमच्या महाविद्यालयात होत असतात हे दिसून येते. विद्यार्थ्यांच्या विविध गुणांना अशा कार्यक्रमांतून संधी मिळून त्यांच्या सर्वांगिण विकासाचा आलेख या अहवालांवरून दिसून येतो. दर–वर्षाप्रमाणे याही वर्षात आमच्या महाविद्या–लयातील विद्यार्थ्यांनी अभ्यास, क्रीडा, नाटच, वक्तृत्व, संगीत, कथाकथन, लेखनस्पर्धा आदि विविध क्षेत्रांत विशेष नैपुण्य संपादन करून महाविद्यालयाच्या यशस्वी, भरीव, समृध्द परंपरेत मोलाची भर घातल्याचे दिसून येईल.

**पुरुषोत्तम करंडक :–**

या वर्षी आमच्या महाविद्यालयातील गुणी विद्यार्थ्यांनी मिळविलेले अपूर्व, अद्वितीय यश म्हणजे 'पुरुषोत्तम करंडक'! नाटचक्षेत्रात 'पुरुषोत्तम करंडक' ही आतापर्यंत बहुतेक पूणे, मुंबई–कडील विद्यार्थी,–कलावंतांची

मक्तेदारी मानली जात होती. यावर्षी आपल्या सरस, संपन्न, समर्थ नाटचगुणांच्या आविष्कारांनी हा 'पुरूषोत्तम करंडक' मिळवून आमच्या विद्यार्थ्यांनी या कलाक्षेत्रातही 'हम किसीसे कम नही' हा अभिमानास्पद कर्तुत्त्व-गौरव सिद्ध केला आहे. याबरोबरच इतर स्पर्धांतूनही आमच्या विद्यार्थी-कलावंतांनी असेच नेत्रदीपक असामान्य यश मिळविले आहे. या विद्यार्थी–कलावंतांचे आणि त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या प्राध्यापकांचे खास त्रिवार हार्दिक अभिनंदन! अभिनंदन ! अभिनंदन ! आगे बढो !

**सन्माननीयांच्या भेटी :–**

आमच्या महाविद्यालयातील विविध मंड–ळांच्या वतीने वेळोवेळी आगळेवेगळे कार्यक्रम आयोजित केले जातात. त्यानिमित्त मान्यवर, ख्यातनाम व्यक्तींना आमंत्रित केले जाते. आमच्या महाविद्यालयातील शैक्षणिक, सांस्कृ-तिक, क्रीडा–विषयक तसेच विकासशील वातावरण, कार्य पाहून या व्यक्ती गौरवोद्गार व्यक्त करतात. त्यामुळे आम्हास ही त्यापासून प्रेरणा लाभून आमचा उत्साह वाढतो. यावर्षी आमच्या महाविद्यालयास पुढील प्रमाणे सन्माननीय व्यक्तींनी भेटी दिलेल्या आहेत– ग्रुपकमांडर कर्नल सतनामसिंग; असि. कमांडर एन. सी. सी. चे उन्नी कृष्णन; एन. सी सी. चे महाराष्ट्राचे डायरेक्टर ब्रिगेडियर आय. जी. एस्. बक; डॉ. सु. वा. देशपांडे, पुणे; डॉ. प्र. र. करमरकर; डॉ. एस्. सी. गुप्ते; डॉ. जावळे, जळगाव; डॉ. सौ. अरुणा वानखेडे, जळगाव; डॉ. सौ. अरूणा पाटील; डॉ. अविनाश आचार्य, जळगाव; प्रा. म. मो. केळकर, जळगाव; डॉ. विवेक खटावकर, जळगाव; सौ. शारदा मुदलियार, जळगाव; श्री. हेमंत गोखले, जळगाव; श्री. भैय्या उपासनी, जळगाव; श्री. गोपाळ आवटी, जळगाव; श्री. दत्ता सरदेशमुख, जळगाव; श्री. व सौ. कांबळे, जळगाव.

**नवीन नेमणूका :–**

या वर्षी पुढीलप्रमाणे नवीन प्राध्यापकांच्या नेमणूका करण्यात आल्या –

**ज्येष्ठ विभाग :–**

प्रा. जी. डी. तळेले, प्रा. एस्. बी. लोहार, प्रा. एस्. डी. कुळकर्णी, प्रा. एस्. के. भोळे, प्रा. पी. आर. चौधरी, प्रा. मिस डी. एस्. चौधरी, प्रा. एस्. डी. महाजन, प्रा. मिस पी. व्ही. पेठे, प्रा. ओ. एच्. महाजन, प्रा. एस्. एम्. कोरान्ने, प्रा. डी. पी. पाटील, प्रा. ए. जे. चौधरी, प्रा. एस्. एन्. भारंबे

**कनिष्ठ विभाग –**

प्रा. एल्. एम्. पाटील,
प्रा. मिस. डी. के. चौधरी

**कार्यालय –**

श्री आर. बी. सरोदे, श्री. बी. डी बरेला, श्री. इ. के. पाटील, श्री. एस्. बी. अत्तरदे, श्री. आर. डी. इंगळे, श्री. व्ही. जी. पाटील, श्री. एच्. के. सरोटे, श्री. एस्. जी. गिते, श्री. एन्. आर. तायडे, श्री. टी. एम्. धांडे, वरील सर्व प्राध्यापक व कर्मचारी आपल्या महाविद्यालयाच्या समृध्द परंपरेत आपल्या विधायक, गुणसंपन्न कर्तृत्वाने भर घालतील असा विश्वास व अपेक्षा आहे.

तसेच पुढीलप्रमाणे प्राध्यापक, कर्मचारी निवृत्तीमुळे वा अन्य कारणांमुळे महाविद्यालय सोडून गेले आहेत.

**ज्येष्ठ विभाग :–**

प्रा. शाम देशपांडे (एम्. बी. ए. विभागाचे संचालक म्हणून नियुक्ती), प्रा. सौ. एस्. एस्. चांदोरकर, प्रा. एम्. एल्. पाटील (मृत)

**कार्यालय :–**

श्री. पी. टी. जगताप (निवृत्त) श्री. एम्. बी. शुक्ल (निवृत्त) श्री. टी. डी. ठाकरे (निवृत्त), श्री. बी. एच्. घाटे, श्री. डी. एल्. बावसकर, श्री. एम्. एम्. राठोड, श्री. एम्. ए. पटवारी (मृत)

प्रा. एस्. बी. लोहार आणि प्रा सौ. आर. टी. अत्तरदे यांची ज्येष्ठ विभागात पदोन्नती करण्यात आली.

सर्वश्री पी. टी. जगताप, एम्. बी. शुक्ल, टी. डी. ठाकरे हे महाविद्यालयाच्या दीर्घ सेवेनंतर निवृत्त झाले आहेत. त्यांचा कार्य–कुशलता, मनमिळावू स्वभाव, सेवातत्पर वृत्ती, संस्थेबद्दलची आस्था या गुणवैशिष्टचांमुळे त्यांची आम्हाला सदैव आठवण राहील.

ग्रंथालयातील एक सेवक श्री. एम्. ए. पटवारी यांचे अकाली, अकल्पित अपघाती निधन झाले. कै. पटवारी स्वभावाने सालस, प्रेमळ, सेवाशील सेवक होते. त्यांच्या अकाली निधनाने त्यांच्या कुटुंबियांची तसेच संस्थेचीही हानी झाली आहे. आमचे एक सहकारी प्रा एम्. एल्. पाटील यांचे अकाली निधन झाले. त्यांच्या निधनाने आम्ही एका विद्यार्थी-प्रिय, प्रेमळ, अभ्यासू, गुणी सहकाऱ्याला मुकलो आहोत. त्यांच्या अकाली निधनाने त्यांच्या कुटुंबियांची आणि संस्थेचीही हानी झाली आहे.

**महाविद्यालयाचा विकास :–**

आमच्या महाविद्यालयात आता एम. ए., एम. एस्सी., एम. कॉम. पर्यन्त जवळ जवळ सर्वच विषयांचे अभ्यासक्रम सुरू झाले आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांची चांगली सोय होऊन त्यांना उच्च शिक्षण संपादनाची पूर्ण संधी उपलब्ध झाली आहे. काही विषयात तर पी. एच. डी. साठीही मार्गदर्शन मिळण्याची सोय झाली आहे. विद्यार्थी या संधीचा अधिकाधिक लाभ घेतील असा विश्वास व्यक्त करायला हरकत नाही.

आमच्या महाविद्यालयातील प्राध्यापक अध्यापनकार्याबरोबरच गुणवत्ता विकासाच्या दृष्टीने सतत प्रयत्नशील असतात. ते सदैव आपला व्यासंग, अध्ययन–अध्यापन–कार्य विकसित करीत असतात.

प्रा. पी. जी. अभ्यंकर, प्रा. एस्. एम्. छापेकर, प्रा. सौ. चारुता गोखले यांनी उच्च श्रेणीत एम्. फिल् पदवी संपादन केली आहे. प्रा. एस्. एम्. जावळे यांनी एम्. फील्. पदवी संपादन करून आपले शोध निबंध राष्ट्रीय तसेच आंतर राष्ट्रीय पातळीवरील नियत–कालिकातून प्रकाशित केले आहेत.

प्रा. ज. वि. महाजन, प्रा. एम्. डी. बोंडे यांची जळगाव आकाशवाणी केंद्राच्या कार्यक्रम सल्लागार समितीवर सभासद म्हणून सन्मा–ननीय नियुक्ती झाली आहे

तसेच अन्य प्राध्यापक बंधु-भगिनीही आपापल्या विषयांशी संबंधित असे समीक्षात्मक लेखन, चर्चासत्रास उपस्थिती, परिषद-संमेलनात सक्रीय सहभाग- याप्रमाणे कार्य करीत असतात.

या सर्व प्राध्यापकांचे हार्दिक अभिनंदन !

**आभार :-**

'अजिंठा' नियतकालिक प्रकाशित करण्यासाठी अनेकांचे परिश्रम सहाय्यभूत झालेले असतात. त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे हे आमचे परमकर्तव्य ठरते.

विद्यार्थी-विद्यार्थिनी यांनी दिलेले लेखन सहाय्य नेहमीच अभिनंदनास्पद असते.

मनोहर प्रोसेस स्टुडिओचे संचालक श्री. पुणेकर यांचेही सहाय्य लाभलेले आहे.

'अजिंठा' छपाईची जबाबदारी श्रीकांत मुद्रणालयाचे मालक श्री. सुभाष चौधरी यांनी छपाईचे कामात मनःपूर्वक लक्ष घालून उत्तम रीतीने पार पाडली आहे. श्रीकांत मुद्रणालयातील सर्व कर्मचारी यांनीही अंक जास्तीत जास्त सुबक, आकर्षक रूपात छापून दिला आहे.

जाहिरातदार नेहमी आपल्या जाहिराती देऊन सहकार्य करीत असतात.

महाविद्यालयातील कर्मचारी यांचेही सहाय्य लाभलेले आहे. माननीय प्राचार्य द. स. नेमाडे, उपप्राचार्य दि. ह. महाजन, उपप्राचार्य मु. के. येवले यांनीही वेळोवेळी मौलिक सूचना करून मार्गदर्शन केले आहे. प्रत्येक विभागाच्या संपादकांनी लेखन-निवडीचे जिकीरीचे काम चोखंदळपणे करून शक्यतो सर्व लेखन प्रकारांना न्याय दिला आहे.

श्री. विसपुते या विद्यार्थी कलावंताने मुखपृष्ठाचे देखणे अक्षरलेखन करून दिले आहे.

अन्य प्राध्यापक बंधु-भगिनी यांचेही वेळोवेळी सहाय्य लाभलेले आहे.

या सर्वांचे आम्ही अत्यंत हार्दिक आभारी आहोत. शेवटी विनंती एवढीच की —

न्यूनत्व न आणावे ध्यानी ।<br>
सद्‌गुणांची होवो वाखाणणी ।<br>
सद्‌भाव जागवू या मनी । मैत्रपणाचा ॥

— **प्रा. राजा महाजन**<br>
प्रमुख संपादक

# श्रध्दांजली



श्री. स्व यशवतराव रामदास पाटील<br>
चेअरमन<br>
खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटी जळगाव



पुरुषोत्तम करंडक



श्री कुलदीप पवार यांचे कडून
धनंजय राजहंस याचा सत्कार



पुरुषोत्तम करंडक प्राप्त 'बाळ जोशीला नक्की काय वाटतं'
या एकांकिकेचे यशस्वी दिग्दर्शक श्री नाना पाटेकर यांचे
हस्ते पुणे युवक केंद्रातर्फे - मानपत्र



नरेन्द्र तोरवणे
कथाकथन - जामनेर येथे कप व
वादविवाद - धरणगाव येथे ढाल कायमस्वरुपी

# पुरुषोत्तम करंडक प्राप्त करून देणारे व अभिनय क्षेत्रात नैपुण्य दाखविणारे कलावत


स्मिता उपासनी


कस्तुरी दातार


आरती वझे


मोहिनी नाशी


विनया साने


नितीन केकरे


उमेश कोतवाल


कौस्तुभ दातार


अनिल देशपांडे


प्रमोद बावीस्कर


शैलेश मुळे
आदमखोर अभिनय पारितोषिक


संदीप भिसे


संजय कथुरीया


शिवाजी चव्हाण


शशिकांत गुप्ते


संदीप मेहता


मनोज जोशी



राष्ट्रीय सेवा योजना दिनानिमित्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना श्री भागवतराव चौधरी


जरेन्द्र खडके
विद्यापीठ प्रतिनिधी


प्रौढ शिक्षण करीत एक मुका मुलगा फळयावर लिहितांना सोबत प्राचार्य डी. एस. नेमाडे व पुणे विद्यापीठ प्रौढ शिक्षण प्रकल्प अधिकारी श्री निवळीकर


विकास महाजन
पुणे विद्यापीठ बास्केट बॉल खेळाडू


सुरवड येथील हिवाळी शिबिरामध्ये खोदकामाची सुरूवात करतांना प्राचार्य डी. एस. नेमाडे


जयराज छपरीबंद
T.Y.B.A. उत्कृष्ट विद्यार्थी
१९८६/८७



राष्ट्रीय सेवा योजनेच्या तुरखेडे येथील श्रमशिबीरात श्रमदान करतांना विद्यार्थी



सलीम आय तडवी
पुणे विद्यापीठाचा हॉकी सेक्रेटरी, अखिल भारतीय पातळीवरील खेळाडू



राष्ट्रीय सेवा योजना कार्यकारिणी



कदीरखान T.Y.B.A.
वेट लिफ्टिंगमध्ये पुणे विद्यापीठात पहिला



युवती सभा कार्यकारिणी



शेख अदील शेख तय्यब
F.Y.B.A.
पुणे विद्यापीठ कुस्ती संघातील खेळाडू

# ॥ मराठी विभाग ॥

# ☐ अनुक्रम

## ☐ कथा


आव्हान - मिलिंद कुळकर्णी १
हार - संगीता भागवत ११
सालदार - नरेन्द्र तोरवणे २१
बेटासे बाप सवाई - निवेदिता नेरकर ४५
जीवदान - प्रकाश बारी ५०
नियती - हरी काळे ५३
प्रायश्चित - मंजुषा चौधरी ५५


## ☐ कविता


कवींच्या कविता - रघुनाथ जंगले १७
समजतं पण - अनिल पाटील १७
व्यथा - विजय पाटील २७
मूडस् - सुभाष चौधरी ३१
भाग्यदेवतेस - प्रमोद पाटील ३५
प्रीत - विलास नारखेडे ३६
धुक्याची पहाट - सुनिता बाहेकर ३६
प्राक्तन - कल्पना जोशी ४२
जीवन - साधना नेमाडे ४२
एक स्वप्न - पी. डी. पाटील ४७
ज्वालामुखी - नितीन कुळकर्णी ५६


## ☐ एकांकिका


नळ आला रे आला - अरूण पाटील ३७


## ☐ लेख


* कला आणि जीवन । सी चिपळूणकर । ५
* दिवाकरांच्या नाट्यछटा । महेश संत । १३
* दुष्काळी स्थिती आणि ग्रामीण जीवन । निवृत्ती खडके । १९
* आम्ही तो जिंकला । धनंजय राजहंस । २५
* लोकसंख्या नियंत्रण काळाची एक गरज । सुरेश राणे । २९
* युवकांना आवाहन । विनिता महाजन । ३३
संदीप भिसे
* व्यवस्थापनातील स्त्रियांचा सहभाग । आरती तिवारी । ४३
* आजचा विद्यार्थी - एक चिंतन । विलास यशवंते । ४८


# आव्हान


मिलिंद कुळकर्णी
T. Y. B. Sc.


समीर पानसे. कॉलेजच्या शेवटच्या वर्षाला होता. नुकतीच सेमिस्टरची परीक्षा आटोपली. आणि एन. सी. सी. माऊंटेनेयरींग कॅम्पला तो १५ दिवसाकरिता गेला होता. माऊंटनिर्यरिंगमधलं कर्तृत्वात्वचं श्रेष्ठच होतं. त्यांच्या बटालीयन कॅप्टनला त्याचेबद्दल अभिमान होता. पण कॅप्टन रणबीरला वाईट याचं वाटत होतं की दोन चार कॅम्पस्, सैनिकी जीवनाचा परिचय — सहवास असूनही त्याला सैन्यात जावंस वाटत नव्हतं. कॅप्टन रणबीरने त्याच्या मनातली गोष्ट जाणण्याचा खूपच प्रयत्न केला. एकंदर समीरला एन सी. सी. म्हणजे एक एन्जॉयमेन्ट वाटत होती. वर्षातून दोन तीन कॅम्पस् अटेन्ड करायचे, तीन चार मेडल्स मिळवायची, प्राचार्यांकडून २६ जानेवारी- १५ ऑगस्टला शाबासकी मिळवायची. मित्रांवर जरब अन् वर्गातल्या मुलींच्या डोळयातला स्वतः बद्दलचा कौतुकाचा भाव, बस्स् ! यावरच तो समाधानी होता.

कॅप्टन रणबीरला नेमकं हेच नको होतं. सैन्यात जाण्याअगोदर या खडतर जीवनाचा थोडा अनुभव आणि आकर्षण वाटावं, सैन्यात आल्यावर तो एकदम बावचळू नये. कॉलेजजीवनातच राष्ट्रभक्तीचा संस्कार त्याचेवर घडविण्याचा रणबीरचा प्रयत्न होता. समीर तसा चांगला कॅडेट होता. रुंद बाहू, तगडं शरीर, तल्लख बुद्धी म्हणूनच कॅप्टन रणबीरला तो आवडायचा. सायकलवर सुटीच्या दिवशी - रविवारी तो समीरला फिरायला नेत असे. सैन्यातल्या गोष्टी त्याला सांगून त्याला घडवायचा प्रयत्न गेली तीन चार वर्ष कॅप्टन रणबीर करीत होता. पण त्याच्या प्रयत्नाला यश येत नव्हतं म्हणूनच काय करावं ? हा विचार त्याला पडला होता. समीरसारखा चांगला जवान गमवायला तो सहजासहजी तयार नव्हता. घरी दोन मोठे भाऊ कमवते असल्याने घरचाही प्रॉब्लेम नव्हता.

परवा नीलादीदीचं पत्र आलं, अन कॅप्टन रणबीरच्या डोक्यात एक कल्पना आली. समीर उद्या कॅम्पहून आला की सरळ त्याला नीलादीदीकडे दोन चार दिवस पाठवून द्यायचं. कर्नल विजय सक्सेनाची पत्नी नीलादीदी. धीरोदात्त बाई. बहात्तरच्या जंगमध्ये पती कामी आला. तरी बाई डगमगली नाही. समाजकार्याची मुळातच आवड असल्याने, सातपुडयाच्या तळाशी आदिवासींमध्ये रहायला गेली. तिथे आदिवासींच्या मुलांना शिकविण्याचे बिना सरकारी मदतीने प्रयत्न करतेय. कॅप्टन रणबीरला या कल्पनेनं आनंद झाला. बेटे समीर अब तू नही बचता! असं तो मनाशी म्हणाला.

कॅप्टन रणबीरचा निरोप मिळताच तो कॅप्टन रणबीरकडे जायला निघाला. या कॅप्टन रणबीरमुळेच केमेस्ट्रीचे दोन विषय त्याचे राहिले होते. तसे केमेस्ट्री आणि त्या रिॲक्शन्स, जाम डोकं उठायचं त्याचं. त्यामुळेच प्रिन्सिपलइलेक्ट्रॉनिक्स घेवून तो मोकळा झाला होता. B Sc. व्हायचं, लोकल इंडस्ट्रीत लागायचं- लग्न करायचं- घर बांधायचं- दोन-चार मुलं असावीत अस एकंदर संसाराचं चौकोनी चित्र त्यानं उभं केलं होतं. कॅप्टन रणबीर त्याला सैन्यात जायचं म्हणत होता. पण मुळातच त्याला सैन्यात

जायचं नव्हतं. परंतु सगळ्याच गोष्टी आपल्या मनासारख्या घडत नाहीत हे तो विसरला होता. कॅप्टन रणबीरला भेटून तो नीलादीदीकडे जाण्यासाठी म्हणून एस. टी ने निघाला.

एस. टी. ला ब्रेक लागला. कंडक्टरने त्याला उतरायला सांगितल त्याच्याबरोबरच कंडक्टरही उतरला. खाली उतरताच एकदम धूळ नाका-तोंडात गेली. पटकन् रूमाल काढून त्यानं नाक-तोंड साफ केल. रूमाल घडी करून पॅन्टमध्ये ठेवला महत्प्रयासाने तो आजूबाजूला पहायला लागला. सगळीकडे धुळीचा लोट. हातानं धळीतून वाट काढायचा केविलवाणा प्रयत्न करीत तो पुढे चालू लागला. थोडं चालल्यानंतर त्याला एक झोपडीवजा एस. टी. डेपो दिसला त्याच्या शेजारीच पानाची टपरी होती. टपरीच्यावर एक मोठं वडाच झाड असल्याने डेपोच्या ऑफिसात कोणी न बसता झाडाखालीच खुर्च्या-टेबल मांडून ऑफिस थाटलं होतं मघाचाच कंडक्टर पान टपरीवर सिगारेट ओढीत होता. इथल काहीच माहीत नसल्यानं त्यानं कंडक्टरलाच विचारायचं ठरवल. कॅप्टन रणबीरनं त्याला भट्टी कुठाय असं विचारायला सांगीतल होतं.

" कंडक्टर साहेब येथे भट्टी कुठाय?" घोगऱ्या आवाजात समीरने विचारलं.

काहीशा अविश्वासाच्या नजरेनं त्याने समीर कडे पाहीलं. आरामाने तोंडातून धूर सोडीत, खांद्याला हात लावीत, डोंगराच्या दिशेन त्याने बोट दाखविलं. " या पाय वाटनं खाली जा. तळ्याच्या शेजारीच भट्टी हाय " तो म्हणाला.

समीरने शबनम ठीक केली. कंडक्टरकडे चमत्कारिक नजरेनं पहातच त्यानं वाट धरली. सगळीकडे लहानमोठे दगड जमीनीतून वर आले होते. पायवाट अगदी अरुंद होती. एकच जण जाऊ शकेल एवढी. डोक्यावर सूर्य आला होता. वनराजीत आल्यानं एखादाच कवडसा दाट झाडीतून खाली





येत होता आता एकदम उतार आला आजुबाजूला मोठ्या आकाराची वाळू दिसायला लागली. उतरायला त्रास होऊ नये म्हणून त्याने पायातून बूट काढले. अन् हातात घेऊन अनवाणी पायानं चालू लागला. ओल्या वाळूच्या सुखद स्पर्शानं पायाला गुदगुल्या होत होत्या. समोर पाहीलं तर दोन मोठ्या चूलीवर मोठ हंडे ठेवले होते. एक निव्वळ धोतर नेसलेला आदिवासी त्या हंड्यातलं पाणी लाकडी काडीनं हलवत होता. त्याची दोन कच्ची बच्ची समोरच्या तळ्यात उतरून छोट छोटे मासे पकडण्याचा प्रयत्न करीत होती.

तो भट्टीजवळ आला. बूट खाली टाकले. पायात घातले. या त्याच्या कृतीन तो आदिवासी थोडा रागावल्यासारखा दिसला.

" नीला सक्सेना कुठं रहातात " समीरने अधीरतेने विचारले. त्या आदिवासीच्या डोळ्यातले रागाचे भाव जाऊन आश्चर्य तरळले.

समीरला आपली चूक कळली. लगेच कॅप्टन रणबीरचे शब्द त्याला आठवले. चेहऱ्यावर उसनं हसू आणत ' मास्तरीण बाई कुठे रहातात ' असं त्यानं विचारलं. मास्तरीण बाई म्हटल्याबरोबर त्याच्या चेहऱ्यावर आदराचे भाव पसरले.

त्याने तळ्यातल्या खेळत असलेल्या मुलीला हाक मारली अन् माझ्याबरोबर पाठवलं. थोडं चालल्यानंतर एक विटामातीचं घर दिसलं. असं घर बघून त्याला आश्चर्य वाटलं.

घर उघडंच होतं. दोन छोट्याशा खोल्या असाव्या. पहिल्या खोलीत भारतीय बैठक. भितीवर हरणाचं तोंड, सांबराचे शिंग वगैरे सगळं शहरी पद्धतीनं लावलं होत. समोर एका तगड्या लष्करी जवानाचा फोटो होता. त्याला ताजा हार चढवलेला दिसत होता. मनाशी आडाखे बांधीत तो दाराबाहेर पहात होता तोच मास्तरीण बाई आल्या.



" कोण ? समीर !'

हो ...... हो मावशी

घरगुती वातावरणानं प्रवासाचा एकंदर शीण कुठल्या कुठे पळाला.

समीर हातपाय धूवून घे, अन् जेवायला ये. नीलादीदीला त्यानं सांगितलं-की कॅप्टन रणबीरनं मुद्दाम त्यांच्या भेटीसाठी त्याला पाठविलं होतं. नीलादीदींनी त्याला थांबवून घेतल.

असेच दोन दिवस झाले. त्या गावातल्या तरुण पोरांबरोबर तो डोंगरातली देवी पाहून आला सगळा डोंगर फिरून आला त्यांचेबरोबर रात्री नृत्यात भाग घेतला. ढोल वाजवून बघितला. त्यांचेशी अगदी समरस झाला. तसा मिळून मिसळून रहायचा स्वभाव असल्याने त्याला कोणतीच अडचण भासली नाही.

पण कॅप्टन रणबीरने आपल्याला इकडे कां पाठवलं. असावं? याचं गूढ त्याला अजूनही उलगडत नव्हतं. बरं ह्या नीलादीदीची अन् त्याची ओळखही नव्हती. तिचा तो संस्कार वर्ग पहाण्यासाठी त्याला येथे पाठविलं होतं. खरंच मावशीचं वय अवघं चाळिशीच्या दरम्यान असेल. पण ही बाई सातपुड्याच्या पायथ्याशी येवून आदिवासींना, त्यांच्या मुलांना शिकवायचं काम करतेय. बरं, त्यातून काही मिळतं असंही नाही आदिवासीच आग्रहानं सरपणाची मोळी, मध हुरडा असं काही आणून देतात तेही ती नाही म्हणते पण आदिवासींना दुखवीत नाही. सगळं सगळं चांगलय ! पण येथे माझं काय काम ? अन् काय सांगणार आहे ही नीलादीदी आपल्याला विशेष ? हा प्रश्न गेली दोन दिवस झोपताना त्याला पडे उद्या सकाळी याचा सोक्षमोक्षच करायचा विचार करुन तो झोपला. दिवसभराच्या गिरिभ्रमणानं त्याला लगेच झोप लागली.

सकाळी त्यानं विचारायचं ठरवलं. पटकन् तळ्यावर स्नान आटोपून आला. आणि बाहेर ओट्यावर बसला. मावशी दूध आणि मध घेवून आली.

" काय समीर करमलं की नाही दोन दिवस " मावशीनं हातात दुधाचा ग्लास देत म्हटलं. मधाची वाटी त्याच्या शेजारीच ठेवली आणि समोरच्या लाकडी ओंडक्यावर, अगदी सपाट पृष्ठभागांच्या ओंडक्यावर जाऊन बसली.

तो बोलणार होता. कंटाळला होता. पण मावशीच बोलायला लागली.

समीर तुला असं वाटत असेल ना तुला येथे कशासाठी बोलावलंय ! तेच सांगणारेय मी, ते दुध अन् मध आधी घे पाहू.

अधीरतेने त्याने मध दुधाच्या ग्लासमध्ये टाकलं गटागटा दूध पिऊन खिशातल्या रुमालानं तोंड पुसून रुमाल पुन्हा खिशात ठेवून, उत्सुकतेने ओट्यावर मांडी घालून बसला.

समीर, पहिल्या खोलीत जो फोटो तू बघितलास ना! तो माझ्या पतीचा. कर्नल विजय सक्सेना. माऊंटेनियरींगची फार आवड. राष्ट्रपतींकडून सुवर्णपदक मिळवलंय त्यानं. मीही एन. सी. सी. कॅडेटच, मुंबईला तो कॅम्पला आला तेव्हा ओळख झाली.

" माऊंटेनेयरींग मध्ये मी हे विक्रम करतोय माहितेय " एकदा तो म्हणाला होता.

नाही ......... का ? मी अधीरतेने म्हटलं.

" मला असं वाटतं ह्या डोंगराच्या कळसावर तूच बसलीयस तुला भेटायला म्हणून मी एवढी मेहनत करायची."

मला ती थट्टाच वाटत होती.

त्याने मिल्ट्रीत जायचा निर्णय घेतला. तेव्हा माझा त्याला कडाडून विरोध होता. अगदी तुझ्या-सारखाच. माझा संसाराचा चौकोन ठरलेला होता. तो मुंबईला एखादा जॉब करील अन् मी आदिवासी भागात काम करीन असं माझं स्वप्न होतं. पण तुझा हा कॅप्टन रणबीर. फार वाईट माणूस. याचा मित्रच दोघंही माझं न जुमानणारे, आणि तूही मिल्ट्रीत जावं असं मी सागाव म्हणून त्यानं तुला माझ्याकडे पाठवलंय बघ.

"मला नाही जायचं मावशी मिल्ट्रीत" तो म्हणाला.

का ? का ..... रे समीर,! त्या शहरातल्या सामान्य माणसांसारखं जगायचंय तुला, कुठला बरं आनंद मिळविणार तू यातून ? तेथेही तर सगळी बंधनच, वेळेवर बंधन, स्वभावावर बंधन, आणि तुमच्या विचारांवरही बंधन. सगळं सगळं अगदी उसनं. तोंडावर कायम उसनं हसू आणून कोणी सांगीतलंय तुम्हाला वावरायला? तुमचा स्वतःच्या जीवनावरच हक्क असू नये काय ?

आणि मिल्ट्री म्हणजे काय वाईट आहे ? मी काही तुला एकदम सर्वसंगपरित्यागाचा उपदेश देत नाही. पण खरच विचार कर, तुला यातला अनुभव आहेच. तुझा इलेक्ट्रॉनिक्स सारखा विषय आहे तुझ्या मर्दुमकीची, धैर्याची, ज्ञानाची देशाला गरज आहे. जर तुझ्यासारख्या तरूणांनी घरात बसून रहायचं ठरवलं तर मग आमच्या देशाचं सर्व आघाड्यावर कोण बरं रक्षण करणार?

समीर हे आव्हान आहे. मी ही या आव्हानाला घाबरत होते· विजय लष्करात गेला. मला समाज-कार्य सोडून दिल्लीला त्याच्याबरोबर जाव लागलं हाय सोसायटीच्या बायकांबरोबर व्हिस्कीचे घोट घेत रमी खेळत मन रमवावं लागलं. हं एक आव्हा-नच होतं विजय लढाईत कामी आला. माझ्यावर पहाड कोसळला पण मी घाबरले नाही मला माझं लक्ष्य– समाजकार्य दिसत होत तस मी उत्तर प्रदेशात जावून विजयच्या आईवडिलांजवळ, विजयचे पेन्शनीचे पैसे घेत राहू शकले असते. पण खरी कार्याची आत्मीयता असल्यानं मुंबईला आले. आमच्यासारखेच तरुण–तरूणी या कार्यास वाहून घेण्यास तयार झाल्याने या कार्यास विशेष गती प्राप्त झाली होती. या खान्देशात यायला कोणीच तयार नव्हतं. या छोट्या करणला घेवून आले. सासूसासऱ्यांना समजुतीचे पत्र लिहिलं.

या ना ओळखीच्या प्रदेशात, माणसात येवून राहीले. त्यांच्यात मिसळले त्यांचेतलीच एक. झाले खरच! हे आपलेच देशबांधव पण दोन देशबाधवातला फरक पहा किती आहे. एक सुटाबुटात मोठ मोठ्या इमारतीत रहातोय तर दुसरा लाज राखण्याइतके कपडे घालून, पोटापाण्याकरीता डोंगरात वणवण फिरतोय. एक विज्ञान युगात जाऊन पोहचलेला तर दुसरा विज्ञानापासून हजारो योजने दूर किती हा विपर्यास. पण म्हणून दोष या आदिवासींना द्यायचा? म्हणूनच या आपल्या लोकांची सेवा करण्यात मी रमले. करणनेही आजारानं माझी साथ सोडली. शहर दूर असल्यानं त्याला औषधी मिळू शकली नाही. तो गेल्यानं मी माझ्या कार्यापासून तसूभरही ढळले नाही. हे सोडून शहरात जावं हा विचारही मनात येवू दिला नाही.

समीर तुझंही असंच आहे. कॅप्टन रणबीरनी लीहिलंय की हा हट्टाकट्टा जवान सगळं सोसू शकेल, झेलू शकेल पण त्याचा आत्मविश्वासचा ठेपाळलाय, आव्हान पेलल जाईल की नाही ही भीती वाटतेय. हीच वेळ आहे समीर! आपल्या पायावर भक्कमपणे उभा रहा. आठव त्या शहीदांना, शहीद भगतसिग, सुभाषचंद्र बोस त्यांनी जे सोसलय त्यांच्या एक टक्काही आपल्या वाट्यावर दुःख येत नाही. मग का मागे हटतोय ?

समीर उठला. मावशीच्या पाया पडला शबनम घेतली अन् गावी परतला. लागलीच त्यानं कॅप्टन रणबीरची भेट घेतली.

कॅप्टन रणबीर त्याचेकडेच पहात होता. त्याच्या चेहऱ्यावर आव्हान स्विकारल्याचं तेज दिसत होतं नीलादीदीनं केलेला योग्य तो इलाज समीरच्या चेहऱ्यावर दिसत होतां. लगेच समीरने दोन्ही पाय जुळवून खाडकन सॅल्यूट केला. कॅप्टन रणबीरने सॅल्युट स्वीकारतांनाच त्याच्या चेहऱ्यावर हास्य तरळत होतं.



# कला आणि जीवन

सौ. चिपळूणकर
M. A. IV

स्वातीचा पाऊस सर्व ठिकाणी पडतो. पण त्यातील कांहीच थेंब शिपल्यांत पडतात आणि त्यांचे मोती बनतात. त्याप्रमाणे जगात सर्वजण सदासर्वकाळ काही ना काही व्यावहारिक अनुभव घेतच असतात; पण त्यांच्यातीलच काही प्रतिभावंत त्यातीलच काही अनुभवांना आपल्या प्रतिभेच्या परिसस्पर्शाने अमर करतात, अक्षर करतात. आपल्या प्रतिभेच्या छिन्नि हातोड्याने याच अनु भवांना सौंदर्यपूर्ण रुप देतात व काळाच्या प्रस्तरावर साहित्यशिल्पे कोरतात.

वाङमयांतून काय किंवा इतर कलांमधून काय जो कलानुभव, सौंदर्यानुभव आपल्या प्रत्ययास येतो तो मूलतः व्यावहारिक अनुभवांतूनच साकार होतो. वा. ल. कुळकर्णी म्हणतात " पाण्यांतून वर येणारे कमळ जसे त्या पाण्यावर जीवनासाठी अवलंबून असते पण स्वतःचे स्वतंत्र स्वयंपूर्ण जग निर्माण करतं, त्याप्रमाणे प्रत्येक कलानुभव हा लौकिक, व्यावहारिक जीवनानुभवांतून निर्माण झालेला असतो, पण स्वतःचे स्वतंत्र जग निर्माण करत असतो. "

साहित्यांताल या कलानुभवांत, तत्कालीन व्यावहारिक अनुभवांबरोबरच; जीवनानुभूती देणारा, जीवनभाष्य करणारा, जीवनांतील सत्य धारण करणारा चिरयौवन असा असाधारण अनुभवही असतो, व या असाधारण, चिरयौवन अनुभवामुळेच हा कलानुभव रसिकाच्या मनावर चिरकाल अद्भूत अशी मोहिनी घालत असतो. इतक्या शतकानंतरही 'मेघदूत' व 'शाकुंतल' यांची मोहिनी कायम आहे यांतील रहस्य हेच आहें.

या कलानुभवांत व्यावहारिक अनुभवांचे प्रति-बिंब जरूर असते. पण ता त्याची प्रतिकृती मात्र नसते. ज्याला आपल्या व्यावहारिक अनुभवाचा पाया नाही, ज्या अनुभवांचा आमच्या जीवनांतील दैनंदिन व्यावहारिक अनुभवांशी कांही एक सबंध नाही, असा कलानुभव घेण्यांत आपल्याला फार काळ रस वाटत नाही. साहित्यकृतींत आपल्याच सुखदुःखाचे भाव-भावनांचे प्रतिबिंब दिसते. आपल्या आयुष्यात घडलेले प्रसंग, आलेल्या-व्यक्ती तेथे भेटतात. आप-लेच जीवन-सौंदर्यरुप घेऊन आपल्याला सामोरे जाते. म्हणून आपल्याला त्या साहित्यांत त्या कलानुभवांत गोडी वाटते व आपण त्या साहित्यकृतीचा अनेक वेळा आस्वाद घेतो. याचं एक कारण असं की, अनादी कालापासून चालत आलेलं माणसाचं व्यावहारिक विश्व बदललं, पण त्याचं भावविश्व यत्किंचितही बदलेलं नाही. आजचा पिता मोटारीतून पतिगृही निघालेल्या कन्येला मंगलकार्याबाहेर उभा राहून अश्रुपूर्ण नेत्रांनी निरोप देईल, पण मनांतील मायेचे कढ तेच असतील, जे कण्वाने शकुंतलेला दुष्यंताघरी धाडतांना अनुभवले होते. अशा प्रकारे कलानुभवांत व्यावहारिक अनुभवांचे प्रतिबिंब जरुर असते. पण तो जर त्याची प्रतिकृतीं बनला तर आपल्याला त्यांत मुळीच रस वाटणार नाही. रोजचेच कंटाळवाणं, नीरस आयुष्य पुन्हा साहित्यातून

दिसणार असेल तर आपण त्या साहित्याच्या वाटचालाच जाणार नाही आपले रोजचे जीवनच कलापूर्ण होऊन, त्यातील त्रुटी जाऊन ते परिपूर्ण होऊन आपल्या भावभावना, जीवनानुभूतीचे उन्नयन होऊन, आपल्याला साहित्यांत व इतर कलांत भेटते. म्हणूनच इतिहासाच्या प्रारंभ काळापासून माणूस कलास्वाद घेतो आहे. कलेच्या ठिकाणी आसक्त आहे. हा माणसांमधील व पशूमधील एक मुख्य फरक आहे. 'साहित्य संगीत कलाविहीनः साक्षात् पशुः पुच्छाविशालहीन!' असे सुभाषितकार म्हणतात, ते उगीच नाही. प्रतिभावन्तानीच या आयुष्याला सौदर्यपूर्ण बनवले आहे व म्हणूनच केशवसुत म्हणतात

'आम्हाला वगळा गतप्रभ झणि होतील तारांगणे ।
आम्हाला वगळा विकेल कवडी मोलावरी हे जिणे'।।

अनुभवाच्या दोन अगांपैकी साधारण व्यवहारिक अनुभवाच्या तपशिलाचा सामान्य माणसाला नेहेमीच प्रत्यय येतो पण त्यांतील असाधारण अंग त्यांच्या लक्षात येत नाही. त्याच्या दृष्टीस पडत नाही. पण साहित्यिकाला मात्र शंकराप्रमाणे एक तिसरी-द्विव्य दृष्टी प्राप्त झालेली असते. ती म्हणजे कलादृष्टी या कलादृष्टीच्या प्रकाशांत तो प्रत्येक व्यावहारिक अनुभव-शाश्वत संपूर्ण जीवनानुभवाच्या संदर्भात पाहू शकतो त्याला सौदर्यपूर्ण, परिपूर्ण अशा कलात्मक अनुभवाच्या पातळीवर नेऊ शकतो. अभिव्यक्तीद्वारे, साहित्यकृती वा कोणत्याही कलाकृतीद्वारे, सहृदय रसिकाला त्याच कलानुभव ची चैतन्यमय अशी अनुभूती देऊ शकतो.

'The true artist always strives to express in terms of beauty. His interpretation of a wider reality a richer experience.'

साहित्यिक कलानुभवाला 'अतिन्द्रिय ब्रह्मानदाची' उपमा मम्मट देतो.

तुकाराम म्हणतात, –

'आपुलिया मना उपजे आनंद ।
तैसे करू छंद कथेकरी ॥
तुका म्हणे आम्ही आनंदचि धालो ।
आनंदचि ल्यालो अलंकार ॥

विश्वातील विविध भावनान्त घटनांचा सौंदर्यतत्वानुरोधाने लयबद्ध अन्वय लावणे म्हणजेच कलानुभव देणे असे मर्ढेकर म्हणतात.

व्यावहारिक अनुभव व कलानुभव यांतील मुख्य फरक असा की, व्यावहारिक अनुभव व्यक्तिसापेक्ष, कालसापेक्ष, स्थलसापेक्ष असा इंन्द्रीय अनुभव आहे तर कलानुभव हा फक्त कलासापेक्ष व भावसापेक्ष असा एक अतिद्रिव अनुभव आहे.

दलित दया पवारचे, 'बलुतं' मधील अनुभव मग दया पवारचे व्यक्तिगत अनुभव रहात नाहीत तर शतकानुशतके द्रारिद्रय, अज्ञान, अपमान यांच्या खाईत खितपत पडलेल्या दलितांच्या दुःखाला त्याच्याद्वारे वाचा फुटते. व्यक्तिसापेक्ष अनुभव व्यक्तिनिरपेक्ष बनतो, व्यक्तिचा अनुभव समष्टीचा अनुभव बनतो.

कालसापेक्षता नसणे हे कलानुभवाचे व्यवच्छेदक लक्षण आहे. रामायण, महाभारत, शेक्सपियरची नाटके यांना आपण अक्षर वाङमय म्हणतो ते याचमुळे समाजात आजही 'to be or not to be' म्हणणारा 'हॅम्लेट' दिसून येईल आणि नाहक संशयाला बळी पडलेली निरागस नाजुक 'डेस्डेमोना' दिसून यईल. कलानुभव असा चिरयौवनाचा वर प्राप्त करून घेऊन अवतरतो.

व्यावहारिक अनुभवाप्रमाणे कलानुभव स्थलसापेक्षही नसतो. रा. भि. जोशी यांच्या 'मजल-दरमजल' या प्रवास वर्णनात नुसते भौगोलिक



वर्णन नाही. ते भौगोलिक वर्णनापलीकडे जाते वातावरणाचे मानसिक चित्र ते उभे करते. मनाच्या रंगांत ते स्थळ रंगून जाते. रिद्धपूरचे वर्णन करणाऱ्या लेखाचे शीर्षक 'ते रिद्धपूर देखिले' असे आहे गोविंद प्रभूंच्या पावन सान्निध्यांत रंगलेले असे 'ते' रिद्धपूर 'ह्या' रिद्धपूर बरोबरच आकार घेते.

व्यावहारिक अनुभवाची अनुभूती क्षणिक असते. अल्पजीवी असते. ज्या क्षणी ती अनुभूती होते त्या क्षणी भावनेच्या उद्रेकामुळे अथवा तीव्रतेमुळे त्या अनुभूतीचे मर्म लक्षांत येत नाही, पण भावनांचा प्राथमिक आवेग ओसरला की त्या अनुभूतीचे कारण असलेल्या गुंतागुतीच्या भावनांचे विश्लेषण लेखक करु लागतो त्या भावना अधिक समृद्ध व सार्थ करण्याचे काम त्याची प्रतिभाशक्ती करते आणि तो अनुभव कलानुभव होतो. सार्वकालक होतो. 'क्रौंचवध' बघून जो भावनिक क्षोभ झाला तो ओसरल्या बरोबर वाल्मिकीला अनुष्टुभ छंद स्फुरला व रामायण साकार झाले. एक महाकाव्य साकार झाले.

व्यावहारिक अनुभवाचा परिणाम एखाद्या छोट्या परिसरापुरता क्षीण असतो. परंतू कलात्मक अनुभव स्थलकालाच्या मर्यादा ओलांडून जाण्याइतका परिणामकारक, प्रभावशाली असतो. एखाद्या कॉलनीतली स्त्री पतीच्या जाचाला कंटाळून घरातून निघून गेली तर फारतर त्या कॉलनींत चर्चा होईल, पलिकडच्या कॉलनींत घटनेची दखलही घेतली जाणार नाही. पण 'Dolls House' मधील 'नोरा' जेव्हा गृहत्याग करून आपल्यामागे 'धाडकन्' दार लावून जाते; तेव्हा त्या आवाजाने स्त्रीवरच्या अन्यायाच्या जाणीवेने अख्ख जग खडबडून जागं होतं, इतका त्याचा परिणाम व्यापक व प्रभावशाली होतो !

व्यावहारिक अनुभव हा जीवशास्त्रीय उद्दिष्टांपासून सुरु होतो व जीवशास्त्रीय उद्दिष्टामध्येच त्याचा शेवट होतो. तर कलात्मक अनुभव सौंदर्यप्रतितीत सुरु होतो व सौंदर्यप्रतितीत परिणत होतो.

समोर वाघ उभा ठाकला हृचा व्यावहारिक अनुभवाची परिणिती तेथून पळून जाण्याच्या जीवशास्त्रीय उद्दिष्टांत होते पण वाघाच्या हुबेहुब चित्र बघणाऱ्याच्या पुनःप्रत्ययाचा फक्त सौंदर्यानुभव, कलानंदच मिळेल !

एखाद्या बालकाची आई गेली व त्याने दुःखाने टाहो फोडला. हृचा व्यावहारिक अनुभवाने आपल्यालाही अत्यंत दुःख होऊन, मन खिन्न होईल, डोळ्यांत अश्रू येतील. परंतु माधव ज्युलियन यांची आई वाचताना.

'घे जन्म तू फिरुनी । येईन मी ही पोटी
खोटी ठरो न देवा । ही एक आस मोठी
प्रेम स्वरुप आई । वात्सल्य सिंधू आई
बोलावू तुज आता । मी कोणत्या उपायी'

हृचा कवितावाचनाचा कलात्मक अनुभव घेताना रसिकाची प्रतिक्रियाही कलात्मकच होईल. सौंदर्यात्मकच होईल. त्या बालकाच्या भावना तो प्रत्यक्ष अनुभवील त्याच्या डोळ्यांत अश्रू भलेही दुःखाचे नसतील तर एक प्रत्ययकारी अनुभव अनुभवल्याचे, एक साक्षात्कारी सौंदर्य अनुभवल्याचे ते आनदाश्रू असतील. गंगूबाई निगळाचा षड्ज लागला की आनंदाने डोळयांत अश्रू येणारे कितीतरी रसिक असतील, आहेत !

आशयाच्या दृष्टिकोणांतून बघता, व्यावहारिक अनभवातील आशयाला कलात्मक साज चढवून साहित्यिक कलानुभव देतो. व्यावहारिक अनुभवाचा आशय सैल असतो, विस्कळीत असतो, परंतु अशा अनेक विस्कळित अनुभवाच्या साखळींतूनच, कलाकार, साहित्यिक, प्रतिभावंत, परिणामकारक असा

कलानुभव साकार करतात. पावसाळ्यांत सर्वदूर पसरलेले हिरवे गार गवत आपल्याला नेहमीच दिसते. त्या गवताच्या मऊशार स्पर्शाची कल्पनाही कधी आपल्या मनाला स्पर्शून जाते. त्याचा मुलायमपणा, कोवळेपणा त्याच्या नुसत्या दर्शनानेही जाणवतो, हिरवागार रंग डोळ्याला सुखावतो. हे वेगवेगळे व्यावहारिक अनुभव बालकवी एकत्र आणतात आणि

‘ हिरवे हिरवे गार गालिचे ।
हरित तृणांच्या मखमालीचे । ’

असा रंग, रूप, स्पर्श युक्त आशय, कलात्मक अनुभव साकार करतात.

“ Creative imaginatian spontaniously selects among the elenents given by experience & combines them ınto new wholes. ”

आशयातील, कल्पनात्मक ( Imaginative ) अंग प्रामुख्याने त्याला कलात्मक बनवते.

आयुष्यांतील वेगवेगळ्या व्यावहारिक अनुभवांतील सत्य जाणून, त्यांतील मर्म जाणून साहित्यिक; जीवनाचा अर्थ लावत असतो. व तो एखाद्या कलाकृतीच्या द्वारे रसिकाला देत असतो. परतु बोध हा त्याचा हेतू नसतो. बोध हा त्याच्या भावनिक अविष्काराचा परिणाम असू शकतो.

हेमिंग्वे आपल्या ‘ Old man and the sea ’ या नोबेल प्राईझ मिळालेल्या कादंबरीत, जीवनाचा मूलार्थ, जीवनाबद्दलचे रहस्य कलात्मक रित्या सांगून जातो व तो कलात्मक अनुभव साहित्यांतील एक मैलाचा दगड बनून रहातो

भाषेच्या दृष्टिकोनांतूनही व्यावहारिक अनुभव व कलात्मक अनुभव यांत फरक पडतो.

व्यावहारिक अनुभवाची भाषा; ही एकच एक अनुभव सांगणारी एकार्थीच असावी लागते. नाहीतर त्या अनुभवाचे वस्तुनिष्ठ रूप आपल्याला कळू शकणार नाही. वर्तमानपत्रांतल्या बातमीमधून अनेक अर्थ निघून चालणार नाही, त्यामुळे अनर्थ होतील. परंतु साहित्यातील भाषा अनेकार्थी असते, गूढ असते. औंदूबर कविता वाचून कोणाला ती एक साधी सुंदर निसर्गकविता वाटते, तर कोणाला त्यांत एक सन्यस्त. अलिप्त, निरीच्छ साधुपुरुष दिसतो. कोणाला ती कविता निव्वळ नादलययुक्त भाषासौंदर्यामुळे मोहिनी घालते. बी - कवींच्या चाफा कवितेने सुद्धा वर्षानुवर्षे रसिकांच्या मनावर याच कारणासाठी मोहिनी घातली आहे. आणि म्हणून साहित्य पुनः पुन: वाचले जाते, दरवेळी वेगवेगळा कलानंद देऊ शकते. वर्तमानपत्रे वाचतांना किंवा इतिहास भूगोल, शास्त्र यांसारखे विषय मांडतांना वापरलेले शब्द हे शब्दकोशांतल्या अर्थानरुप असतात परंतु कलानुभव व्यक्त करतांना, शब्दांचा शब्दकोषातील अर्थ गळून पडतो व त्याला एक नवा ताजा अर्थ प्राप्त होतो. पावसात भिजणारी लहान मुले जेव्हा घरांतील मोठ्या लोकांना, ‘खुषाल टुचु द्या आमूच्या पाया तुमचे पाऊस काटे, असे बजावतात तेव्हा तो कवी रोजच्या व्यवहारांतल्या शब्दांतूनच, अनेक भावना, विचार. विकार, अनुभव यांचा संदर्भ घेऊन अगदी कमितकमी शद्बांत मुलांच्या भावना व्यक्त करतो आणि एक साधा व्यावहारिक अनुभव भाषेच्या सहाय्याने कलात्मक पातळीवर जातो.

‘ आम्हा घरी धन, शद्बांच्याच राशी ’ किंवा ‘आम्ही शद्बांचे प्रभू’ असे शद्बांचे वैभवपूर्ण वर्णन कवी करीत असतात. ते याच अर्थाने जेवढा कवी प्रतिभासंपन्न, अनुभवसंपन्न, तेवढी त्याची शद्बकला सुसंपन्न.

भावना या पाऱ्यासारख्या तरल असतात. शब्दांच्या चिमटींत त्या उचलून दाखवणे, यथार्थपणे दाखवणे ह्यासाठी अत्यंत समर्थ अशा शद्बकलेची आवश्यकता असते. त्याचबरोबर तिला कल्पकतेची जोड मिळाली तर ‘सोनीया सुगंधु आला’ असा सुयोग प्राप्त होतो.





व्यावहारिक भाषा पसरट, शिथिल असते. पण कलात्मक अनुभवांतील भाषा, अत्यंत कमी शद्बांत अत्यंत सखोल असा अर्थ सांगून जाते. तार करूनही स्टेशनवर न्यावयास कोणी आले नाही हे तेव्हा नट सम्राट म्हणतात ‘ तार दारापर्यंत जाते हृदयापर्यंत नाही. ’ तसेच सर्व पैसा मुलांत वाटून टाकून बेघर झालेल्या अवस्थेत कावेरी म्हणते ‘ समोरचं ताट द्यावं पण बसायचा पाट देऊ नये. ’ शिरवाडकरांच्या या दोन छोट्या वाक्यांत जीवनाच केवढ मोठं तत्वज्ञान साठवलं आहे! ह्याला म्हणतात शद्बसामर्थ्य, भाषासामर्थ्य.

व्यावहारिक अनुभवाच्या भाषेचा साचा सर्वसाधारणपणे ठरलेला असतो. व ते तसे आवश्यकही असते. परंतु कलात्मक अनुभवाची भाषा व्यक्तिपरत्वे बदलत असते. सावरकर, शिरवाडकरांची भाषा ओजस्वी आहे तर बोरकर बालकवी यांची भाषा मृदु आहे. फुल्यांची, रामदासांची भाषा ओबडधोबड रोखठोक तर भटांची परखड आहे. गडकऱ्यांच्या राजसंन्यास मधील त्यांची पल्लेदार वैभवशाली तेजस्वी भाषा मराठी वाङमयाचं एक लेणं होऊन बसली आहे.

व्यावहारिक अनुभवांत भाषा हे विचार व्यक्त करण्याचं फक्त साधन आहे. पण कलात्मक अनुभवांत भाषा हे भावनाविष्काराचे माध्यम आहे. त्यामुळे व्यावहारिक भाषेंत थोडाफार फरक केल्यास, शद्बांची आलट पालट केली, तर फारसं बिघडत नाही पण कलात्मक अनुभवांत एकाही शद्बाचा किंवा त्याच्या स्थानाचा फेरबदल चालत नाही. कलात्मक अनुभव व्यक्त होतांना विशिष्ट शब्द विशिष्ट स्थानासाठीच अवतरलेला असतो. त्यांत कानामात्रेचाही फरक करून चालत नाही. असा फरक केल्यास त्या अनुभवाची अनुभूतीच बदलेल. गावकुसाबाहेरील कवितेत वामन निंबाळकर म्हणतात ‘शद्बांनीच पेटतात घरे दारे आणि माणसेसुद्धा’ या भाषेतील ताकद, वजन, ‘ घरे दारे आणि माणसे शद्बांनीच पेटतात’ ह्या भाषेत येऊ शकत नाही.

व्यावहारिक भाषा व कलात्मक भाषा यांत आणिक एक फरक असा की व्यावहारिक भाषेत आशयानुसार भाषेचा पोत बदलत नाही; परंतु कलात्मक अनुभवांत आशयानुरुप, भाषेत, भाषेच्या प्रकारांत, पोतात, बदल होतो. कथा, नाटक, कादबरी, काव्य पोवाडे, या सर्वांची भाषा वेगवेगळी असते. कथा कादंबरीची भाषा वर्णनात्मक असेल तर नाटकाची भाषा संवादात्मक असेल. काव्याची भाषा टोकदार अल्पाक्षरी असेल. पोवाड्याची भाषा गायकीसुलभ जोमदार असेल. ललित निबंधाचीं भाषा हलकी फुलकी तर वैचारिक निबंधाची भाषा गंभीर वळणाची, लावणीची भाषा नखरेल लडिवाळ असेल.

व्यावहारिक अनुभव व कलात्मक अनूभव याना व्यक्त करणाऱ्या भाषेंतील सर्वांत मुख्य रूपात्मक असा जो फरक आहे तो म्हणजे व्यावहारिक अनुभवाची भाषा प्राय: गद्य असते. रूक्ष व व्याकरणानुगामी असते. त्यात घटनेच्या तपशिलाला महत्व असते. परंतु कलात्मक अनुभवांत मात्र भाषेच्या सौंदर्याला, परिणामकारकतेला व त्यानुसार अलंकरणाला अत्यंत महत्व असते. काव्यांत ही भाषा पद्यात्मक, छंदवृत्तनादयुक्त असते. गद्यांतसुद्धा भाषेच्या सौंदर्याकडे कटाक्षाने लक्ष दिलेले असते. उपमा अलंकार प्रतिमा यांनी ती मंडित असते. अनुभवानुसार ती कधी अत्यंत सुकोमल “ गालावरच्या कुसुमी किंवा कुसुमाच्यागाली ” सावरकर, तर कधी रौद्र, ‘ डुमडुमत डमरु ये ’ तांबे. कधी प्रौढ गंभीर ‘ पृथ्वीचे प्रेमगीत ’ कुसुमाग्रज, तर कधी खळाळत्या झऱ्यासारखी अवखळ–

‘श्रावणमासी हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहीकडे ।
क्षणांत येते सरसर शिरवे। क्षणांत फिरुनी उन पडे॥’
बालकवी

व्यावहारिक अनुभवाची अभिव्यक्ति किंवा अविष्कार, निवेदन पद्धतीने किंवा वर्णनात्मक पद्धतीने होत असतो, पण कलात्मक अनुभव; आपला आशय व साहित्यिकाच्या व्यक्तिमत्वानुरुप आपल्या अभि-व्यक्तिचो नाना रुपे घेऊनच अवतरतो ही अभिव्य-क्तीचा रुपे म्हणजे–कथा, कादंबरी, नाटक, काव्य पोवाडा लावणी प्रवासवर्णन वगैरे. क्वचित एखादा ताकदीचा लेखक एकच आशय कथा, कादंबरी किंवा कादंबरी–नाटक अशा दोन्ही रूपांत व्यक्त करतो, पण अशी उदाहरणे अपवादात्मकच. श्री. ना. पेंडसे यानी आधी 'गारबीचा बापू' लिहिली नंतर तिला नाटयरुप दिले.

व्यावहारिक अनुभवाची दोन व्यक्तीनी केलेली अभिव्यक्ती जवळजवळ सारखीच असेल पण एकाच अनुभवाची दोन लेखकांची कलात्मक अभिव्यक्ती त्यांच्या व्यक्तिमत्वानुरूप खूपच वेगळी आढळेल. एवढेच नव्हे तर एकाच लेखकाचीं एकाच आषयासं-बंधिची दोन वेळची अभिव्यक्ती सारखी असणार नाही.

फाळणीच्याच वातावरणावर आधारित ना. ग. गोरे यांची 'चुळकाभर रक्त, चुळकाभर पाणी' आणि अदवंत यांची 'माणुसकीचा धर्म' या एकाच विषयावरील कादंबऱ्या संपूर्णपणे वेगळ्या दृष्टीकोणां-तून (आपापल्या व्यक्तिमत्वानुसार) लिहिल्या आहेत. त्यामुळे दोन्ही कादंबऱ्यांची प्रकृति संपूर्णपणे वेगळी आहे. तसेच निसर्गप्रेमीं बालकवींच्याच कुठल्याही दोन निसर्गकविता, आषयाच्या दृष्टीने सारख्या नाहीत. त्याची अभिव्यक्ती पूर्ण वेगळी आहे उदा. औदूंबर, निर्झरास, फुलराणी, एकाच कलाकाराची, नवनवो-न्मेशशाली प्रतिभा अभिव्यक्तीची अशाप्रकारची निरनिराळी सौंदर्यरूपे घेतांना आढळते.

कवीच्या व्यक्तिमत्वाचा प्रभाव अभिव्यक्तीवर पडल्याशिवाय रहात नाही. तांबे स्वभावतः प्रेमकवी! त्यांचे अध्यात्मपर, देशभक्तिपर काव्य त्यांच्या प्रेम-काव्याची उंची गाठू शकत नाही. तद्वतच् रामजोशीची लेखणी लावणीच्या रंगात रंगून जाते. पण अध्या-त्माचा भगवा रंग तिला फारसा शोभत नाही.

व्यावहारिक अनुभव घेणारा साहित्यिक जेवढा डोळस. संवेदनाशील तेवढे त्याचे त्या अनु-भवामागील भावविश्व, जीवनमूल्य, जीवनसत्य जाणून घेण्याचे सामर्थ्य अधिक व त्याचा जीवनानुभव जेवढा समृद्ध, त्याची प्रतिभा जेवढी ताकदीची, कल्पनाशक्ती जेवढी विशाल, तेवढा त्याचा कलात्मक अविष्कार जिवंत, परिणामकारक, सघन उतरतो.

अर्थात ताकदीच्या लेखकाच्या कलात्मक अवि-ष्कारांतून सौंदर्याचा साक्षात्कार होण्यासाठी तसाच संवेदनाशील, अस्वादक्षम रसिक पाहिजे. त्याशिवाय त्या कलात्मक अविष्काराचे सार्थक होत नाही, आणि म्हणूनच भर्तृहरी म्हणतात–

"अरसिकेषु कवित्वनिवेदनम् । मम शिरसि मा लिख मा लिख मा ।

* * *


टेपरेकॉर्डस
रेडिओ
T. Series कॅसेट
सर्व प्रकारचे स्पिकर विकत मिळतील.

पायल म्युझिक हाऊस
२८० नवी पेठ, जळगाव


# हार

संगिता भागवत
M. A.

निशाने टॅक्सीतून आपल्या बंगल्याकडे नजर वळविली हिरवळीच्या पार्श्वभूमीवर तो टुमदार बंगला तिच्या मनात भावनांचे कल्लोळ निर्माण करून गेला. आणि आपल्या कुटुंबाचा सारा इतिहास तिच्या मनःश्चक्षूंपुढं तरळू लागला.

ते एक सुखी कुटुंब होते. निशाचे वडील श्री. गोखले, तिची आई आणि दोन बहिणीं नेहा अन् नीला. निशा ही थोरली. दिसायला खूप सुंदर. गोरा रंग, आकर्षक बांधा, रेखीव नाकडोळे, कुरळे केस या साऱ्यांमुळे तिच्या लावण्याचे सर्वत्र कौतुक होत असे. वडिलांची तर ती अधिकच लाडकी होती. तिच्या दोन्ही बहिणी स्वभावाने अत्यंत प्रेमळ होत्या निशा सर्वांच्या कौतुकानं काहीशी लाडावली होती. दिवसभर नटणे मुरडणे यातच ती मग्न असायची! घरकामाचं जणु तिला वावडंच!. आई काळजीनं रागावायची. पण वडील कौतुकाने तिचीच बाजू घेत. अन् त्यामुळे ती अधिकच शफारून जायची.

तसा निशाचा अभ्यासही बरा होता हळू हळू निशा मोठी झाली तिनं कॉलेजात प्रवेश घेतला. अन् याबरोबरच ती अधिक स्वप्नाळू झाली. तिचं भाव विश्व उमलू लागलं मूळचं लावण्य अन् त्याबरोबरच ती करीत असलेला श्रृंगार, आकर्षक केशभूषा, अद्ययावत फॅशनचे कपडे यामुळे कॉलेजा-तल्या विद्यार्थ्यांची ती जणूं ब्यूटी क्वीन ठरली. कॉलेज कुमारांचा घोळका सतत तिच्या पाठीमागे असे. हे तरूण तिच्याकडे आशाळभूत नजरेने बघत; आणि याचाच तिला विलक्षण अभिमान वाटत असे. सुरवातीला या मुलांच्या घोळक्याला ती घाबरायची. पण नंतर त्याचे तिला काही वाटेनासे झाले. उलट त्यांची थट्टा तिला हवीहवीशी वाटू लागली. आपण म्हणजे एखादी रूपगर्विता आहोत. असा तिचा समज अधिकाधिक दृढ होऊ लागला. स्वतःबद्दलच्या विल-क्षण अपेक्षा आणि भावी जीवनाबद्दलची अवास्तव स्वप्ने तिनं रेखाटली होती.

निशा कॉलेजमध्ये असतांनाच तिला मागण्या येऊ लागल्या होत्या. आईवडीलही चांगल्या स्थळांच्या शोधात होतेच. कारण त्यांना तीन मुलींची लग्ने करायची होती ना ! पण निशा मात्र या सर्वसामान्य स्थळांबाबत उदासीन होती. आपल्या जोडीदारा विषयी तिच्या काही जबरदस्त अपेक्षा होत्या; म्हणून तिला बघायला येणाऱ्या मुलांमध्ये वेगवेगळे दोष काढून ती त्यांना नाकारू लागली. ती कॉलेजात असतांनाच कॉलेजमधील एका हुषार, श्रीमंत अन् देखण्या मुलाने प्रभातने– तिला मागणी घालण्याचा प्रयत्न केला होता. तो प्रसंगही निशाला आठवला.

कॉलेज संपवून निशा एकटीच घरी निघाली होती. तेवढ्यात तिला कोणीतरी हाक मारीत असल्याचे जाणवले. तो प्रभात होता. ती थांबताच प्रभात तिच्याजवळ आला आणि आपल्याबरोबर कॉफी घेण्यास तिने चालावे म्हणून विनवू लागला. निशालाही बहुधा तेच हवं असावं. कारण तीही कोणतेच आढेवेढे न घेता त्याच्या बरोबर गेली. कॉफी हाऊसमध्ये गेल्यावर प्रभातने कॉफीची ऑर्डर तर दिलीच पण मोठ्या अधाशी पणाने तो

तिला न्याहाळू लागला आणि भावविवश होऊन म्हणाला, "निशा, खूप आवडतेस ग तू मला! पण जोडीदार म्हणून तू माझा स्विकार करशील का? माझी कायमची होशील का?" त्याच्या शब्दात कमालीचं आर्जव होतं. ओलावा होता. पण निशा त्याला प्रतिसाद न देता समोरची कॉफी दूर सारून व त्याला धुडकावून तरातरा तेथून बाहेर पडली! तिला वाटत होते आपण फार मोठा पराक्रम केला! कारण प्रभात सारख्या सुशील, श्रीमंत, अन् हुशार व्यक्तीला तिनं नाकारलं होतं. तसं पाहिलं तर काय बरं कमीहोतं प्रभातमध्ये? पण नडला तो निशाचा अहंकार! त्याला सहजासहजी 'हो' म्हणणे तिच्या स्वभावाला पटत नव्हते. त्याने वारंवार आपली मनधरणी करावी. आपल्याकडे प्रेमाचीभीक मागावी अशी तिची अपेक्षा होती पण तसे झाले नाही.

निशाच्या या स्वभावाला तिच्या घरातली मंडळीही आता वैतागली होती. तिच्या धाकट्या बहिणी विवाहयोग्य झाल्या. परंतु निशाला मात्र अजून मनपसंत जोडीदार मिळत नव्हता. शेवटी कंटाळून नेहा आणि नीला यांचे विवाह निशाच्या आईवडिलांनी उरकून घेतले होते. निशाच्या अहंकारी स्वभावामुळे चांगली स्थळे अलीकडे येईनाशी झाली होती तिचे वय हळहळू वाढत होते. आणि आता मात्र तिला स्वतःची काळजी वाटू लागली होती तिचे पाय काहीसे जमिनीवर आले होते. वस्तुस्थितीची जाणीव होऊ लागली होती. अशातच दैववशात मातापित्यांना झालेल्या अपघातामुळे निशाला आपला आधारच गमवावा लागला होता. एखाद्या रूपगर्वितेच्या थाटात वावरणारी निशा आज विवश व असहाय झाली होती शेजारी राहणाऱ्या काकूंचाच काय तो आधार तिला उरला होता. एका खाजगी कंपनीत तिने साध्या लिपिकाची नोकरी पत्करली होती. वय पस्तीशीकडे झुकले होते आणि सौंदर्यही उतरणीला लागले होते.

तिची अपेक्षा बाळगणारे तरुण आता तिच्याकडे करुणेने बघत होते. कुतुहलाची जागा करुणेने घेतली होती. अशातच निशाला आधाराची खरी गरज भासत होती. पण स्वतःच तिने ती संधी गमावली होती. शेजारच्या काकू तिच्यासाठीं काही स्थळं बघत असत.

एकदा त्यांनी सुचविलेल्या स्थळांतून निशाला एक स्थळ; त्यातल्यात्यात बरे वाटले पण अधिक तपास करता मुलगा बिजवर असल्याचे तिला समजले. राजकुमाराची स्वप्ने पहाणारी निशा आज बिजावराचा स्वीकार करण्याइतकी अगतीक झाली होती. अनिच्छेने का होईना पण या स्थळाचा विचार तिने केला.

आज निशा लग्नाला उभी होती. प्रत्यक्ष वराला तिने अद्याप बघितले नव्हते. तिचा विवाह साध्या पद्धतीने अन् निवडक आप्तांच्या साक्षीने व्हायचा होता. गावातील एका मंदिरात वऱ्हाडी मंडळींची वाटबघत ती उभी होती. विवाहाची वेळ जवळ येऊ लागली तशी ती कावरी बावरी झाली. बोहल्यावर उभी राहिली. मंगलाष्टके संपताच देवाच्या साक्षीने तिने आपल्या नियोजित पतीला माळ घालण्यासाठी नजर उंचावली आणि अचानक तिचे हातपाय लटपटू लागले,! डोळे भरून येऊ लागले, कारण समोर उभा होता तो प्रभात ! बिजवर, तिचा नियोजित पती! एकेकाळी तिच्या अपमानानं छिन्न झालेला सोज्वळ तरुण ........ विवाह आटोपून पतीगृही जाण्यासाठी टॅक्सीतून निशा निघाली होती. जाता जाता आपला बंगला तो न्याहाळीत होती. आणि गतजीवनातील आठवणींचा पट तिच्या नजरे पुढून साकारत होता........ नियतीच्या हातातली ती एक बाहुली ठरली होती.

●●●





# दिवाकरांच्या नाटयछटा

महेश संत
S. Y. B. Sc

मराठी साहित्यात नाटयछटा हा प्रकार इंग्रजी वाङ:मयातील कर्टन लेक्चर म्हणून ज्या नावाने ओळखतात त्यावरुन आला असला तरी मराठीतील नाटयछटांची पद्धत अगदी भिन्न आहे. नाटयछटांना गद्यकाव्य म्हटले तरी काहीही हरकत नाही. नाटयछटा हा वाङ:मय प्रकार दोन प्रकारचा आहे. १) वर्णनपर २) टीकात्मक किंवा बोधात्मक नाटयछटा अगदी थोडक्यात लिहिल्यास तिचे सौंदर्य वाढते. पानेच्या पाने भरुन लिहिल्यास त्यात अतिशयोक्ती होऊन ती कंटाळवाणी वाटते भावगीताची जी लक्षणे असतात तीच लक्षणे नाटयछटेची असतात. हा प्रकार एका दृष्टीने सोपा वाटतो पण लिहिण्यास अत्यंत अवघड असा आहे.

नाटयछटा हा वाङ:मय प्रकार दिवाकरांना रॉबर्ट ब्राऊनिंगच्या ड्रॅमॅटिक मोनोलॉग वरून सुचला आणि त्याला नाटयछटा हे नांव प्रा. वा बा. पटवर्धन यांनी दिले. नाटयछटेत एकच पात्र असते. त्यातील पात्र बुद्धिमान नसते तर रोजच्याच जीवनात वावरणारी साध्या साध्या व्यक्तींची स्वभावचित्रे त्यात रेखाटलेली असतात. नाटयछटेत स्वगत भाषण असते, प्रत्येक माणसाच्या ठिकाणी दौर्बल्य असते, त्यांचे अविष्कारण करायचे, तसेच तात्विक, काल्पनिक, जग व कठोर व्यावहारिक जग यामध्यें दारुण विरोध मनाच्या दुर्बलतेमुळे कसा दिसून येतो याचा मार्मिक पण मृदू उपहास करावयाचा हाच प्रधान हेतू बऱ्याच नाटयछटांच्या बुडाशी असतो. नाटयछटा व स्वगत भाषण अथवा मनाशीच संवाद हा सारखा असल्याने तिची भाषा लेखी भाषेपेक्षा निराळी असते. नाटयछटे मधून शब्दांची काटकसर त्वरित होत असल्याने नाटयछटेत काही विराम चिन्हांचा उपयोग करावा लागतो. नाटयछटेला तिच्या मर्यादेबाहेर जाता येत नाही. दिवाकरांच्या नाटयछटेत ब्राऊनिगप्रमाणे पद्य आहे तर गद्य नाही. नाटयछटेचे लघुनिबंधाशी बरेच साम्य आढळते. तसे नाटयछटेची भाषा ही नाटका-सारखी काव्यमय असते.

दिवाकर यांचे संपूर्ण नांव शंकर काशिनाथ गर्गे, 'दिवाकर' या टोपण नावाने त्यांनी नाटयछटा लिहिल्या. दिवाकरांची सौंदर्यदृष्टी फार चोखंदळ होती. त्यांचे वैयक्तिक जीवन जरी जनतेला अज्ञात असले तरी आपल्या नाटयछटेतून त्यांनी वारंवार; त्यातील प्रसंग वाचकांना परिचित करून दिलेले आहेत. त्यांचे हे लिखाण संकलित केले तर त्यांच्या मानसिक उत्क्रांतीचे एक प्रकारचे शब्दचित्र निर्माण होऊन त्यात त्यांच्या जीवनाचा गाभा आपणास सापडेल. त्यांचा लिखाणाचे बाह्य स्वरुप जरी वास्तव स्वरुपाचे असले तरी त्यांचे अंतरंग व तात्विक प्रतिष्ठा गूढगुजनात्मक आहे.

वाचकांच्या मनाची पकड घेण्यासारखे काही विशेष गुण दिवाकरांच्या साहित्यात किंवा नाटयछटेत आहेत प्रमाणबद्धता, अर्थभारत, व अल्पाक्षरत्व हे तीन गुण त्यांच्या नाटयछटेत विशेषत्वाने जाणवतात. त्यांच्या नाटयछटेचे आणखी एक वैशिष्ठ्य म्हणजे उत्कृष्ठ कलाकुसर करीत असतांना विसंगती दाखविण्यापेक्षा स्वभावातील विविध तरंग दाखविण्यात व सूचकतेत त्यांच्या नाटयछटा रंगतदार होतात. "मास्तर, कारकून, उतारू, वधूचा अगर वराचा बाप अशा समाजातील व्यक्तींच्या स्वभावातील विसंगती दाखविण्यासाठी त्यांनी ह्या वाङमय, प्रकाराचा वापर केला. १७-१८ वर्षांत

त्यांनी अवघ्या ४५ नाटचछटा लिहिल्या त्यातल्याहीं उत्कृष्ठ काढल्यानंतर ८–१० च निघतील तरीही एवढ्या थोड्या भांडवलावर त्यांनी मराठी साहित्यात आगळेच स्थान प्राप्त केले आहे. मानवी अंतःकरणाचा व स्वभावाचा दिवाकरांचा अभ्यास जबरदस्त होता. क्रूरता, स्वार्थ, अहंकार, रुढीप्रियता ढोंगीपणा, कृतघ्नता, हावरेपणा अन्याय व विषमता हे दोष माणसात आढळतात त्यामुळे या जगाला नरकाची कळा आलेली आहे. ज्यामुळे जगात गरीब, कष्टाळू, गुणी, ध्येयवादी लोकाना जगणे अशक्य होते असेच जणू दिवाकरांनी आपल्या नाटचछटातून दाखवून दिले आहे

दिवाकरांची एकएक नाटचछटा म्हणजे मानवी दोषावर व विसंगतीवर घातलेला घणाचा एकएक घाव आहे नाटचछटेच्या आटोपशीर पणात केवळ कला नसून सामर्थ्य आहे. दिवाकर हे केशवसुतांचे. उपासक होते. मानवतेसंबंधी त्यांच्यामनात अपरंपार प्रेम होते. मानवतेची विटंबना करणाऱ्या सामाजिक घटकांवर त्यांनी फटके मारले.

दिवाकरांच्या नाटचछटांकडे मराठी टीकाकारांचे लक्ष गेल्यावर त्यांना अनेक टीकाकार लाभले. दिवाकरांचे विविध लिखाण म्हणजे त्यांच्या वैयक्तिक व लौकीक जीवनाची, वाचनाची, भावनांची चिंतनाची आणि अनुभवाची दैनंदिनीच होय. त्यांचे जीवन समजावून घेतल्याखेरीज त्यांच्या वाङ्मयाचा अर्थ समजणार नाही. इतके त्यांचे जीवन वाङ्मयात प्रतिबिंबित झालेले आहे. दिवाकराचा सारा जन्म दुःखाशी. दारिद्र्याशी झगडण्यात गेला आपल्या आवडत्या माणसांचे मृत्यू त्यांनी जवळून पाहिले. जीवनात जे सोसले ते साहित्यात मांडले "अहो मला वाचता येतय" कारकून, फाटलेला पतग, अशा किती तरी नाटचछटा हृदय पिळवटून टाकणाऱ्या आहेत. दिवाकरांच्या नाटचछटा म्हणजे खरोखरच जगाच्या व स्वर्गाच्या फाटलेल्या दुदवी आणि ध्येयवादी पतंगाचा आत्मगत आक्रोश आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही.

* * *


कोठल्याही पुस्तकासाठी —
शालेय, महाविद्यालयीन, पॉलिटेक्निक
आर्टस् – कॉमर्स – सायन्स
त से च
कथा, कादंबरी, धार्मिक – पुस्तके
ग्रीटींग कार्डस् लग्न पत्रिका यासाठी

वृंदा बुक डेपो
पंजाब बँके समोर, म. गांधी रोड
जळगांव ४२५००१

आमचेकडे सर्व प्रकारचे क्रीडा साहित्य अत्यंत चांगले आणि माफक भावात मिळते. तसेच व्यायामाचे साहित्य आम्ही पुरवितो. समक्ष अगर पत्राद्वारे चौकशी करा.

सर्व प्रकारच्या क्रीडा साहित्याचे प्रमुख विक्रेते –

स्थापना १९३७ ☎ ४३७८
खान्देश स्पोर्टर्स
नवी पेठ, जळगाव




# माझी प्रेम कहाणी


महावीर एम. जैन
F. Y. B. Com.


काही गोष्टी बोलायच्याच राहून जातात. आणि एकदा वेळ निघून गेली की बोलताही येत नाहीत.

कधी संकोचामुळे,......

कधीं जनलज्जा,

कधी मुग्ध स्वभाव .. ...

कशाही मुळे असेल पण हे बोलायचं राहूनच जातं !

स्पष्ट आणि खरंच, सांगायच झालं! म्हणजे मला तो दिवस आजही आठवतो...

त्यावेळी मी दहावीला, नव्या वर्षी पहिल्या दिवशी शाळेत गेलो होतो ..

शाळेतली ती मुलगी मला खरोखरच फार आवडली होती. नववी पर्यन्त ती आमच्या वर्गात नव्हती.

मी तिला पहिल्या वेळी पहिल्या दिवशी पाहिलं आणि पाहतच राहिलो!

आपल्या वर्गात इतके टपोरे डोळे असणारी, गव्हाळ रंगाची ही मुलगी कोण बरं असावी?

... त्या वेळी मी फक्त पाहतच राहिलो, आणि स्वतः ला नकळत विसरूनही गेलो.

नंतरची आठवण म्हणजे शाळेच्या सहलीची, एका खेळात तिच्याशी ओळख झाली अन् तिनं आपलं नांव 'सुनिता' असं सांगितलं.

नांव देखील किती सुंदर आणि सुरेख! ऐकणाऱ्याला पुन्हा ऐकावसं वाटावं असं! पैंजणं किणकिणल्या सारखी ती बोलायची. गाण्याच्या भेंड्यात पुढं... सगळ्या खेळात पुढं... मुलगी सुद्धा एवढी बोल्ड असते हे तेव्हा माहित नव्हतं.

सगळ्या मुली खाली मान घालून वर्गात बसणाऱ्या. मुलांशी एकदा बोलायचं! किंवा एक वही मागायची असेल तर हजारदा विचार करणाऱ्या मुलीं मध्ये ही मुलगी निराळीच वाटली.

आणि योगायोग असा की एका रविवारी ती आपल्या आई–वडिलांबरोबर 'राजकमल' चित्रपट गृहात मला दिसली. सुंदर गुलाबी पोषाख, गुलाबीच ओढणी.

मी पण मित्रांबरोबर चित्रपटाला गेलो होतो. वर्गातली एक सुंदर मुलगी म्हणून मित्रांना दाखवितांना अचानकपणे तिने मला पाहिले. आणि अनपेक्षितपणे ती पुढे आली. हसली अन् म्हणाली, 'ए थांब ना जरा.. आई बाबांची ओळख करून देते.'

मी चपापलो होतो मनात झोपाळे झुलू लागले होत. सुचेनासं झालं होतं....

‘ हा आमच्या वर्गातला एका हुषार मुलगा... तिनं ओळख करून दिली. मी चांगलाच लाजलो.

‘घरी ये ना एकदा हिच्या’ बरोबर, तिची आई म्हणाली. मला ह्या कशाचीच सवय नव्हती.

त्या दिवशी चित्रपट गृहात बसूनही, डोळे उघडे असूनही, सिनेमा पाहिला नव्हता.

समोर तीच ... तीच ... तीच ... घरी येतांना वाट नेहमीची होती; परंतु कसली तरी अनामिक धुंदी मला अस्वस्थ करीत होती.

नंतरच्या दिवशी धीर करून मी मोकळे पणाने तिच्याशी बोललो होतो.

वर्गातील मुला-मुलींमध्ये कुजबूज सुरु झाली होती. मुलं टोमणे मारू लागली होती. मुली हसत होत्या.

वर्गात येताच एके दिवशी फळ्यावर माझ्या नांवाची व तिच्या नांवाची बेरीज दिसली ...... ... ... मी हादरलो !

खरं तर असं काही मनात नव्हत माझ्या. वाटलं हे वाचून तिला कायं वाटेल ?

मधल्या सुट्टीत तिला थांबवून मी म्हणालो की, ‘...... मुलांनी भलतं काही तरी लिहीलं. आपण एकमेकांशी बोललो म्हणून सॉरी हं !

वाटलं ! तीच आधी आपल्यावर रागावेल म्हणेल मित्रांना आवर ! हे असलं माझ्या नावांवर काही खपायचं नाही ’ असंच काही म्हणेलं........

पण प्रत्यक्षात घडलं मात्र निराळंच. ती म्हाणाली होती, ‘ छे ! तिकडे काय लक्ष द्यायचं ’ शाळा-कॉलेज म्हटल की असला व्रात्यपणा मुलं करतातच...

माझी स्थिती कशींतरीच झालीं होती. मी किती घाबरलो होतो आणि ही मात्र .......’

.....विचारात मला झोपच आली नाही किती तरी वेळ ...... आणि आली तेव्हा .... स्वप्नात तीच सारखी दिसू लागली .....

गुलाबी धुकं त्यात पंजाबी पोषाखातली, गुलाबी .....संपू नये असं वाटणारे स्वप्न .....

स्वप्नातच तिच्या जवळ गेलो. खूप जवळ..... इतक्या जवळ की काही कळले नाही..... आवेगात मी तिच्या ओठाचं......

आणि अचानक त्याच वेळी मी जागा झालो तेव्हा किती ओशाळल्या सारखं झालं होत मला !

एक बरं आहे, आपली स्वप्नं कुणाला समजत नाहीत दुसऱ्या दिवशी शाळेत तिच्याशी बोलायची हिंमत झाली नाही....

यानंतर बराच कालावधी गेला, शालेज जीवन संपलं. महाविद्यालयीन जीवनाच्या सोनेरी अन् स्वप्नाळू जगतात आमचं पदार्पण झालं.

एस्. एस्. सी. उत्तीर्ण होऊन एम्. जे. कॉलेजात मी आणि सुनिता ... योगायोगाने एकाच वर्गात आलो

तिच्या सौंदर्यातही आकर्षक असा बदल झाला होता. काहीशी अधिक धीट झाल्या सारखी वाटत होती.

पण माझा संकोची व बुजरा स्वभाव मात्र काही बदलला नव्हता तीच येऊन बोलायची; विचार पूस करायची आपले मित्र उघड उघड मला बावळट म्हणतात हे मला कळू लागले होते.

ते म्हणायचे ‘मामाच’ आहे लेकाचा पिक्चरला जा की घेऊन. खूपदा मी धीर करून तिच्या जवळ जायचो पण जवळ जाताच वेगळा विषय निघायचा स्पष्ट बोलण्याचा धीर नव्हता होतं !.

‘ अत्तराचे दिवस गंध घेतल्या विनाच उडत होते ’ ‘ आपल्या ह्या स्वभावाला काय करायचं ’? मला काहीच कळत नसे. त्यावेळी मला स्वतःचा केवढा राग यायचा! एरव्ही मित्रांमध्यं वाद करणारा, पोपटा सारख चुरुचुरु बोलणारा मी, “ माझं तुझ्यावर प्रेम आहे! ” ( I LOVE YOU. ) हे वाक्य बोलतांना मात्र चाचरलो होतो.

आणि आलेलो नामी संधी गमावली होती. पुन्हा सिनियरच्या वर्षी ती माझ्याच वर्गात आली तिला पाहीलं......आणि ... मला असं वाटलं त्यावेळी जणू आकाश पाताळ एक झालं आहे ! अनं मी स्वतःचं भान हरवून गेलो. भानावर आलो, तेव्हा समजलं की खूप उशीर झाला आहे .. कारण ..... तिच्या गळ्यात मंगळसूत्र होतं.

नंतर मी कधीच तिच्याशी बोलू शकलो नाही...

काही काही गोष्टी बोलायच्या राहूनचं,
जातात हेच शेवटी खरं !

* * *

# कवींच्या कविता

रघुनाथ जंगले
S. Y. B. Sc.

कवींच्या कविता म्हणजे
एक भास असतो क्षणाचा
जिवंत वाटणाऱ्या जगाचा
मनाच्या सागरातील एखाद्या बिंदूचा
फेसाळत किनाऱ्यावर आपटणाऱ्या लाटेचा
आकाशाला जाऊन भिडणाऱ्या वेदनेचा !
कधीतरी लाभणाऱ्या क्षणिक आनंदाचा

* *

# समजतं पण –

अनिल जी. पाटील
S. Y. B. A.

समजतं पण कळत नाही
कळलं तरी वळत नाही
लोक म्हणतात तेही खरेच-
जित्याची खोड मेल्याशिवाय जात नाही !

या जगात पैसा प्यारा
मायेचा हा सारा पसारा
पैशाभोवती नाचते दुनिया
नाही प्रेम दया माया !

सारं डोळ्यांना रोज दिसतं
तरी दृष्टी बदलत नाही
बदल तसा होत नाही
समजत पण ......

भावावाचून देव नाही
गावावाचूल शीव नाही
आजचा दिवस उद्या नाही
उद्या आपला अंकित नाही
म्हणून काहीतरी करावसं वाटतं...

पण काय करावं
ते समजत नाही..........
समजल तरी कळत नाही
कळलं तरीं वळत नाही
समजतं पण.........

* * *

# विना सहकार नही उद्धार!

## मु. जे. महाविद्यालय कंझु. को-ऑप. सो. लिमिटेड.
## जळगाव

विद्यार्थ्यांना लागणाऱ्या उपयुक्त वस्तू, लेखन साहित्य, तसेच सर्व प्रकारची ऑफिस स्टेशनरी व सौन्दर्यप्रसाधने यांची माफक दरात व अत्युत्तम दर्जेदार मालाची विक्री करणारी जळगावातील एकमेव संस्था-

ठिकाण- मु. जे. महाविद्यालय परिसर, जळगाव

**संस्थेच्या ग्राहक भांडारातूनच आपली खरेदी करून आपल्या सेवेची आम्हास संधी द्यावी.**

**" ग्राहकांचा संतोष हेच आमचे ध्येय "**

राजाभाऊ एन्. कोलते
सेक्रेटरी

प्रा. जे. टी. अत्तरदे
चेअरमन

मु. जे. महाविद्यालय कंझु. को-ऑप. सोसायटी लि. जळगाव.




# दुष्काळी स्थिती आणि ग्रामीण जीवन


निवृत्ती खडके
S. Y. B. A.


गेल्या दोन लागोपाठ आर्थिक वर्षात संपूर्ण महाराष्ट्रात दुष्काळ पडल्यामुळे महाराष्ट्रातील शेतकरी व ग्रामीण विभागातील शेतीवर प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे अवलंबून असलेल्या गरीब जनतेची व लघुव्यावसायिकांची आर्थिक स्थिती ही फार हलाखीची तसेच चिंताजनक अशी झालेली आहे. दुष्काळाचा फटका बसलेल्या महाराष्ट्रातील मोठ्या ग्रामीण विभागांतील लोकांच्या जीवनावर विपरीत परिणाम झालेले आहेत.

अशा परिस्थितीत शासन काही उपाययोजना आखते. वास्तविक या उपाययोजनांचा उद्देश हा असतो की, दुष्काळग्रस्त भागातील लोकांना दुष्काळी स्थितीतून काही अंशी का होईना सुटका मिळावी. या उपाय योजनांची अंमलबजावणी प्रशासन करीत असते. ही अंमलबजावणी करीत असतांना दुष्काळाचे मूल्यमापन योग्य अशा पद्धतीने होत नसल्यामुळे दुष्काळग्रस्त असूनही निम्म्याहून अधिक लोक उपेक्षित राहतात. त्यासाठी अशी पद्धत शासनाने तयार करावी की ज्याद्वारे खऱ्या दुष्काळग्रस्तांना उपेक्षित राहावे लागणार नाही. ' पीक-पैसेवारी ' या प्रक्रियेत सुधारणा करुन ती लागू करण्यास हरकत नसावी.

ग्रामीण विभागात दुष्काळाचा फटका बसल्यानंतर त्यांचे प्रश्न व समस्या तेथेच संपून जात नाहीत. त्या आणखी वाढतच जातात. अल्पप्रमाणांत राहिलेल्या पिकांची व ओलीताखाली असलेल्या पिकांची या परिस्थितीत चोरीं होतेच होते. त्यानंतर घरफोड्या दरोडे यांचे प्रमाणही वाढते. प्रसंगी ग्रामीण विभागातील लोकांना जीवाशी मुकावे लागते. त्यानंतरच्या कोर्टकचेऱ्या, तालुकावर व जिल्ह्याच्या गांवी निरर्थक फेऱ्या माराव्या लागतात.

दुष्काळाचा विपरीत परिणाम ग्रामीण सामाजिक जीवनांवर फार मोठ्या प्रमाणांत होतो. सांस्कृतिक कार्यक्रमांकडे दुर्लक्ष केले जाते. नातेवाईकांचा संपर्क तुटतो. तसेच आर्थिक टंचाईमुळे किरकोळ बाबींवरून सामाजिक संबधांमध्ये दुरावा निर्माण होतो. त्यांत ओलावा रहात नाही. समाजात क्वचित प्रसंगी जातीय दंगे, संघर्ष होण्याचीही शक्यता असते.

पिण्याच्या पाण्याची तसेच सांडपाण्याची समस्या ही अधिकच उग्र होत जाते. त्यावरुन भांडण-तंटे होतात. या समस्या सोडवितांना शासनालाही नाकीनउ, येतात. यावरील उपाय योजना फारशा यशस्वी होतातच असे नाही. अर्थात यांत शासनाची काही चुकी नसली तरी जनतेला त्रास मात्र होतो एवढे नक्की.

शिक्षणावरही दुष्काळाचा बऱ्याच प्रमाणांत परिणाम होतो. ग्रामीण विभागातील विद्यार्थ्यांना टंचाई परिस्थितीत शिक्षण घेतांना फार अडचणी येतात. काही वेळा परीक्षेचे फॉर्मस् भरणे त्यांना पैशांअभावी अवघड होऊन बसते. परिणामी त्यांच्या शिक्षणावर त्याचा विपरीत परिणाम होऊन स्पर्धेत ते मागे फेकले जातात.

शेतकऱ्यांच्या जीवनावर दुष्काळाचा खोलवर वाईट प्रभाव पडतो. शेती तयार करणे, कुटुंबाचे पालन पोषण, मुलांचे शिक्षण, कर्ज असल्यास त्याचे व्याज, गुरांचा चारा अशा एक ना अनेक बाबींसाठी शेतकऱ्यांना पैसा हवा असतो अशा वेळी पुन्हा नवीन कर्जाची उचल होऊन ग्रामीण विभागातील बऱ्यापैकी आर्थिक स्थिती असलेले लोक याचा फायदा घेतात. शेतकरी हा आणखी खोल खड्डयात जाऊन पडतो.

राजकीय पुढारी व नेते अशा परिस्थितीत लोकांच्या खराब आर्थिक स्थितीचा फायदा उचलून आपला स्वार्थ साधतात.

अशा प्रकारे दुष्काळी स्थितीत ग्रामीण जीवन हे विस्कटून जाते. त्याची एखादी विशिष्ट प्रतिमा शिल्लक राहत नाही. सहनशीलतेचा अंत झाल्यावर उद्रेक न होता उलट दारिद्र्यांत राहण्याची ग्रामीण लोकांना सवयच होते. अशा या ग्रामीण जीवनाचा सूक्ष्म अभ्यास करुन त्यांच्या जीवनाच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वांनी आपापल्या परीने कार्य केले पाहिजे तरच भारतातील ७०% ग्रामीण जनता दारिद्र्य रेषेच्या वर येईल. पर्यायाने भारताची प्रगती होईल.

* * *


दूध,
दही,
तूप
मिळण्याचे एकमेव ठिकाण-

**सुभाष डेअरी**

सुभाष चौक, जळगाव
मालक- बन्सीलाल इंद्राजी टाक

☎ घर ६०९४

**उपाध्ये झेरॉक्स**

मराठी-हिन्दी-इंग्रजी टायपिंग
डुप्लिकेटींग व झेरॉक्स करीता

संपर्क- दुकान नं. २, एम्प्लॉयमेंट एक्स्चेंज-समोर, जिल्हा पेठ, जळगाव ४२५००१

☎ ४१९३
घर ५५८१

**हॉटेल युवराज**

**बीअरबार**

१३, पोलन पेठ, शिवाजी रोड,
जळगाव

शाकाहारी व मांसाहारी जेवणासाठी
उत्कृष्ट ठिकाण—

गिऱ्हाईकांचा संतोष
हेच आमचे ध्येय !




# सालदार


नरेंद्र एम. तोरवणे
M. Sc. II


आमच्या गावात शिरलं की, पहिलंच शेत लागतं ते पाटलांचं. तसं ते शेत गावातील इतर शेतकऱ्यांच्या मानानं खूप मोठं. नुसत्या चारपाच बैलगाड्या. प्रत्येक बैलगाडीवर वेगळाच गडी. त्यापैकीच हरीबा हा एक.

हरीबाला पाटलाच्या स्वभावाची चांगलीच जाणीव होती, तरीसुद्धा पोटासाठी काहीतरी हालचाल करावी या हेतूने एका वर्षापासून पाटलाकडे सालदारकीचे काम करत होता.

हरीबाच्या अगोदर पाटलाकडे निंबा नावाचा सालदार होता. साल भरुन गेलं म्हणून निंबा, पाटलाकडे गेला, तेव्हा पाटलाने रागारागानेच एक सणसणीत रपाटा निंबाच्या थोबाड्यात मारला मिश्यांवर पीळ देत त्यानें एक लाथ निंबाच्या कंबरड्यात मारली आणि आपल्या रागट आवाजात गरजला,-

" मन्हं कालदिन जे शेंगासनं पोतं चोरीले गयेना ते तूच लिघ, उगामुगा निंघी जाय, आते नही ते परिणाम वाईट व्हयीन "

शेवटी गरीबाचा आवाज कुठपर्यंत पोहचणार ? बिचारा निंबा आपल्या नशिबाला दोष देत घरी आला.

काम करताकरताच हरीबाला हा प्रसंग आठवला. कारण हरीबाचे सुद्धा वर्ष संपण्यात आले होते आणि त्याला सुद्धा याच चिंतेने ग्रासले होते की,-

" पाटील, निंबासारखे तर आपले हाल करणार नाही ना ? "

हरीबा शेतातून थकून भागून घराकडे परतायला निघाला सर्वांग घामाने बरबटलेलं होते. धोतर धुळीने माखलं होतं. सकाळपासून चरायला गेलेल्या शेळ्या, मेंढ्या आपल्या गळ्यातील घंटीचा नाद करीत जणू आजचं काम संपलं असा संदेशच हरीबाला देत होत्या. सूर्याच्या तांबूस किरणात त्याचा चेहरा उदासवाणा वाटत होता. पक्ष्यांचा किलबिलाट ऐकून तो अधिकच बिथरला. कारण त्याच्या डोळ्यासमोर होती त्याची तान्हुली, तान्हुलीला भेटण्याची ओढ त्यांला लागली होती.

तान्हुलीचा विचार डोक्यात शिरताक्षणीच त्याच्या पावलांनी वेग धरला. लवकरच त्याने आपली झोपडी गाठली. झोपडीच्या एका कोपऱ्यात ठेवलेल्या बादलीभर पाण्याने त्याने हात, पाय व तोंड धुतले. धोतराच्या सोग्याला तोंड पुसून घरात शिरला आणि आपली पत्नी बकुळेला म्हणाला.

" बकुळा तान्हुलीले दवाखानामा लयी गयी थी का ? " असं म्हणतंच तो तान्हुली झोपलेल्या खाटेवर बसला आणि त्याला धक्काच बसला! कारण तिच्या अंगात खूपच ताप होता. तान्हुलीच्या

सर्वांगावरून हात फिरवत असतांनाच तो बकुळेवर खवळला,—

" तान्हुलीले चहा करी दिनथी का ? "
बकुळापण रागानेच म्हणाली,

" चहा काही मना रंगतनी करी देवू ? "
सकाळनं जे दूध व्हतं, त्या दूधनी मी तुमले चहा करी दिनथी, मनजोडे काय पैसा शेतस, ते मी गूळ आणि चहा लयी येवू ? "

एवढे बोलून तिने बोकल्यात ठेवलेले राजूचे पत्र हरीबाला दिले.

२४, इंजिनियरींग कॉलेज होस्टेल
पुणे– १२

तीर्थरुप दादा,

आपण गेल्या पंधरा दिवसापासून पैसे पाठवले नाहीत, त्यामुळे माझे फारच हाल होताहेत. खानावळवाल्याने पैसे नाहीत म्हणून जेवण बंद केले आहे. कॉलेजची परीक्षा फी भरण्याची मुदत संपून गेली तरी मी फी भरली नाही. आता लेट फी भरावी लागेल. कृपया आपण लवकर पैसे पाठवा मला घरची परिस्थिती माहित आहे पण नाईलाज आहे. तान्हुली मजेत असेलच.

ती. सौ. आईस सा. न.

आपला आज्ञाधारक,
राजू

पत्र वाचून क्षणभर तो पत्राकडे आणि तान्हुलीकडेच पाहू लागला. काय करावं हे त्याला सुचेना?

तोच बकुळा हरीबाला म्हणाली, " आवं, जुवारना घाटा करेल शे मी, जील्या तुमी आते. "

हरीबा पाटावर बसला त्यांन जेवण केलं दिवसभर कामानं थकलेल्या हरीबाला असं वाटत होतं की, घरी गेल्यावर तरी आनंदाने दोन घास घालवता येतील. परंतु परिस्थिती वेगळीच होती. तरीही त्यांने परिस्थितीशी खंबीरपणे तोंड देण्याचा निश्चय केला आणि बकुळेला म्हणाला.

" मनं साल भरामा येल शे. सकाय मी पाटीलकडतीन पैसा मांगी लयीसू " तेवढयात तान्हुलीने टाहो फोडला. बकुळा तान्हुलीजवळ गेली आणि तिला पाजू लागली. हरीबा दिवसभर काम करून बराच थकला होता. म्हणून त्यांने खाटेवर अंग टाकले. हरीबाला गाढ झोप लागली होती. तोच कोंबडयाने बांग दिली.

बकुळा हरीबाला उठवू लागली, " आवं! उठाना, तुमले कामले जावानं शे ना ? "

हरीबा उठला, उठल्याउठल्याच त्यानं तान्हुलीच्या अंगावरुन हात फिरवला. ताप उतरण्याची काहीही चिन्हं दिसत नव्हती. परंतु ताप अजूनही वाढतच होता. त्यामुळे तो मनात कचरला आणि बकुळेला म्हणाला,

" आज, कामले जावू का ? "

बकुळा म्हणाली,

" जायी या कामले, पाटीलकडतीन पैसा भी लई या आणि ई लागा "

हरीबाला नाईलास्तव कामाला जावं लागलं

शेतात आल्यावर त्याचे कामात मन लागेना. हातातले काम सोडून तो पाटलाच्या घराकडे जाऊ लागला. वळणावरच त्याला पाटील भेटला. पाटील रागातच म्हणाला.



" काय हन्या! काम नको तुमले, फिराले जोयजे हं "

हरीबा काकुळतीला येऊन म्हणाला
" मी तुमनीचकडे यी राहनतू दादा. "
तोच पाटील गरजला,
" कसाले यी राहनता तू ? "
" दादा,!

मनी तान्हुली आजारी शे. तिले दवाखानामा लयी जानं शे. आणि पुनातीन भी राजूनं पत्र येल शे, पैसा लागाव शेतस "

त्याचं हे बोलणं ऐकून पाटील अधिकच रागट नजरेनं बघत हरीबाला म्हणाला.

" साल भरनं म्हंजे तुमले पैसा जोयजे. धान्य जोयजे. काहीना काही कारन तुमी दखाडतस नारे! काम कर व्हंय पहिले. मंग भिळथीनना पैसा. मी काय पयी चालनू का ? का मनी इमारत उपाडी लयी चालनू ? "

पाटलाच्या या बोलण्यामुळे हरीबाच्या तळपायाची आग मस्तकाला भिडली, परंतु तो करणार तरी काय ?

पाटलाशी वाद न घालता तसाच तो घराकडे वळला. रस्याने जातांना त्याच्या मनात एकच विचार सारखा घुटमळत होता.

" तान्हुलीले दवाखानामा लयी जासू, पण पैसा नहीत. राजूले भी पैसा कसा काय देवू ?

असा विचार करत असतांनाच तो झोपडीजवळ येवून पोचला. तोच त्याच्या डोळयासमोर हुसेन उस्तादचा चेहरा तरंगू लागला. तो तसाच माघारी परतला आणि हुसेन उस्तादच्या अड्डयाजवळ येवून पोचला. हुसेन चिलीम फुंकत बसला होता. जवळच शेकोटी पेटवली होती.

हरीबाला पाहताच हुसेन त्याला म्हणाला
" अरे यार हन्या! कैसा क्या आया रे तू मेरे पास. ! "

हरीबाने हुसेन उस्तादजवळ सर्व माहिती कथन केली आणि पैसे न मिळाल्यास माझ्या राजूचे इंजिनियर होण्याचे स्वप्न अपूर्ण राहील आणि माझी तान्हुलीमुद्धा औषधोपचारावायी मरेल.

हुसेन उस्तादने सर्व शांतपणे ऐकले व हरीबाला म्हणाला,

" डर मत हरीबा ! यार! साले पाटील ईसरला वाटत्ये हुसेन उस्ताद को! कैसा "घाम का दाम " देता नही वो मेरे यार को देखता मैं उसकू. चल हरीबा मेरे साथमे. "

हुसेनने दाखवलेल्या आपुलकीमुळे हरीबा भारावून गेला तसेच पाटील पैसे देतो किंवा नाही हा विचार तत्क्षणीच त्याच्यां मनातून नाहीसा झाला, जिवात जीव आल्यासारखं वाटल्यावर तो हुसेनला म्हणाला,

" तू देव माणूस भेटना गडचा माले " दोघेही पाटलाच्या घराजवळ येवून पोचली हुसेनने आपल्या भसाडच्या आवाजात आरोळी मारली,

" अबे, वो पाटीलके बच्चे! बाहर आता है क्या मैं अंदर आवू ? "

कोणीच होकार देत नाही असे पाहून हुसेनने लाथ मारून दरवाजा तोडला.

हरीबा दरवाजाच्या बाहेरच उभा होता. थोडया वेळाने एक जोरदार किंकाळी " माय वं

मनी माय ! " हरीबाच्या कानावर पडली तोच नोटांचे पुडकेचे पुडके छातीशी धरत हुसेन दारा-बाहेर आला.

हरीबा पैश्यांच्या लालचेने हुसेनकडे धावला व म्हणाला, —

" देरे दादा देरे माले लवकर पैसा. "
तेवढ्यात हुसेन हरीबाला म्हणाला,
" अबे हरीबा यार, यह चक्कू तो पकड थोडी देर "

तो असे बोलल्यानंतर हरीबाने रुमालात असलेला चाकू उचलला, हुसेनने त्याला थोडेफार पैसे दिले व दिसेल त्या दिशेने हुसेन पळत सुटला. तो पळत असेपर्यंत हरीबा त्याच्याकडेच पाहात राहिला तो दृष्टिआड झाला.

तेव्हा पैश्यांच्या लालचेने हातात घेतलेला चाकू हा रक्ताने माखलेला आहे ही त्याला प्रथमच जाणीव झाली तो चाकू त्याने तेथेच फेकला. आणि झोपडी-कडे पळाला

झोपडीजवळ येवून पाहातो तर झोपडीजवळच्या बायका आणि बकुळा जिवाच्या आकांताने रडत होत्या. तर जवळच पांढ्या फडक्यात त्याची तान्हुली कायमचीच निजलेली त्याला दिसली. हे दृश्य पाहून त्याच्या हातात असलेले पैसे गळून पडलेत आणि त्याने जोरदार आरोळी ठोकली,-

" तान्हुली वो मनी तान्हुली "

आणि तेवढ्यात पोलीसांची जीप आवाज करत आली आणि झोपडीजवळच थांबली.

* * *


सोनाली टाईम्स्
सर्व प्रकारची घड्याळे मिळण्याचे
विश्वसनीय ठिकाण -

सोनाली टाइम्स्
१८, नवी पेठ, यु. को. बँकेजवळ,
जळगाव
४२५००१

प्रोप्रा.- बी. एन. चौधरी

विलास टेलर्स -
* जेन्टस् स्पेशालिस्ट *

विलास टेलर्स
जिल्हापेठ, एस. टी. स्टँडच्या मागे,
जळगाव (महाराष्ट्र)
४२५००१

प्रोप्रा.- विलास पाटील




# आम्ही 'तो' जिंकला


संदीप भिसे
धनंजय राजहंस
T. Y. B. Com.


'पुरुषोत्तम करंडक जळगावकडे'! 'जळगावच्या मुलजी जेठा महाविद्यालयानें यंदाचा पुरु-षोत्तम करंडक मिळविला! ही बातमी, १ सप्टेंबर रोजी महाराष्ट्रातील सर्व वृत्तपत्रातून झळकताच, समस्त जळगावकरांना अभिमानाचा आणि आनंदाचा सुखद धक्का बसला ! जळगावच्या सांस्कृतिक इतिहासामधील ही एक विषेश घटना ठरली !

पुरुषोत्तम करंडक म्हटला म्हणजे ह्या करंडका-भोवती असलेलं वलयं आणि या करंडकाचा इतिहास नजरे समोर येण अपरिहार्य ठरत. पुरुषोत्तम करं-डकही आतरमहाविद्यालयीन नाटयस्पर्धा महाराष्ट्रा-तील रसिकांच्या आणि नाटयकलावंतांच्या दृष्टि-कोनातून एक प्रतिष्ठेची बाब ठरली आहे. या क्षेत्रातील यशाचा, पुरूषोत्तम करंडक हा मानबिंदू ठरला आहे. १९६३ पासून— ऑगस्ट महिन्यात प्रतिवर्षी ही स्पर्धा घेतली जाते. स्पर्धेचे आयोजन त्रिस्तरीय पद्धतीने केले जाते प्राथमिक फेरीतून गुणानुक्रमे नऊ संघांची निवड अंतिम फेरीसाठी केली जाते व नंतर दुसऱ्या फेरीत अंतिम निवड होते. प्राथमिक आणि अंतिम फेरीसाठी वेगवेगळे तीन परीक्षक नेमले जातात.

आंतरमहाविद्यालयीन नाटयस्पर्धेच्या क्षेत्रात या स्पर्धेने कमालीची लोकप्रियता प्राप्त करुन घेतली आहे. पुण्यामध्ये आयोजित होणाऱ्या या स्पर्धेला प्रतिवर्षी उत्तम प्रतिसाद मिळतो. या स्पर्धेमधून दिग्दर्शन, नाटयलेखन अभिनय, प्रायोगिक एकांकिका यासारख्या विविध क्षेत्रात त्या त्या क्षेत्रातील जाणकार आणि अनुभवी व्यक्तींनीं आपल्या यशाचं शिक्का मोतब केलं आहे. ख्यातनाम दिग्दर्शक श्री. जब्बार पटेल, सुप्रसिद्ध अभिनेते श्री. अमोल पालेकर, नाना पाटेकर, विख्यात नाटयलेखक श्री. सतीश आळेकर यांची नावे उदाहरणादाखल सांगता येतील.

अशा या अभिनव आणि नाटयक्षेत्राला ललाम-
भूत ठरणाऱ्या नाटयस्पर्धेत प्रथम क्रमांकाचं यश
प्राप्त करून घेणं हे आम्हा जळगावकरांचं
कितीतरी दिवसांचं स्वप्नं यंदा साकारलं ! आणि
त्याचा आनंद मनमुराद उपभोगण्याची, या यशात
सहभागी होण्याची जी दुर्लभ संधी आम्ही मिळवू
शकलो, त्याबद्दलचा आनंद व्यक्त करणे शब्दातीत
आहे. पुण्यासारख्या चिकित्सक, सुजाण, अनुभवी अन्
चोखंदळ रसिकांच्या समोर आपला प्रयोग सादर
करणं, हीच एक कसोटी असते. त्यातच सातत्याने
हा करंडक प्राप्त करून घेण्याची अवघड कामगिरी
पेलणाऱ्या पुणेकर महाविद्यालयांच्या स्पर्धेत उतरणे
आणि जळगावसारख्या भागातील महाविद्यालयाने
चक्क पुणेकरांचा पराजय करुन पुरुषोत्तम करंडक
जिकून आणणं ही पुणेकरांना, अन् पर्यायाने स्पर्धेतील
सर्वच सहभागी महाविद्यालयांना धक्कादायक घटना
वाटावी यात नवल ते काय ? परंतु याबरोबरच,
आम्ही सादर केलेल्या प्रयोगाबद्दलचं कौतुक आणि
प्रयोग आवडल्याबद्दलची रसिकांनी दिलेली दाद हा
देखील एक दुर्मिळ आणि अमोल असा अनुभव
आम्हा कलाकारांना कळत न कळत आमच्या परि-
श्रमाची पावती देणारा ठरला. प्राथमिक फेरीतच
आमच्या प्रयोगाच्या सादरीकरणाला जो उत्तम

प्रतिसाद मिळाला, त्यातून आमच्या आणि रसिकांच्याही अपेक्षा बऱ्याच उंचावल्या. दुसऱ्या फेरीत नेस वाडीया महाविद्यालय पुणे, अहमदनगर कॉलेज अहमदनगर, बी. जे. वैद्यकीय महाविद्यालय पुणे, आणि १९८४-८५ चा पुरूषोत्तम करंडक प्राप्त करुन यंदाही तो प्राप्त करण्याची उमेद बाळगणाचा पुण्याच्या मॉडर्न महाविद्यालयाच्या संघाबरोबर आम्हाला सामना द्यायचा होता. जळगाव आणि नगर वगळता बाकी सारेच संघ पुण्याचे होते. अंतिम फेरीत डॉ. मोहन आगाशे, सौ. लालन सारंग, श्री. विश्वास मेहंदळे या नाट्य क्षेत्रातील अनुभवी आणि अधिकारी व्यक्तींसमोर ( म्हणजेच परीक्षक या नात्याने) आम्हास आमचा प्रयोग सादर करावयाचा होता. अन् फलश्रुती आजमावयाची होती. आमच्या प्रयोगाचं नाव होतं ‘ बाळू जोशीला नक्की काय वाटतं ? ’

प्रयोगाला प्रारंभ झाला त्यावेळी नाट्यगृह खच्चून भरलं होतं ! सुरुवातीला प्रयोग हळूहळू स्थिरावत असताना पुणेकर रसिकांनीं आपले विशेष गुण दाखवण्याचा, त्यांच्या नित्याचा प्रथेप्रमाणे प्रयत्न केलाच, परतु कलाकारांनी अशाही परीस्थीतीत दाखवलेला सयम, प्रयोगाचा सांभाळलेला तोल, टिकवून धरलेलं टीमवर्क त्यांच्या लक्षात येताच पुढील सारा प्रयोग प्रेक्षकानी मोठ्या शांततेनं पाहिला. अन् तेव्हाच-यंदाचा करंडक पुण्याबाहेर जाणार ! याची जाणीव पुणेकरांना झाली. आम्हालाही यशाची अपेक्षा नव्हती असे नाही. परंतू म्हणतात ना ...... “ मन चिंतीं ते . . . .” स्पर्धेचा निर्णय रात्री उशिरापर्यंत जाहीर झालेला नव्हता. निर्णय ऐकण्यासाठी आम्ही सारेच मोठे उत्सुक होतो अन् अखेर निर्णय जाहीर झाला. स्पर्धेच्या बावीस वर्षांच्या इतिहासात नगरचा अपवाद वगळता पुण्याबाहेर न गेलेला करंडक जळगावला; आपल्या महाविद्यालयाला मिळाला. अन् महाराष्ट्राच्या नाट्यक्षेत्रात आपल्या महाविद्यालयाने एक वेगळे स्थान प्राप्त करुन घेण्याचा मान मिळवला. निर्णय ऐकताच आम्ही सारे खरोखर भारावलो. आमच्या साऱ्या परिश्रमाचं सार्थक झाल्यासारखं वाटलं ! अंतिम फेरीच्या वेळी सर्वश्री माधव वझे, यशवंत दत्त, सतिश आळेकर या मंडळीची उपस्थिती आम्हाला प्रेरणादायक ठरली. पारितोषिक वितरण समारंभाच्यावेळी सुप्रसिद्ध दिग्दर्शक व अभिनेते श्री. अमोल पालेकर यांच्यासह विशेष निमंत्रितांच्या हजेरीत आमचा प्रयोग सादर करण्याचं भाग्य आम्हाला लाभलं ! या प्रसंगी प्रयोग पाहून झाल्यावर आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना श्री. अमोल पालेकर आणि श्री. मोहन आगाशे यांनी आम्हा सर्वांचं जे कौतुक केलं, त्यापेक्षा अधिक वेगळा बहुमान तो काय म्हणायचा !

हा करंडक मिळवल्यानं जर मुख्य काही साधता आलं असेल तर ते म्हणजे पुण्याबाहेर-जळगावसारख्या शैक्षणिक क्षेत्रात आघाडीवर असलेल्या जिल्ह्यातही उत्तम दर्जाचं सांस्कृतिक कार्य सुरु आहे, साहित्य, नाट्य, अभिनय या क्षेत्रातही या जिल्ह्याची आघाडी आहे, हे— या क्षेत्रातील अनेक मान्यवरांसमोर आम्ही सिद्ध करू शकलो,

आम्ही साऱ्यांनीच मोठ्या उमेदीने, जिद्दीने, अन् उत्साहाने या प्रयोगासाठी अथक प्रयत्न केलेत परंतु करंडक मिळवण्याच जे यश आम्ही प्राप्त करु शकले, त्या यशातील साराच वाटा आमचा आहे, असं मानणं आमच्या दृष्टीने कृतघ्नपणाचं ठरेल ! हेमंत कुळकर्णी. प्राचार्य द. स. नेमाडे, उपप्राचार्य श्री. डी. एच्. महाजन, प्रा. चारुदत्त गोखले, प्रा तेजपाल चौधरी, उपप्राचार्य एम्. के. येवले, डॉ. एस्. आर. चिरमाडे, प्रा. श्रीरंग राजे प्रा. पी. टी. चौधरी आणि प्रा. अभ्यंकर या सर्वांचे मार्गदर्शन, प्रेरणा आम्हास वेळोवेळी लाभली या सर्वांचे आम्ही कृतज्ञ आहोत. तसेच आमचे विद्यार्थीमित्र अमृत सोनवणे, शफी पटेल, धनंजय पाटील, प्रशांत देशपांडे दिलीप अंबीकर, मोहन तायडे यांचेही मनःपूर्वक आभारी आहोत !



पुरुषोत्तम करंडक प्राप्त —

एकांकिका ‘बाळू जोशीला नक्की काय वाटतं?’ मधील यशस्वी कलाकारांची श्रेयनामावली अशी आहे

लेखक- रविंद्र जोशी
दिग्दर्शक- धनंजय राजहंस
निर्मिती प्रमुख- प्रा चारुदत्त गोखले
व्यवस्थापक- प्रा. तेजपाल चौधरी, प्रा. पी. टी. चौधरी प्रा. श्रीरंग राजे
सुत्रधार— संदीप भिसे
बाळू जोशी— संदीप मेहता
पाटील— प्रमोद बाविस्कर
दिवाणजी— शशिकांत गुप्ते
टिक्या महार— संजय कथुरिया
वंड्या— शैलेश मुळे
वडील— धनंजय राजहंस
राणी— कु. कस्तुरी दातार
आजी— कु. विजया साठे
आई— कु. मोहिनी जोशी
मुलगी— कु. आरती वझे

इतर युवक युवति —

कु. स्मिता उपासनी, अनिल देशपांडे, उमेश कोतवाल, मनोज जोशी, शिवाजी चव्हाण
संगीताची बाजू - कौस्तुभ दातार, नितीन केंकरे

ज्या ज्या व्यक्तींचे व संस्थाचे आम्हास अप्रत्यक्षपणे अथवा प्रत्यक्षपणे सहाय्य प्राप्त झाले त्या सर्वांचे आम्ही ऋणी आहोत! धन्यवाद !

* *

## असा समाज हवा आहे–

‘ निसर्गावर माणसाची पकड ज्या प्रमाणात वाढते आहे, त्या प्रमाणात माणसाचे शहाणपण काही वाढत नाही. या शहाणपणाशिवाय आणि आत्मविश्वासाशिवाय समाजाच्या वांच्छित उद्दिष्टांकडे आपण कसे जाणार ? आपल्याला असा समाज हवा की ज्यात परस्परांच्या सहकार्याने सर्वांचीच क्रियशक्ती संवेदनशीलता वाढणार आहे ’–

## – व्यथा

खरे सांगतो तुम्हाला
कवी व्हावेसे वाटते मला !
पण घडतं काय ........
जरा ऐकाल काय
मला जेव्हा कविता सुचते
तेव्हा पेन सापडत नाही
पेन शोधून आणावा तर
कागद हाती लागत नाही.

जर केव्हा –
कागद आणि पेन घेऊन बसावे
तर कल्पना सुचत नाही
आणि सुचलीच एखादी कल्पना
तर शब्द काही आठवत नाही
खरं सांगतो –
पेन कागद शब्द कल्पना
यांचा मेळ बसत नाही
आणि माझी कविता
कधीच लिहिली जात नाही.

* * *

**पाटील विजयकुमार हरी**
T. Y. B. Sc.
रसायन
( मॅगेझिन सेक्रेटरी )

*With best compliments from*

**METRO TAILORS**

Opp. Towar, JALGAON

GENT - SPECIALIST.

मेट्रो टेलर्स

टॉवर समोर, जळगाव







# मे. राका फर्निचर

* स्टील कपाट ऑफिस टेबल्स
* सोफा कम बेड, सोफा सेटस्
* डायनिंग सेट, सनमायका कॉट
* किचन टेबल, किचन रॅक
* रिव्हॉल्व्हीग चेअर, फोल्डींग चेअर्स
* दिवाण, ड्रेसिंग टेबल, यु फोम मेट्रेस
* टी. व्ही. शोकेस, टी पॉय इत्यादी

ऑफिस व गृहोपयोगी स्टील व
वुडन फर्निचरचे निर्माता-

मे. राका फर्निचर

पोलन पेठ, जळगाव. महावीर भुवन, भुसावळ

☎ ३९५२ ☎ २२४१

सजना- अरे छाया, दिपा, तुम्हें मालूम है की कल चांदनी की शादी है और हमें मिलकर उसे कुछ अच्छा सा और बढीया प्रेझेंट देना है। हमे यहाँ कहाँ मिल सकता है।

छाया- मैं बताऊ जलगांव में महावीर के एम्पोरिअम जो की स्टेट बँक के सामने हैं। वहाँ बहोत सी नयीं नयीं चिजे मिलती हैं।

क्यो दिपा क्या ख्याल है तुम लोगोंका।

दिपा- हा बहोत नाम सुना है मैंने इस दुकान का। चलो फोर वही चलते है।

## महावीर एम्पोरिअम

स्टेट बँक समोर, जळगाव



# लोकसंख्या नियंत्रण-काळाची एक गरज-

सुरेशकुमार आर. राणे
T. Y. B. A.

सध्या जगात ज्ञान विज्ञानाचा स्फोट होत आहे, आपल्या देशात मात्र लोकसंख्येचा विस्फोट होत आहे. आपल्या देशासमोर अनेक समस्या असून त्यापैकी लोकसंख्या-वाढ ही एक प्रमुख समस्या आहे. भारतात १९५१ ते १९८१ या काळात लोकसंख्या ३५ कोटीवरून ६८·५ कोटी म्हणजे दुप्पट झाली आहे. लोकसंख्यावाढीचा हा दर धक्कादायक असा तर आहेच. पण त्याहीपेक्षा आर्थिक विकासाचे कार्यात लोकसंख्यावाढ हा एक मोठा अडथळा ठरला आहे. भारताची लोकसंख्या जगात दुसऱ्या क्रमांकावर आहे पण क्षेत्रफळ ७ व्या क्रमांकावर आहे. अन्नधान्य परिस्थिती जेमतेम आहे. कारण खाद्यान्न वाढीचा दर १·३% आहे. तर लोकसंख्या वाढीचा दर मात्र २.५% आहे भारतातील दरडोई उत्पन्न फार कमी आहे व ४०% लोक दारिद्रय रेषेखाली आहेत. १९५१ ते १९७५ या काळात भारतातील बेकारीचे प्रमाण ३% वरून १५% पर्यंत वाढले आहे. लोकसंख्येला आळा घालण्यासाठी भारत सरकारने कुटुंब नियोजनाचा कार्यक्रम कार्यान्वित केला आहे पण यात काही अडथळे येतात.

भारतीय संस्कृतीत विसंगती आहे. भारतीय संस्कृती; मुले ही परमेश्वराची देणगी मानणारी असल्याने लोकांना हा कार्यक्रम आपलासा वाटत नाही. आपली लोकसंख्या ग्रामीण भागात जास्त आहे. यासाठी ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार व्हायला पाहिजे. स्त्री-शिक्षणावर विशेष भर दिला पाहिजे. स्त्री-शिक्षणाचा व लोकसंख्येचा घनिष्ठ संबंध आहे. सुशिक्षित स्त्रिया मर्यादित कुटुंबाचे महत्व अधिक चांगले समजू शकतात. तसेच शिक्षणात गुंतल्यामुळे लग्नाची वयोमर्यादाही वाढते, जीवनमान उंच ठेवण्याची जिद्द वाढते व त्याचा परिणाम लोकसंख्या वाढीवर नियंत्रण ठेवण्यात होतो. भारतात केवळ १९% स्त्रिया १९७१ च्या जनगणनेनुसार सुशिक्षित आहेत व त्यामुळे स्त्री-शिक्षणाचा प्रसार लोकसंख्या वाढ रोखण्यासाठी आवश्यक आहे. स्त्री-शिक्षणाबाबतचे नेहरूंचे विचार लक्षात ठेवण्यासारखे आहेत. ते म्हणतात- If you educate aboy you only educate an individual, If you educate a girl you educate the whole family. स्त्रियांना चूल व मूल या पेक्षा अधिक संधी उपलब्ध करून दिल्यास जनन दर घटण्यास मदत होईल. काही वेळा शिक्षक खेड्यात जाण्यासाठी तयार होत नाहीत. यासाठी सरकारकडून खेड्यात जाणाऱ्या शिक्षकांना प्रोत्साहन दिले गेले पाहिजे.

आपल्या देशातील जनतेला ' लहान कुटुंब सुखी कुटुंब ' या कल्पनेचे महत्व पटवून देणे जरूरीचे आहे. आता महाविद्यालयांमध्ये लोकसंख्या शास्त्राचे शिक्षण दिले जाते, याचा मोठ्या प्रमाणावर प्रचार करून अधिक विद्यार्थी आकृष्ट करायला हवेत. म्हणजे त्यांना शिकत असतानांच लोकसंख्या-वाढीचे आर्थिक सामाजिक परिणाम व विकास इ. बाबींचे ज्ञान मिळून, भावी काळात हे विद्यार्थी अधिक जबाबदार नागरिक बनतील आणि आपले कुटुंब आटोपशीर ठेवतील.

आपल्या देशात गरिबीचे प्रमाण जास्त आहे. गरिबांच्या अपेक्षा अशा असतात की, जेवढी मुले जास्त असतील तेवढी जास्तीची कमाई होईल. या चुकीच्या समजापायी कुटुंबनियोजन कार्यक्रमात अडथळे येतात. तर काही लोकांना म्हातारपणीचा आधार म्हणून जास्त मुलांची आवश्यकता वाटते. यासाठी भविष्यनिर्वाह निधी. वृद्धाश्रम इ. सामाजिक सुरक्षेच्या सोयी वाढविल्यास, वृद्धकाळात मुलांनी सांभाळावे या उद्देशाने मुलांची संख्या वाढविण्याचा प्रवृत्तीस आळा बसेल.

काही लोकांना आपला वंश टिकवण्यासाठी, पुत्राशिवाय मोक्षप्राप्ती नाही किंवा स्वर्गात स्थान नाही असे वाटते. शिवाय पिंडदान करणे, श्राद्धविधी करणे, पितरे घालणे असे बरेच विधी पुत्राशिवाय होऊ शकत नाहीत. या भावनेने ४-५ मुली असूनही पुत्रप्राप्तीसाठी कुटुंब वाढविले जाते. जर धार्मिक कल्पनांमध्ये सुधारणा घडवून आणली तर लोकसंख्या वाढीस आळा बसू शकेल. स्त्री पंतप्रधान होऊन गेलेल्या देशात मुलगा काय, किंवा मुलगी काय, दोहोंनाही समान मानणे आवश्यक आहे-कारण त्याशिवाय जन्मदर कमी होणार नाही.

लोकसंख्यावाढ कमी करणेसाठी सरकारने आर्थिक प्रोत्साहने व सवलती देऊन कुटुंबनियोजनास अनुकूल वातावरण निर्माण करता येण्यासारखे आहे. लहान कुटुंबांना अधिक आर्थिक सवलती दिल्यास मर्यादित कुटुंबांना उत्तेजन मिळेल. फी-माफी, नोकरीत प्राधान्य, पगारवाढ, बढती इ. सवलती द्याव्यात. मोठ्या कुटुंबांना सवलती नाकाराव्यात व हा नियम सर्वांना समान लागू करावा. अलिकडील नवीन कायद्यानुसार मिळणारे प्रसुती भत्ते व रजा ही ठराविक अपत्य मर्यादेपर्यंतच असते. या विशिष्ट मर्यादे-पलिकडील अपत्यप्राप्तीचे वेळी पगारी रजा देऊ नये. परंतू यात सवलत म्हणून अशा वेळी स्त्री किंवा पुरुष, शस्त्रक्रिया करणेस तयार असल्यास त्यांना काही सवलती द्याव्यात.



April 1976 मध्ये तत्कालीन आरोग्य व कुटुंबनियोजनमंत्री डॉ. करणसिंग यांनी नवीन लोकसंख्याधोरण जाहीर करुन लोकसंख्यावाढ कमी करणेचे हेतूने स्त्री-पुरुषांचे किमान विवाहवय अनुक्रमे १८ व २१ वर्षं ठरवून या नियमाचे उल्लंघन करणे हा दखलपात्र गुन्हा ठरविला. परंतु या नियमाची काटेकोरपणे अंमलबजावणी झाली नाही. या विवाहवयामुळे प्रजननकाळ फार जास्त मिळतो. त्यासाठी वरील विवाहवयात स्त्रीचे किमान विवाह-वय २१ वर्ष, पुरुषाचे किमान विवाह वय २५ वर्ष केल्यास प्रजनन काळ कमी मिळेल. कुझिन्सी या शास्त्रज्ञाचे मते १५ ते २० या वयात प्रजोत्पादन क्षमता महत्तम असते. त्यामुळे लग्नास जेवढा उशीर होईल तेवढी प्रजोत्पादन क्षमता कमी होईल. व लोकसंख्यावाढ कमी होण्यास मदत होईल. तसेच प्रसुतीचेवेळी पतीला सक्तीने तिथे हजर रहाण्यास भाग पाडावे म्हणजे स्त्रीला होणारा त्रास व वेदना पाहून पुरुषाच्या मनावर परिणाम होईल व ते आपले कुटुंब मर्यादित ठेवण्याचा प्रयत्न करतील.

1977 मध्ये कुटुंबनियोजन कार्यासाठी शिबीर तंत्राचा उपयोग करण्यात आला व त्यात भरपूर यशही आले परंतु यात काही दोष आढळून आल्याने हा मार्ग सोडावा लागला. या तंत्राचा पुन्हा एकदा सखोल अभ्यास करून यातील सक्तीचा भाग नाहीसा करुन व याकामी स्थानिक पुढाऱ्यांचा उपयोग करून घेतल्यास जननदर कमी करण्यासाठी चांगल्याप्रकारे मदत होईल.

April 1972 मध्ये Medical Termination Act of Pregnancy पास होऊन गर्भपाताला कायदेशीर मान्यता देण्यात आली. परंतु ही सोय काही विशिष्ट ठिकाणीच आहे. त्यामुळे सर्व लोकांना याचा फायदा घेता येत नाही. म्हणून अशा केंद्रांची संख्या वाढवून त्यांची ग्रामीण भागात स्थापना करावी म्हणजे लोकसंख्यावाढ कमी करता येईल.

आणखी महत्वाचे म्हणजे सरकाकडून कुटुंब नियोजनाची जी साधने पुरविली जातात ती अपुरी असतात तर ग्रामीण विभागातील बहुसंख्य जनतेला या साधनांची माहितीसुद्धा नसते. शिवाय त्यांचा उपयोग कसा करावा याचेही ज्ञान नसते. यासाठी निरोध, तोंडावाटे घ्यावयाच्या गोळ्या (oral pills) तांबी बसविण्याची सोय. इत्यादी साधनांचा भरपूर व स्वस्त पुरवठा करून देणे आवश्यक असून त्यांचा उपयोग कसा करावा याचे ज्ञान देणे सुद्धा तेवढेच महत्वाचे आहे. नाहीतर भरपूर साधने उपलब्ध असतांनांही त्याविषयाचे अज्ञानामुळे अपेक्षित फायदा होणार नाही तसेच या कार्यक्रमातील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण आणि नवीन संशोधनावर भर देणे आवश्यक आहे. नवीन-नवीन साधने शोधून या साधनांचा विशष करून ग्रामीण भागात जोमाने प्रचार व प्रसार करायला हवा.

याशिवाय स्थानिक वृत्तपत्रामधून सतत लोकसंख्यावाढ व त्यामुळे होणारे गंभीर परिणाम, तोटे आणि 'लहान कुटुंब सुखी कुटुंब' कसे असते, मोठ्या कुटुंबाच्या मर्यादा इ. विषयावर चांगल्या प्रकारे लेखन झाल्यास वाचकांवर परिणाम होऊन जननदर घटण्यास मदत होईल.

खरे म्हणजे यासाठी जेवढे उपाय योजले तेवढे कमीच, म्हणून या विषयावर जास्तीत जास्त सखोल अभ्यास करून व समाज सहजा सहजी सहमत होईल अशी धोरणे आखून याविषयी कार्य केले पाहिजे. त्याशिवाय आपला देश प्रगती करू शकणार नाही.

लोकसंख्यावाढीमुळे शेतीवर अतिरिक्त भार, यंत्राऐवजी श्रमप्रधान उत्पादनाचे तंत्र, महागाई वाढ, आंतरराष्ट्रीय व्यापारात तोटा, भांडवल निर्मितीचा वेग कमी, खालावलेले आरोग्य, गुन्हेगारी, बेकारी, झोपडपट्टी, भिक्षेकरी, वेश्याव्यवसाय, भ्रष्टाचार, सामाजिक असंतुष्टता इ. अनेक समस्या उदयास येवून त्यांच्या वाढीस पोषक वातावरण निर्माण होत असते. हे सर्व दोष दूर करण्यासाठी प्रत्येक भारतीय नागरिकाने इतर कार्याबरोबर कुटुंब नियोजन करणे हे एक परम् कर्तव्य समजावे व इतरांना सुद्धा पटवून द्यावे.

* * *

# मूडस्

दूरवरुन ऐकू येणारे मुकेशचे गीत......

विझत जाणारी संध्याकाळ......

सिगरेटचा धूर ......

अन् मनातले मृत्यूबद्दलचे विचार......

वाहता रस्ता .....

पमरलेली फुलेच फुले ......

शोधक नजर......

दिसलेले 'लक्ष्य' ......

तिची ती जिवघेणी मुलायम हालचाल......

......... आणि दिल का दर्द! ......

अस्सल कॉलेजीय वातावरण......

अनेक नजरांची जुगलबंदी.....

विश्वचरच्या चर्चा ......

आणि ........

त्याचवेळी प्यूनने लावलेली Exam. ची नोटीस

* * *

सुभाषकुमार पी. चौधरी
T. Y. B. Sc.

लेडिज ड्रेस स्पेशॅलिस्ट

तुरी, पंजाबो, मीडो स्पशॅलिस्ट




**न्यू फॅशन टेलर**

फुले मार्केट दु. नं. ७७ जळगाव (महाराष्ट्र)

प्रो. बी. एस. सोनवणे



आमच्याकडे H M.T., जयको, टाईमस्टार फावरलुबा, अर्लाम आणि सर्व प्रकारचे मनगटो व भिंतीवरची घडयाळे विक्री मिळतील.

तसेच सर्व प्रकारची घडयाळे किफायतशीर किंमतीत रिपेअर करून मिळतील.



**वर्षा वॉच कंपनी**

१७७, नवी पेठ, माहिजी बाजार

मद्रास आनंद भुवन समोर, जळगाव



त्वरित सांगा

जळगाव मधील त्या एकमेव चांदीचे शोरूमचे नाव जिथे तुम्ही.....

१) आपल्या पसंतीचे सेटस् निवडू शकता

२) आपल्या पसंतीच्या भेट वस्तू निवडू शकता

३) आपल्या कडील चांदीच्या दागिन्यांची मोड देवू शकता.




**शिवदास लुकड ज्वेलर्स**

१०९ भवानी पेठ, सराफ बाजार, जळगाव.



जेन्टस स्पेशॅलिस्ट

**न्यू विरा टेलर्स**



न्यू विरा टेलर्स

नगरपालिके जवळ

बळीराम पेठ, जळगाव


# युवकांना आवाहन


कु. विनिता दि. महाजन

S. Y. B. Com.

मॅगेझीन सेक्रेटरी


युवक हा शब्द उच्चारताच आपण केवळ शहरात राहणाऱ्या उच्चभ्रू अगर प्रतिष्ठित समाजातील युवकांचाच विचार करीत असतो. पण खरा युवक कोण ? या संदर्भात विचार करणे आवश्यक आहे. जो युवक खांद्यावर आपली तरुणाई घेऊन, उफाळते तारुण्य घेऊन पुढे झेपावत राहतो- तो तरुण युवक होय. त्याच्या या तरूणाईला बंधन नसते. युवक तो असतो— जो संकटाशी, अडीअड-चणींशी, समस्यांशी सतत झुंज घ्यायला सिद्ध असतो आपल्या खांद्यावर नवी क्षितिजे पेलण्याचे सामर्थ्य त्याच्या अंगी असते.

पण युवक हाही एक माणूस असतो. परिस्थि-तीने कधी कधी त्याला मर्यादा पडतात. कधी त्याचे आवेग रोघले जातात. कधी विफलतेची रेखा त्याच्या विभोर मनाला विकटते, निराशेचे ढग पसरतात. आणि आसवांना मग भान राहत नाही. त्याच्या भावभावनांना खळाळत्या आसवांत विरघळावे लागते आसू सरतात, निखळतात, टपकतात, पण तरुणाईच्या आसवांचा माथा उन्नत असतो ती आसवे असहाय-पणाची, लाचारीची मुळीच नसतात. त्यांत शक्ती असते तुफान रिचवण्याची ! संकटाशी मुकाबला करण्याची.

बाबा आमटे यांनी खरा युवक कोण ? या संदर्भात आपले मत स्पष्ट करताना म्हटले आहे. 'युवक तो असतो— जो इतरांविरुद्ध नव्हे तर स्वतः-विरुद्धच स्वतःजवळ तक्रारी मांडीत असतो. मी ते दुःख पाहिले. माझ्याजवळ इतकी ताकद होती, मग मी पुढे का सरसावलो नाही ? माझ्यात करुणेची, प्रेमाची शक्ती होती, मग काल मी पळून का गेलो ? का त्या प्रसंगाला सामोरा गेलो नाही? ही अस्पृश्यता, विषमता, अज्ञान, दारिद्रय, लाचारी मी सहन करू शकत नाही. मग जीवनाच्या रणांगणाकडे जातांना माझी पावले का अशी रेंगाळतात ? कृतीच्या क्षणी मी का माघारी वळतो ? जो या लाचारीने शरमिंदा होतो, तो युवक ! आपल्या या लाचारीवर तो एकांकांत अश्रू ढाळतो. ते क्षण त्याला बळ देत असतात. आगतिकतेच्या पलीकडे झेपावण्याचे...!

आज प्रत्येक क्षेत्रात प्रत्येक समाजातील युवकांनी प्राविण्य संपादन केलेले आहे. भौतिक सुखसंपदा प्रतिष्ठा प्राप्त करणे हे प्रत्येक युवकाचे जीवनाचे उद्दिष्ट बनलेले आहे परिणामतः युवक अहंकारी बनून समाजापासून, आपल्या परिवारापासुन पृथक् होण्याची तीव्र प्रवृत्ती त्यांच्यात जाणवत आहे. प्रत्येक युवक केवळ स्वतःच्या सुखासाठी सारी धडपड करतांना दिसतो. याचे गंभीर परिणाम निश्चितच दिसून येतात. युवक जेव्हा स्वैराचारी, स्वार्थी, दृष्टि-कोन स्वीकारतो तेव्हा समाजाचे तुकडे होतात, समाज दुभंगतो आणि त्या अनुषंगाने युवकांचे व्यक्तिगत जीवनही उध्वस्त होत असते. म्हणून प्रत्येक बुद्धिमान युवकाचे कर्तव्य समाजाला सुसंघटित करण्याचे होय! समाजाची, पर्यायाने राष्ट्राची प्रतिमा राखण्यासाठी शक्तिशाली समाज निर्मिती करणे आवश्यक आहे. यासाठी युवकवर्ग संघटित झाला तर समाजात नव्या शक्तीचा उत्साहाचा संचार होतो. रचनात्मक संघ-र्षासाठी आजच्या तरूण युवकांनी अविलंब तयारी करायला हवी.

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांनी २६ ऑक्टोबर १९५३ रोजी कर्नाटक विद्यापीठाच्या पदवीदान समारंभप्रसंगी भारतीय युवकांना आवाहन करून आपले विचार स्पष्ट करतांना म्हटले आहे, 'युवकांना जर झगमगीत पारितोषिके किंवा सुखासीन नोकऱ्यांचे आश्वासन दिले तर ते मला स्वतःला आणि युवकांना अयोग्य ठरेल. पुढे येणारा काळ हा फार खडतर स्वरूपाचा आहे इतर देशात काही शतकांच्या काळात जी आंदोलने झाली ती आपल्या इथे थोडयाफार फरकाने एकाच वेळी झाली विद्येचे पुनरूज्जीवन, धर्मसुधारणा, औद्योगिक क्रांती किंवा राजकीय क्रांती यांच्यासारखी आंदोलने आपल्या देशात छोटया स्वरूपात या थोडया वर्षांच्या काळात घडून आली आहेत. आपण राजकीय स्वातंत्र्य मिळवले आहे. परंतु त्यामुळे आपल्याला परिपूर्ण स्वातंत्र्य मिळाले आहे. असे मानले जाऊ नये. जर ही पहिली पायरी या महान देशाच्या मुक्ततेची पूर्वतयारी मानायची असेल तर आपल्याला अजूनही पुष्कळच गोष्टी पूर्ण कराव्या लागतील. जर राजकीय क्रांतीनंतर सामाजिक आणि आर्थिक क्रांती करण्याची आपली इच्छा असेल तर आपल्या विद्यापीठांमधून शास्त्रज्ञांच्या, तंत्रज्ञांच्या अभियंत्यांच्या, कृषितज्ञांच्या तुकडया तयार झाल्या पाहिजेत.' आपल्या देशाचा चेहरा–मोहरा बदलण्यासाठी, आपल्या समाजाचे आर्थिक स्वरूप बदलण्यासाठी या गोष्टी आवश्यक आहेत. परंतु केवळ शास्त्र आणि तंत्रज्ञान पुरेसे आहे असे आपण समजता कामा नये. जगात खूप प्रगत देश आहेत, ज्यांनी विज्ञानाच्या आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात उत्कृष्ट विकास साधला आहे, पण तरीही ते भांडणतंटयानी दुभंगलेले आहेत आणि आपल्या स्वतःच्याच लोकांसाठी शांतता, सुरक्षितता आणि निर्भयता निर्माण करण्यास असमर्थ आहेत. विज्ञान व तंत्रज्ञान यांच्यामुळे विकसित होणाऱ्या गुणांखेरीज इतरही काही गुण आवश्यक आहेत. हेच यावरून दिसून येत नाही कां ?

एका युवकाची त्याच्या पदवीसाठी ओळख करून देण्यात आली. आणि त्याला विज्ञानातील डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी असे संबोधण्यात आले म्हणजेच, विज्ञान ही देखील तत्वज्ञानाची शाखा मानली जाते तांत्रिकदृष्टया कुशल आणि व्यावसायिकदृष्टया कार्यक्षम लोक तयार करणे एवढेच विद्यापीठांचे कार्य नसते तर ज्यामुळे व्यक्ती परस्परांना खऱ्याखुऱ्या लोकशाही बाण्याने वागवण्यास समर्थ बनतात तो सहानभूतीचा गुण त्यांच्यात निर्माण करणे हे त्यांचे कर्तव्य असते. प्रत्येक मनुष्य हा परमेश्वराचाच अंश आहे, असे आपल्या धर्मांनी प्रथमपासूनच उद्घोषित केले आहे. 'तत् त्वम् असि' ' तो तू आहेस, ही उपनिषदांची शिकवण आहे प्रत्येकजण बोधिसत्व बनू शकतो असे बौद्धांचे म्हणणे आहे केवळ हे जाहीरनामेच पुरेसे नाहीत; लोकांची मने आणि हृदये बदलण्याची आज गरज आहे 'लोकशाहीवादी' या शब्दाच्या केवळ राजकीय अर्थानेच नव्हे तर त्याच्या समाजिक, आर्थिक अर्थानेही आपण लोकशाहीवादी बनण्याचा प्रयत्न केला पाहिजे. संसाराच्या विषवृक्षाला दोन अतुलनीय किमतीची फळे आहेत असे एका श्लोकात म्हटले आहे महान् ग्रथाचा आनंद आणि सत्पुरूषांची संगत ही ती फळे होत ती आत्मसात करायची असतील तर आपल्या पिढीने तिच्या वेगवान प्रवासात थोर ग्रंथ वाचण्याची सवय लावून घेतली पाहिजे आणि आपल्या देशाच्या थोर अभिजात ग्रंथांनी प्रभावित होण्याची सवय राखली पाहिजे. आपल्या देशाला थोर शास्त्रज्ञ, थोर तंत्रज्ञ थोर अभियंते यांची गरज असली तरी आपण त्यांना उदात्त वाङ्मयाचे अभ्यासक बनवण्याकडे दुर्लक्ष करता कामा नये. विज्ञान आणि तंत्रज्ञान यांचा विकास कायम ठेवत असतांनाच विज्ञान आणि तंत्रज्ञान म्हणजेच सर्वस्व नव्हे, हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. सहानुभूतीचा विकास न होता केवळ साक्षर बनण्याने आपण राक्षसी वृत्तीचे बनतो हे प्रसिद्ध विधान आपण लक्षात ठेवले पाहिजे. केवळ विद्वानच नव्हे तर ज्यांची हृदये पीडित मानवाच्यासाठी सहानुभूतीने ओथंबलली आहेत, असे तरुण युवक व युवती आपल्याला आज हव्या आहेत.



चारित्र्य म्हणजेज भवितव्य ! विधिलिखित ! ज्यावर राष्ट्राचे भवितव्य घडवले जाते ते चारित्र्य होय! क्षुद्र चारित्र्याची माणसें असतील तर राष्ट्र थोर बनू शकत नाही. आपल्या शास्त्रांनी वारंवार सांगितल्याप्रमाणे जे आपली इतरांकडे स्वतःचीच जिवंत प्रतिमा म्हणून पाहतात असे तरुण युवक व तरूण युवती आपल्याकडे आवश्यक आहेत. परंतु सार्वजनिक जीवनात म्हणा की विद्यार्थी जीवनात म्हणा, आपल्याच चारित्र्याचा अभाव असेल तर आपण उच्च ध्येय गाठू शकत नाही. जेव्हा आपल्या पायाखालचीच जमीन ढासळत असते तेव्हा आपण पर्वतारोहण करू शकत नाही. आपल्या इमारतीचा पायाच जर डळमळीत असेल तर आपण आपल्यासमोर ठरवलेले शिखर कसे काय गाठू शकणार? आपण सर्वांनी नम्र असले पाहिजे. या राष्ट्राच्या उभारणीत आपल्याला स्वारस्य आहे, आपण जे कार्य हाती घेऊ त्याच्या मोबदल्यात आपल्याला काय मिळते याची आपण चिंता न करता आपण त्या कार्यास किती प्रतिष्ठा देऊ शकतो हे पाहणे अधिक श्रेयस्कर असते. याच तत्वाने आपल्या युवक-युवतींना उत्साहित केले पाहिजे. आपला देश महान् आहे. कित्येक शतकांचा आपला महान् इतिहास आहे थेट मोहेन्जोदडो आणि हडप्पा काळापासून भारताने जे शिकवले आहे त्याचे आपण प्रतिनिधित्व केले पाहिजे. आपण काही विशिष्ट आदर्श निष्ठेने पाळले पाहिजेत.

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांनी भारतातील युवक युवतींना सल्ला देताना म्हटले आहे, भावी पन्नास शतके तुमच्या कार्याकडे डोळे लावून बसली आहेत. भारताचे भवितव्य तुमच्यावर अवलंबून आहे. कंबर कसून कामाला लागा! आशेचे किरण सतत कुठे ना कुठे तुमची प्रतिमा करीत आहेत, तुमचे जीवन स्वच्छ, उदात्त आणि निःस्वार्थी कार्यास समर्पित असावे अशी तुमच्याकडून भारतमातेची अपेक्षा आहे '–

डॉ. राधाकृष्णनांचे हे विचार आजच्या युवक युवतींनी अभ्यासणं अन् ते आचरणात आणणं हीच आजची प्रमुख गरज नाही कां म्हणता येणार ? म्हणून आपण सारे त्वरेने कृतिशील होऊ या !

* * *

---

# भाग्यदेवतेस-

प्रीत माझी पहिली – वहिली  
तिचा अव्हेर करू नकोस  
प्रेमफुले मी पाठविली  
चुरगळून त्यांना टाकू नकोस !

नजरेला देता नजर  
पापणी मध्येच हलवू नकोस  
तुजसाठी झालो वेडा  
मध्येच सोडून जावू नकोस !

मधुर प्रीतीचे गाणे गाता  
सूर मध्येच तू सोडू नकोस  
भाग्यदेवता माझी तू गे  
घाव जिव्हारी घालू नकोस !

**प्रमोद पी. पाटील**  
S. Y. B. Sc

* *

# प्रीत

प्रीत उदयानात,
बांबूंच्या बनात.
प्रीत अंगणात,
शुभ्र चांदण्यात.
प्रीत मंदिरात,
घंटेच्या सुरात.
प्रीत सागरात,
लाटांच्या फेरात.
प्रीत आकाशात,
पंखांच्या स्पर्शात.
प्रीत कळसात,
उंच घुमटात.
प्रीत ठायी ठायी,
साऱ्या जगी पसरली.
तिची चाहूल लागता,
सारी तनू थरारली.

विलास नारखेडे
F. Y. B. Sc.

* *

## * संधी

कित्येक लोक असाधारण संधीची वाट पहात बसतात. त्यांना वाटते, सामान्य संधीतून दिव्य यश निर्माण होणे अशक्य आहे. संधी कोणतीच कमी ना अधिक महत्वाची नसते. योग्य मार्गाने प्रयत्न करणारावरच तिचे दिव्यत्व अवलंबून असते. कमी महत्वाच्या वाटणाऱ्या संधीचा योग्य फायदा घेतला असता. पुऱ्या दिलाने कांम केले असता त्यातूनच दिव्य यश विकसित होत असते. कमी महत्वांच्या संधीचे यश वाढत असते.

# धुक्याची पहाट

धुक्याची पहाट
हाय-वे शेजारच्या बंगल्यात
बालकनीत उभी होती मंडळी
उबदार शाली अंगावर घेऊन—
काश्मिर - सिमल्याची आठवण काढीत
गरम कॉफीची लज्जत चाखीत
उभी होती मंडळी सारी—

इकडेही उगवली होती
तशीच पहाट
नाल्याशेजारच्या झोपडीत
झोपडीत जागा नव्हती म्हणून
बाहेरच बसली होती सारी मंडळी
जीर्ण फाटकी गोधडी पांघरून
विटांच्या चुलीवर उकळत होता
बिनदुधाचा चहा
कुडकुडणाऱ्या देहाच्या उबेसाठी
कुडकुडणाऱ्या देहाच्या उबेसाठी

सुनिता आत्माराम बाहेकर
F. Y. B. A.

*

## * अभ्यास आणि अज्ञान–

मानवाला प्रत्येक गोष्टीबद्दल कुतूहल असते. ते कुतूहल त्याला विविध विषयांचा अभ्यास करायला भाग पाडते. हा अभ्यास मूलगामी आणि सखोल असला, अभ्यासाचा विषय योग्य प्रकारे निवडला गेला असला, तर त्या व्यक्तीचे पूर्वीचे अज्ञान त्याला स्पष्ट दिसते. नंतर त्याच्या ज्ञानात भर पडत जाते. म्हणूनच प्रसिद्ध आंग्ल कवी शेली म्हणतात– 'The more we study the more we discover our ignorance'–



# नळ आला रे आला...

अरुण रामदास पाटील
T. Y. B. Sc.

पडदा वर जातो तेव्हा, रंगमंचकावर एका मध्यम वर्गीयांच्या चाळीचे दृष्य व एक नळ दिसतो. नळ रंगमंचकाच्या मध्यभागी आहे.

रंगमंचकावर एकाच वेळेला, एका विंगेतून पुराणिकबुवा व दुसऱ्या विंगेतून मिस राधा येतात, त्यांचे दोघांचे एकमेकांकडे लक्ष नाही. पुराणिकबुवांनी सोवळं नेसलेलं आहे. गळयात जानवं, हातात छोटी पितळेची बादली, एका हातता सोवळं धरलं आहे. शिव ! शिव ! असा नामोच्चार सुरू आहे. मिस् राधाने नाईटगाउन घातलेला आहे. हातावर वॉच आहे व त्या घडयाळाकडे बघतच ती दुसऱ्या विंगेतून प्रवेश करीत आहे. नळाजवळच दोघांचो टक्कर होते.

राधा : काय हो ? पुराणिकबुवा ! तुम्हाला दिसत नाही वाटतं ?

पुराणिक : शिव! शिव ! ( कानाला हात लावून ) काय म्हणालीस ?

राधा : अहो ! तुम्हाला दिसत नाही वाटत ? (खेकसून)

पुराणिक : शिव ! शिव ! चुकलीस...

राधा : काय ?

पुराणिक : अग ! मला ऐकू येत नाही.

राधा : बरं! एवढ्या सकाळी का आला होतात इथं ?

पुराणिक : शिव ! शिव ! सांगितलं ना.! मला दिसतं पण ऐकू येत नाही म्हणून !

राधा : अहो ! ( ओरडून ) इथं का आलात ?

पुराणिक : कां म्हणजे ? पूजेसाठी पाणी आणायला.

राधा : हो ऽ ऽ नाणेटंचाई असतांनाही, मंदिरा-तला गल्ला भेटेलना चांगला ...

पुराणिक : काय म्हणालीस ?

राधा : नाही नाही, काही नाही ...
(तितक्यात, रमेश, कॉलेज तरुण प्रवेशतो)

रमेश : हाय ! राधा ऽ !

राधा : हाय !
( पुराणिकबुवा दोघांकडे आळीपाळीने बघतात )

रमेश : काय म्हणतंय् तुमचं नाटक ?

राधा : ठीक चाललंय, का ? काय झालं ?

रमेश : नाही म्हटलं सकाळी सकाळी पुराणिक-बुवांचं तोंड पाहीलं?

पुराणिक : मला काही म्हणालात ? ( कानाला हात लावून )

रमेश : नाही, तुम्हाला नाही...

पुराणिक : मग ठीक आहे.

राधा : पण तुम्ही सकाळी सकाळी इथं कसे. ? ( घडयाळाकडे बघते )

रमेश : कसे म्हणजे ? नळ बघायला..

राधा : आज कॉलेजात नाही जायचं वाटतं

रमेश : अहो, आज रविवार ना ! बघा तर खरं कशी गंमत जंमत येते नळावर ...

( प्राध्यापक बारहाते हातात बादली, नाईटपॅन्ट, खांद्यावर रुमाल व दुसऱ्या हातात साबण घेऊन रंगमंचावर प्रवेश करतात.)

प्रा.बारहातेः अरे ! कसली गंमत म्हणतोस रमेश?

रमेश : तुमच्या आंघोळीची, ...

प्रा. बारहाते : ( मिस् राधाकडे बघून ) माझ्या आंघोळीची ?

रमेश : ( आळस देत ) हो ऽऽ

प्रा.बारहातेः (लाजून) नाही म्हणजे, माझी आंघोळ काय इतकी प्रेक्षणीय असते होय !

( सौ. कमल प्रवेशतात, कमरेला पदर खोवलेला व हातात पाण्याचा हंडा आहे)

कमला : कुठलं प्रेक्षणीय स्थळ म्हणतात बारहाते?

रमेश : अहो काकू !

कमला : ए ऽऽ मी तुला काकू वाटते का रे ?

रमेश : अहो! पण तुमच्या ह्यांनीच आम्हाला सांगितले ना! की तिला-म्हणजे तुम्हाला काकू म्हणा म्हणून...

कमला : (संतापून) येवू दे ह्यांना, बघतेच कशी...

प्रा.बारहातेः अहो ! पण ते प्रेक्षणीय स्थळ...

कमला : तुम्ही चूप बसा हो बारहाते, अजून काय म्हणालेत रे हे... रमेश!



रमेश : (घाबरून) बस, बस. काही नाही.

राधा : अहो! एवढं घाबरायला काय झालं, त्या काय वाघीण आहेत होय तुम्हाला खातील तर ?

कमला : तू चूप बैस ग, आपल्या नाटकाला जा.

राधा : का? तुम्ही सांगितल्याशिवाय जाणार नाही असं वाटलं होय?

पुराणिकबुवाः कुठे ?

राधा : तुमच्या डोंबल्यात ...

पुराणिकबुवाः मंदिरात !

कमला : तुम्हीं कशाला मध्ये तोंड घालतात हो पुराणिकबुवा ?

पुराणिकबुवाः अहोऽ ! माझ्या तोंडाला काय झालंय?

प्रा.बारहातेः तोंडाला नाही हो...

पुराणिक : मग कशाला ?

रमेश : (खिल्ली उडवत) नाकाला...

पुराणिक : कानाला ?

राधा : काय बाई, हे लोक (घड्याळाकडे बघून)

कमला : अग थांबतेस कशाला, जा की आपल्या नाटकाच्या तयारीला.

राधा : तुम्हीं कशाला हो बोलतात मधे मधे,

पुराणिक : मला काही म्हटलात ?

प्रा.बारहातेः हो! तुम्हालाच म्हटलं (जोरात बोलतो)

पुराणिक : काय?



प्रा.बारहातेः भाडेकरू कडून पैसे घेता आणि बाथरूम बांधत नाहीत म्हणून (ओरडून)

पुराणिक : असं ह्या-ह्या राधाबाई बोलल्यात

राधा : राधाबाई नका म्हणू हो, राधा म्हणा ( जोरात )

पुराणिक : हो हो राऽधाऽ

प्रा.बारहातेः अहो! त्या कशाला म्हणतील त्या काय तुमच्या भाडेकरू आहेत.?

पुराणिक : मग, तुम्ही बोललात?

प्रा.बारहातेः (ओरडून) हो! काय करणार आहात तुम्ही?

पुराणिक : करणार काही नाही फक्त घरातून काढून देईन.

कमला : बर का बारहाते, काही चिंता करू नका आमच्या शेजारीच एक रुम खाली झालीय, हो किनई रे रमेश ?

रमेश : अं हो, हो (आळस देत)

पुराणिक : तुम्ही मला काय समजलात दोन हाते.

प्रा.बारहातेः दोन हाते नाही हो बारहाते.

पुराणिक : ( मुद्दाम ) बर बरं पाचहाते

प्रा.बारहातेः हे पहा, तुम्ही जाणून बुजून मला चिडवत आहात हं !

राधा : हे बघा असा संवाद मी एका नाटकात वाचलाय, कुठलं बर ते नाटक . ?

रमेश : अहो! गॅदरींगला नव्हतं का झाल ते ...

राधा : हो, हो तेच नाटक.



रमेश : आणि हे बारहाते आणि पुराणिक करतात तसलीच कॉमेडी पण त्यात आहे

राधा : करेक्ट, तरूण तुर्क म्हातारे अर्क,' कोण बर लेखक त्या नाटकाचे!

रमेश : तुम्ही फार विसरतात बुवा, अहो! त्या नाटकाचे लेखक प्रा. बारटक्के.

राधा : नाही हो ! कोण बरं हं... मधुकर तोरडमल

रमेश : खरंच तुमची मेमरी चांगली आहे बुवा!

कमला : बरं का रमेश! आमच्या ह्यांची मेमरी म्हणजे अगदी अशीच...

रमेश : कशी ? (आळस देत)

कमला : विसराळू रे.

प्रा बारहातेः अहो त्या प्रा. विसराळूंना काही म्हणाल्यात

रमेश : नाही हो बारहाते (त्रासून)

कमला : तुम्ही चूप बसा हो बारहाते, हं ! तर मी काय म्हणत होते रे रमेश ?

रमेश : अगं बारहातेच्या रुमबद्दल नां ?

कमला : हं तर बर का बारहाते, आमच्या शेजारी एक रुम आहे .. म्हटल !

प्रा.बारहातेः पण पुराणिकबुवांसारखे मालक नाहीत ना ?

पुराणिक : काय म्हणालात सातहाते

राधा : अहो, तुम्ही त्या बारटक्क्यांसारखी ' कॉमेडी ' काय करता नेहमी नेहमी...

पुराणिक : काय म्हणालीस ?

राधा : काही नाही

प्रा.बारहाते: बरं का माझ्या विद्यार्थी–विद्यार्थिनिनो

कमला : विद्यार्थिनी कुणाला म्हणालात बारहाते !

राधा : हे काय कॉलेज– समजता की काय ?

पुराणिक : हे काय मंदिर आहे प्रार्थना करायला?

रमेश : पण ते काय म्हणतात ते ऐकून तर घ्या ... जरा ..

प्रा.बारहाते: तेव्हा. जर नळ असेच उशिरा येत असतील तर...

कमला तर काय ?

राधा ऐका हो जरा...

कमला . तू चूप, ग.

बारहाते : मी काय म्हणत होतो बरं ...? तर... आपण संप केला पाहिजे.

रमेश : अहो संप करायला आम्ही काय सरकारी कर्मचारी आहोत की काय !

बारहाते : मग काय करायचं...?

राधा : असं करू या का ? आपण एक छानसं नाटक करूया !

कमला : नाटक कशाला? बादली मोर्चा काढू की.

पुराणिक : काय? आरती मोर्चा काढू ? मग मी तुमचा नेता हं...

बारहाते : नाही, तुम्ही अगोदर बाथरूम बांधा. ( कमलाकडे बघत ) मी तुमचा नेता.

कमला : अहो तुम्ही कशाला भांडता, आयडिया मी दिली ना ? तेव्हा मीच पुढाकार घेणार!

राधा : अस कसं बरं ?

कमला : तू चूपऽ ग !

रमेश : आणि मी काय करणार ?

पुराणिक : देवाची पूजा कर.

रमेश : म्हणें देवाची पूजा कर, मी आपल्या चाळी-तून लोक जमा करतो व त्यांना नगर-पालिकेच्या ऑफिसात नेतो.

बारहाते : (नळाचो तोटी फिरवून) अहो ! एकतर पाणी नाही म्हणून आमची अंघोळ नाही. आणि तुम्हाला मात्र नाटकाच्या गोष्टी सुचतात.

पुराणिक : बरं का बारहाते! तुमची बाथरूम मी बांधून देईन.

बारहाते : माझी बाथरूम! हो-हो म्हणजे आमच्या घरात बाथरूम बांधणार तर....

कमला : काय मेला हा चावटपणा ! तुम्ही प्राध्यापक आहात ना बारहाते.?

बारहाते : हो आहे की,

रमेश : हो आहेत तर, खास म्हणजे 'मराठीचे' आहेत

राधा : अग ऽ बाई! किती वेळ झाला (घड्या-ळाकडे पहाते) माझा पहिला नंबर आहे बरं कां ! सांगून ठेवते ...

पुराणिक : काय म्हणलात दुसरा नंबर, बरोबर आहे पहिल्यादा मी आलो नाही का !

राधा : (ओरडून) दुसरा नाही म्हटलं पहिला!



पुराणिक : पण आपण एकाचवेळी टच झालो.

राधा : अगोदर स्त्रिया मग - पुरुष...!

पुराणिक : कुणी का अगोदर असे ना, मला पूजेपुरतं पाणी मिळालं पुष्कळ !

राधा : पण मी पहिल्यांदा पाणी घेणार

कमला : पहिल्यांदा आली म्हणून, पहिला नंबर! वा ..वा...वा...!

बारहाते : अहो अजून माझी आंघोळ नाही. अंघोळीला तरी पाणी घेवू द्या.

रमेश : अहो, नळाला पाणी आलं नाही म्हटलं अजून

पुराणिक : थांबा, अजून पाणी येत नाही ना ?

बारहाते : मग काय करायचं म्हणता?

पुराणिक : नळाची प्रार्थना करू या ! म्हणजे आपल्याला नळ प्रसन्न होईल आणि म्युनिसीपालिटीला जाग येईल.

राधा : विनोदी नाटकासाठी आयडिया चांगली आहे म्हणा, पण माझा पहिला नंबर– बरं का...!

कमला : अहो पुराणिकबुवा ! हे कलियुग आहे म्हटलं, कुणीही प्रसन्न होणार नाही.

पुराणिक : पण तरी मी सांगतो तसे करा...

रमेश : कसे?

पुराणिक : माझ्या मागून लाइन लावा.

बारहाते : काय ? तुमच्या मागून...

राधा : पण, नळ आल्यावर मीच पाणी अगोदर घेणार– मी पुढे उभी राहते.

पुराणिक : अहो, मी पुजारी नाही का ?

राधा : अहो, सोवळं घरी ठेवून या.

रमेश : नंतर पाणी बघण्यासाठी मी आलो म्हणून मी तिसरा.

बारहाते : नंतर मी आलो, मी चवथा.

कमला : सगळा मेला वशिला, या पुराणिकबुवांचा...

(सर्व लाईन लावतात)

पुराणिक : काय म्हणालात.?

कमला : नळ यायची वेळ झालीय मेली (स्वतःच) काही नाही तुमची आरती चालू करा.

पुराणिक : जय, जय, जय, जय, जय नळदेवा, जय नळदेवा आरती ओवाळतो लवकर तुम्ही या !

(सर्व आरतीत मग्न असतात तेव्हा, नळाचा आवाज होतो सगळयांची एकच धांदल उडते. सर्व नळ आला, नळ आला म्हणत नळाकडे धाव घेतात)

* *

*** सभ्यता –**
सभ्य मनुष्य सखोल विचार करणारा असतो. तो चांगला नि वाईट दोन्हींशी सावधपणाने वागतो. तो इतरांपेक्षा स्वतः ला फार वेगळे समजत नाही किंवा स्वतः ला वाजवीपेक्षा कमीही लेखत नाही. सफलतेचा त्याला आनंद वाटत नाही, की अपयशाचा विषाद. त्याचा उत्साहभंग कधीच होत नाही. लोकांनी आपली केवळ प्रशंसा करावी म्हणून तो कोणतेच काम करीत नाही. जे काम योग्य म्हणून त्याच्या सदसद्विवेकबुद्धीला पटते, ते काम तो संकटांची पर्वा न करता करतो.

# - प्राक्तन -

जे प्राक्तन ललाटी लिहिले
ते तसेच मिरवित आले
हे चक्र असे दैवाचे
कसें उलटे फिरत राहिले......

नशिबाला मी माझ्या
उगाच घडवित आले
नात्याचीं हजार नावे
ही गावे वसवित आले......

या हातावरील रेषांना
उगाच मेंदीने खुलविले
भाळी लिहिल्या प्राक्तनाला
मी उगाच झुलवित आले......

सारे फसवे खोटेनाटे
त्या सत्याचे रूप दिले
खोटया आशेपायी
स्वतः स फसवित आले......

कु. कल्पना वि. जोशी
F. Y. B. A.

# - जीवन -

बालपणातील सुखद कल्पना
तारुण्यातील प्रेम भावना
वृद्धापकाळी विकल यातना
भोगूनीं जगतो जीव
याला जीवन असे नाव...... १

कुणी श्रीमंतीत लोळत असतो
कुणी गरीबीत पिचून निघतो
क्षणाक्षणाला मरूनी जगतो
जगण्याची ही ओढ अनावर
याला जीवन असे नाव..... २

प्रकाशातही मिटती डोळे
अंधारी पण हितगूज चाले
चित्र आपुल्या संसाराचे
नयनी घेई धाव
याला जीवन असे नाव... .. ३

कु. साधना नेमाडे
S. Y. B. A.



# व्यवस्थापनातील स्त्रियांचा सहभाग

कु. आरती तिवारी
१२ वी कॉमर्स

आजचे युग हे विज्ञानाचे आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञान या क्षेत्रात सातत्याने बदल घडून येत आहेत. या बदलाबरोबरच उद्योग व्यवसायाच्या क्षेत्रातही विविध स्वरूपाचे बदल घडून येणे अपरिहार्य ठरलेले आहे. आजचा व्यवसाय गतिमान असल्याने उद्योग व्यवसायाच्या यशस्वी नियंत्रणासाठी व्यवस्थापनशास्त्राचा ' अवलंब मोठ्या प्रमाणावर केला जाऊ लागला आहे. व्यवस्थापनाचे अभ्यासक्रम विविध पातळ्यांवरून राबविण्यात येऊ लागले आहेत व या अभ्यासक्रमांचे महत्त्व सर्वमान्य झाले आहे.

व्यवसाय शिक्षण आणि व्यवस्थापन - शिक्षण ही आज केवळ पुरूष वर्गाचीं मक्तेदारी राहिलेली नाही. स्त्रियाही या क्षेत्रात मोठ्या ऊमेदीने कार्य करू लागल्या आहेत. पुरुषांच्या तुलनेने, व्यवस्थापनाच्या क्षेत्रात काम करणाऱ्या स्त्रियांची सख्या मर्यादित असली तरी देखील स्त्रिया आज या क्षेत्रापासून सर्वस्वी दूर राहिलेल्या नाहीत ही एक महत्त्वाची बाब म्हणावी लागेल.

तसे पाहिले तर व्यवस्थापनाचे प्राथमिक शिक्षण स्त्रियांना कुटुंबातच मिळते. मर्यादित रकमेत जास्तीत जास्त चांगले जीवन जगण्याची कसरत स्त्रीला आपल्या दैनंदिन जीवनात करावी लागते. मुलांचे शिक्षण आणि संगोपन, घर खर्च, करमणूक, कौटुंबिक आपत्ती या सर्वांसाठी मर्यादित रकमेतून पुरेसा खर्च करण्याची तयारी घरातील स्त्रिला ठेवावी लागते. कुटुंब व्यवस्थापन हे वाटते तेवढे साधे खासच नाही. कुटुंबाचे यशस्वी व्यवस्थापन करण्यासाठी स्त्री जवळ आदर्श व्यवस्थापकाचे सर्व गुण असावे लागतात. कर्तव्यतत्परता, चिकाटी सहनशीलता, काटकसरी वृत्ती, हसत खेळत काम करण्याची प्रवृत्ती, ह्या सारखे औद्योगिक व्यवस्थापनाच्या क्षेत्रात आवश्यक ठरणारे गुण स्त्रियांमध्ये निसर्गत.च आढळून येतात. त्यांच्या ह्या गुणांचा शास्त्रीय पद्धतीने विकास घडून आल्यास उद्योग व्यवस्थापनाच्या क्षेत्रातही स्त्रिया उत्तम रितीने कार्य करू शकतात असे दिसून आलेले आहे.

बदलत्या परिस्थितीबरोबर व्यवस्थापन क्षेत्रातील अभ्यासक्रम निवडण्याची स्त्रियांची प्रवृत्ती अधिकाधिक विकसित होऊ लागली आहे. कुटुंबियांचा परंपरागत व्यवसाय टिकवून ठेवता येणे शक्य व्हावे म्हणून किंवा काही तरी ठोस कर्तृत्व दाखवण्याची मानसिक प्रेरणा म्हणून अथवा व्यवहारिक जीवनातील प्रतिष्ठा ऊंचवण्याच्या उद्दिष्टाने स्त्रिया आज व्यवस्थापन क्षेत्राकडे आकर्षिल्या जाऊ लागल्या आहेत.

व्यवसाय व्यवस्थापनाचे अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर स्त्रियांचा व्यवस्थापन क्षेत्रात सहजासहजी प्रवेश होतो असे नाही. अद्यापही स्त्रियांकडे बघण्याचा सामाजिक दृष्टिकोन हा पूर्णपणे व्यापक नसल्याने जबाबदारीची कामे स्त्रियांवर सोपवण्याची उद्योग संस्थेतील वरीष्ठांची मानसिक तयारी नसते. स्वतंत्र उद्योगधंदा काढण्याचे सामर्थ्य सर्वच स्त्रियांकडे नसते. यामुळेच अजूनही बऱ्याच उद्योगधंद्यांमधून

स्त्रियांना दुय्यम दर्जाचे काम दिले जाते. शक्यतोवर वितरण, बांधणी विक्री व कर्मचारी-व्यवस्थापन ह्या सारख्या विभागातून स्त्रियांना संधी दिली जाते.

शासनाची बदलती भूमिका व्यवस्थापन शिक्षणाच्या संदर्भात स्त्रियांना उपलब्ध करून दिलेल्या संधी व सोयी. उद्योग व्यवसायाच्या मनो भूमिकेत झालेला बदल ह्यामुळे बऱ्याचश्या कर्तब-गार स्त्रिया कुशल व्यवस्थापक म्हणून यशस्वी ठरू लागलेल्या आहेत. उच्च व्यवस्थापनाच्या क्षेत्रात सहभागी होऊ लागल्या आहेत.

वरिष्ठ पातळीवरून, स्त्रिया व्यवस्थापकांचे काम करू लागलेल्या असल्या तरी देखील त्यांना कार्य करण्यास सर्वार्थाने अनकूल परिस्थिती आहे असा दावा करता येत नाही. पुरूषाची अरेरावी, आपल्या पातळीवर काम करणाऱ्या सहकाऱ्यांचा छुपा उपहास, सहकाऱ्यांच्या बाबतीतील अनुदार भूमिका यासारख्या विविध समस्यांवर तोंड देऊन आपले नियोजित ध्येय गाठण्याची कसरत त्याना करावी लागते. त्याबरोबरच आपल्या कुटुंबियांची जबाबदारी, अपत्यसंगोपन यासारख्या कौटुंबिक समस्यांकडही त्यांना दुर्लक्ष करता येत नाही. कर्तव्य आणि महत्वाकांक्षा यांचा विचार करतांना आपल्या भावनाही स्त्रिया दडपून टाकू शकत नाहीत.

व्यवसायाचे शिक्षण घेवून व्यवसाय व्यव-स्थापनात पुरुषांच्या बरोबरीने प्रावीण्य संपादन करण्यात आजच्या स्त्रिया मागे राहिलेल्या नाहीत अनंत अडचणींना तोंड देऊन मिळालेल्या संधीचा पुरेपुर फायदा घेऊन पुरुषापेक्षाही आपण कर्तृत्ववान् आहोत असे अनेक स्त्रियांनी स्वतःच्या उदाहरणाने सिद्ध करून दाखविले आहे. स्त्रीला निसर्गतः लाभलेल्या मानसिक बैठकीला प्रशिक्षण अनुभव आणि ज्ञान यांची सुयोग्य जोड मिळाल्यास स्त्रिया पुरुषापेक्षा अधिक जबाबदारीने काम करू शकतात, असे अनुभवांती सिद्ध झालेले आहे. उच्च व्यवस्था-नाच्या क्षेत्रात स्त्रियांना अद्याप ही अपेक्षित असे स्थान प्राप्त झालेले नसले तरीही त्यात समाधान कारक बदल नक्कीच होऊ लागले आहेत. व्यवसाय व्यवस्थापनाच्या क्षेत्रातील प्रचलित स्थितीचा आढावा घेता असे म्हणता येईल की या क्षेत्रात स्त्रियांना भरपूर संधी आहे. या संधीचा स्त्रियांनी योजनापूर्वक लाभ करून घेतल्यास व्यवस्थापन क्षेत्रात भरीव कामिगरी करून दाखवण्याचे स्वप्न त्यांना निश्चितच साकार करता येईल. परंतु त्यासाठी सतत अद्ययावत् राहण्याची, अधिक ज्ञान मिळवण्याची, अथक परिश्रमाची आणि दूरदृष्टीची आवश्यकता आहे त्याचे भान स्त्रियांनी सतत ठेवले पाहिजे.

* *

### * स्वातंत्र्य

एखाद्या राष्ट्राचे स्वातंत्र्य गेले तरी ती मोठी आपत्ती म्हणता यावयाची नाही. पण जर त्या राष्ट्राला आपले स्वातंत्र्य गेल्याची जाणीवही उरली नाही, स्वातंत्र्य गेल्याची वेदना त्याला होईनाशीची झाली तर मात्र त्याचा सर्वस्त्री नाश झालाच असे समजावे. गेलेले स्वातंत्र्य यथाकाळी, पराक्रम करून परत मिळविता येईल. पण स्वातंत्र्याची आठवणच जर बुजली, गुलामी पचनी – पडली, – मनाला मानवू लागली तर मात्र त्या राष्ट्राला कसलीच आशा उरत नाही.

* *



# बेटासे बाप सवाई

कु. निवेदिता नेरकर
F. Y. B. Com

संध्याकाळचे पाच वाजले, वेळ कसा गेला हे सखुबाई, व भिमाप्पाला कळलेच नाही. भिमाप्पाला गावतल्या चपलांचे व बुटांचे पॉलीश करुन दयायला जायचे आहे याची आठवण सखूने करून दिली. घाई घाईत भिमाप्पाने पायात चपल सरकवली, अंगातील मळकट शर्ट झटकला व डोक्यावर टोपी घालून रस्त्याने चालू लागला. सखूबाईने पदर खोचून कामाचा गाडगा उपसण्यास सुरुवात केली. चूल पेटवून ती भाकऱ्या करायला लागली. तोच अचानक गावचे पाटील दारात पाहून तिचे मन भीतीने लटपटले. पाटील कशासाठी आले असतील ? असे प्रश्नचिन्ह तिच्या डोळ्यासमोर उभे राहिले.

पाटलांनी घोंगडीवर बैठक मांडली
चहा घ्याल का पाटील ? पण आमच्या घरी गुळाची चहा हाय. तुम्हास्नी ती आवडल का? तुम्ही मोठं माणूस ?

मोठं बिठं काय नाय ? लवकर चहा ठेवा मला तुम्हासनी काही विचारायच आहे. पाटील म्हणाले

आता पाटील काय इचारनार याचा विचार करतच सखूने चहा ठेवला.

चहा प्याल्यानंतर पाटलांनी एक नजर संपूर्ण खोपटात फिरवली. मोठाले मिशांचे आकडे कुरवाळीत ते म्हणाले.

तुम्हास्नी या गावात राहायचं आहे का नाही ? राहायच असेल तर आपल्या पोरीला जरा संभाळा, ही तुमची पोर माझ्या विजयच्या मागं लागली आहे. तिच्यावर तुम्ही जरा नजर ठेवा. कुठे जाते काय करते ? हे तिला इचारा, बऱ्या बोलांन तुमची पोर सांभाळा नाहीतर या पाटलाशी गाठ आहे... समजलं... !

सखूबाईचे ओठ बोलण्यासाठी थरथरत होते पण पाटलांपुढ कसं बोलावं हेच तिला सुचत नव्हतं. तिची पोर मोठी गुणाची होती. तिनं नुकतच १२ वी पास केली होती. कोणत्याच वर्गात ती कधीही नापास झाली नव्हती. तिचा स्वभाव अत्यंत स्वाभी-मानी होता. कोणाच्याही अध्यात अध्यात ती नसायची. तिला मैत्रिणी देखील फारशा नव्हत्या. ती नेहमीच एकटी राहात असे पण तिचं नाव घेण्याची गावातील एकाही पोराची हिंमत होत नव्हती. तिच्या जळजळीत नजरेला घाबरूनच पोर तिच्या पासून चार हात दूर रहात असत.

पण– पाटलाचा पोर हा नुकताच इंजीनीयर होऊन परत आपल्या गावाला आला होता. त्याला आपला गाव एक सर्वदृष्टीनं विकसित गाव करायचा होता. त्याच ते स्वप्न होतं. रोज संध्याकाळी तो गावाला फेरफटका मारायचा. त्याच्या नजरेला पुष्कळ मुली येत. तो त्यांच्याकडे पाहात देखील नव्हता. चांभाराची उषा मात्र त्याच्या मनात भरली होती. तिचं रुप पाहून तो जणू वेडा झाला होता. त्याने पक्का निश्चय केला– लगीन करीन तर हिच्या संगच करीन गावाने कितीही विरोध केला तरी घाबरणार नाही तीच माझी जोडीदारीण होण्यास योग्य आहे. माझ्या साठीच हिला परमेश्वराने जन्माला घातले आहे. तिच्या सारखी एकही मुलगी आपल्या गावात नाही

उषा रोज संध्याकाळी शिवणक्लासला जात असे त्याच वेळी तो तिच्या नजरेस पडला होता. पण तिच्या मनात भीती होती. तो तिच्या मागे मागे असे. तिला प्रश्न विचारीत असे पण तिनं त्याच्याकडे कधीही लक्ष दिलं नव्हतं. तिला माहित देखील नव्हतं की याचं आपल्यावर मन जडलं आहे म्हणून. पाटलाचा पोर नसता तर तिनं त्याला केव्हाच उडवून लावलं असतं.

पण पाटलाच्या पोराला कोण बोलणार ? या भीतीने ती काहीच करू शकत नव्हती. तसा तोही तिच्या मनात भरला होता. तो पडला पाटील आपण चांभार आपलं जमणार तरी कसं ? आपली जात किती खालच्या दर्जाची आहे. याची जाणीव तिला होती. ती आईला किंवा बापाला देखील सांगू शकत नव्हती. काय करावे हे प्रश्नचिन्ह तिला भेडसावत होते.

'पाटील! माझी पोर तशी नाही' असं सांगण्याचा प्रयत्न सखूने केला पण पाटील त्याला कसा जुमानणार ?

भिमाप्पा कुठं गेला आहे ?

'ते जरा जोडे देवाले जायल शेतस. आते येतीनच तुम्ही त्यास्नासंगेच बोला ते सांगतीन तुम्हले.'

एवढ्यात भिमाप्पा आला त्याला देखील भीतीच वाटली पाटलांना आपल्या घरी पाहून. आपल्याकडून काय चूक झाली ? असे त्याला वाटत होत.

काय भिमाप्पा! जरा पोरकडे लक्ष देत जा ना! बरीच मोठी झाली तुझी पोरगी, आरं लग्नासारखी झाली हाय. लवकर हात पिवळे करून टाक नाहीतर लई आपत्ती येईल बग !

पन पाटील, आव तिच्या तोडीचा पोरगा आम्हासनी मिळनार नाही. तिनं तर आम्हासनी सांगून ठेवलं मी लगीन करीन तर चांगलाच पोरगा शोधेन.

पण पोर लई मोठी झाली हाय, जरा गावं फीर पोरं पहा–

पाटील हे माझ्याकडून होनार नाय. माझ्या पोरीचं मन दुखवणार नाही मी. कधीच दुखवणार नाही.

असं म्हणतोस हरामखोर ! तुला गावात राहायच आहे का नाही. बोल ...!

पाटील ! आम्हासनी गावाबाहेर टाकू नका. मी तुमच्या पाया पडतो आमची चूक झाली असंल तर पदरात घ्या आम्हाला तोडू नगा. मी माझ्या पोरचं लगीन या दोन महिन्यात करून टाकीन पन मला गावात ठेवा ! पाटील ..

तेवढ्यात उषा घरात आली. घरातील गोंधळ पाहून तिला भीती वाटली.

पाटलाने तिला विचारले काय गं कुठं फिरत होतीस तू ? आमच्या विजयच्या संग, नां ?

हे शब्द ऐकून तिचा संताप झाला. तिने पाटलाकडे एकदा पाहिले व ती म्हणाली 'पाटील! आसं बोलणं तुम्हासनी शोबत नाय. तुम्ही तुमच्या पोराला सांभाळून घ्या आम्ही गरीब म्हणूनच आम्ही तुमचं ऐकायचं वाटतं ? तुमच्या पोराला जरा इचारा कि मी त्याच्या माग जाते का तो माझ्या मागं येतो ?

पाटलांना तिच्या कडून हेच उत्तर अपेक्षित होतं. त्यांनो आपल्या पोराचं वागण कधीच टिपलं होतं. आपल्या पोराला हीच बायको शोभेल असे त्यांनाही वाटत होते. आपल्या मुलाच्या पसंतीवर ते अतिशय खूष होते.

पाटील भिमाप्पाला म्हणाले तुला गाव सोडून जावं लागेल नाहीतर मी सांगीन ती शिक्षा भोगावी लागेल.

पाटील काहीही शिक्षा करा मी भोगायला तयार आहे पन मला गावाच्या बाहेर काढू नगा



मग ऐक तुझी शिक्षा. तुझी उषा तुला माझ्या पोराला दयावी लागेल कबूल ?

पाटील ! आवो ! काय सांगता तुम्ही ! तुम्ही मोठी माणसं आम्ही वा ......

उषा देखील लाजून माजघरात पळाली. तिला वाटलं हे स्वप्न तर नाही ना !

'या गावात कोणी लहान नाही अन् कोणी मोठा नाही !' पाटील म्हणाले.

# एक स्वप्न.......?

आसवांच्या पावसात  
झाकोळले नभ आज  
अडखळते ओठात  
चांदण्यांचे गीत आज

धुंद रेशमी केसांची  
मुकी झाली आज भाषा

धुंद बावऱ्या नेत्रांची  
का आज हो निराशा ?

एक स्वप्न होते तेव्हा  
हृदय गात होते गाणी  
दुःख विरहाचे आता  
लोचनांत उरले पाणी

**पी. डी. पाटील**  
S. Y. B. A.

मग देनार ना पोरगी ?

तेवढ्यात विजय देखिल आला. तो आपल्या वडिलांवर फारच खूष होता. असे वडिल मिळणं हे देखिल भाग्यचं असतं. आज समाजाला अशाच व्यक्तींची गरज आहे. यामुळे एकता, समता, बंधुता ह्या भावना वाढीस लागतील. अन् सारे एक होतील.

* *

* **जीवनाचा उद्देश–**

ज्या गोष्टीचे स्मरण करताच तुम्ही सजग होता तुमची सारी इंद्रिये पुलकित होतात, उत्साहाने – आनंदाने नाचू लागतात, निसर्गतः जी प्रवृत्ती तुम्हाला आवडते, जिच्या स्मरणाने उत्साह ओसंडू लागतो तेचं आपले काम, तोच जीवनाचा उद्देश आहे हे ओळखा–

* **अभिमान–**

सत्तेचा अभिमान, संपत्तीचा अभिमान, बळाचा अभिमान, रुपाचा अभिमान, कुळाचा अभिमान, विद्वत्तेचा अभिमान, कर्तृत्वाचा अभिमान, चारित्र्याचा अभिमान. हे अभिमानाचे विविध प्रकार आहेत पण– 'मला अभिमान नाही' असे भासणे ह्यासारखा भयानक अभिमान नाही–

* **श्रद्धा–**

श्रद्धा म्हणजे सत्य धारण करण्याची शक्ती. जेथे जिज्ञासा व ज्ञान आहे तेथे श्रद्धा उद्‌भवणारच.

# आजचा विद्यार्थी एक चिंतन

विलास काळू यशवं
१२ वी शा

" कोण होतास तू
काय झालास तू
अरे वेडया कसा
वाया गेलास तू "

स्वर कानांवर आदळतात मन अस्वस्थ होते. व मनात विचार येतो आम्ही विद्यार्थी "वाया गेलेले, बेशिस्त" म्हणून बदनाम झालेले आहोत. जो उठतो त्याची हीच ओरड! कुठं पूर्वीचे सालस, नम्र, आज्ञाधारक विद्यार्थी अन् कुठे आजचे उद्धट आणि बेशिस्त विद्यार्थी ! कुठं ते क्रांतिवीर, छातीवर गोळ्या घेणारे व फासावर जाणारे नि कुठे आजचे प्रेमवीर मुलींच्या मागे फिरणारे ... !

मित्रांनो ! प्रत्येक जण आपल्याला उपदेशाचे डोस पाजतोय ! कारण त्याला पैसा पडत नाही ना ! पण मला सांगा आम्ही काय स्वर्गातून टपकलो आहोत ? समाजातलेच आहोत ना ! अग्नि आणि उष्णता, साखर आणि गोडी एकच नाहीत काय? तसेच समाज व आम्ही एकच नाही काय ? मग बेशिस्तपणाचं खापर केवळ आमच्यावरच का ?

घरात, शाळेत, कॉलेजात, समाजात आज काय दिसतंय ? आई मोलकरणीवर घर टाकून महिला-मंडळात जाते, बाबांचा तर घरी पत्ताच नसतो. लहान भावंड खाण्यापुरती घरात. ऑफिसमध्ये लोक काय काम करतांना दिसतात ? छे ... नाव नको !

शाळेत तरी काय चालतयं ! अभ्यासक्रम इत भरमसाठ असतो की अक्षरशः त्याच्या ओझ्याखा आम्ही वाकून जातो. ज्याच्यावर नितांत श्रद्धा ठेवा असे शिक्षक बोटावर मोजण्याइतकेच. या सा गोष्टींचा आधी विचार करूनच मग आम बेशीस्तपणावर चर्चा करायला हवी का नको?

आम्ही रात्र-रात्र जागून हाडांची काड करू अभ्यास करून चांगले गुण मिळवलेही, तरी मिळतो कां आम्हाला कॉलेजला प्रवेश ? लागतात का आम्हास नोकऱ्या ? हे सारं पाहून मन अगदी मेटाकुटीला येतं. विरंगुळा म्हणून रस्त्यात उभं रहावे तर " रस्त्यात काय मवाल्यासारखा उभा रहातो?" असे ऐकले की तळपायाची आग मस्तकाला जाते.

समाज झोपला – की घंटा वाजल्य/ शिवाय तो जागाच होत नाही. लहान मुलाला भूक लागली की दुधासाठी रडणारच ! किंवा कदिलातील तेल संपल की दिवा फडफडणारच. आमच्या गरजा समाज पुरवीत नाही म्हणून आम्हाला ओरड करावी लागणारच ! त्याचप्रमाणे आमची कृत्ये बेशिस्त-पणाची नाहीत तर समाजाला जागं करणारा ती एक धोक्याचा लाल कंदील आहे.

समाजाकडे नजर वळवली तर अगठा बहादूर पान तंबाखू चघळत अश्लील विनोद करीत हॅऽऽहॅऽऽ हसत मोटारीतून हिंडतांना दिसतात. गुन्हे करीत गुन्हेगार सही सलामत सुटतांना दिसतात. वैभवात लोळायचं असेल तर शिक्षण नसले तरी चालेल हा

आमच्यापुढे आदर्श ! कशाला मग तो अभ्यास? आणि कुठला तो ध्येयवाद ?

कसं आणि किती पटवून द्यावं ! काही मुलांना आदल्या दिवशी प्रश्नपत्रिका मिळते. गर्भश्रीमंताच्या मुलांना कमी उत्पनाचा दाखला मिळतो. अमक्या-तमक्याचा म्हणून कमी मार्क्स असतांना देखील मेडि-कलला प्रवेश मिळतो. पण एखादया गरीब स्कॉलर मुलाला प्रवेश नाही. मग तो अस्वस्थ होईल नाही तर काय? विद्यार्थी प्रतिक्रिया व्यक्त करणार नाहीत तर काय गप्प बसतील ?

मी खात्रीने सांगतो, समाजाने आम्हाला शिवाजी द्यावा, आम्ही मावळे होतो की नाही बघावे, समाजाने आम्हाला नारद दयावा आमच्यातील वाल्याचा वाल्मिकी होतो की नाही याचा अनुभव घ्यावा ! समाजाने असे आदर्श आमच्यापुढे ठेवावेत की ज्यामुळे कांही विधायक, ठोस, असं कार्य करण्याची प्रेरणा आम्हाला मिळेल.

खरं तर वाईट मार्गाकडे वळण्याची विद्यार्थ्यांना मुळातच हौस नसते. आम्हालाही चांगलं व्हावसं वाटतंय सुरांमधून संगीत होते तसे आमचा सूर हा समाजाच्या सुरात मिसळून गेला म्हणजे त्यातून काही चांगले निर्माण होईल. आमच्या नवनिर्माणाच्या शक्तीला योग्य ते वळण मिळू शकेल. काही तरी भव्य उदात्त, विधायक कार्य करून दाखविण्याची प्रेरणा आम्हाला मिळू शकेल. असं नाही कां आपणांस वाटत ?

* *

## * संस्कार सातत्य -

समाज व्यक्तींचा बनतो. कामं माणसंच करतात. शासक आणि सेवक, वैज्ञानिक आणि लढवय्ये शिक्षक आणि विद्यार्थी, पालक आणि पाल्य, व्यापारी आणि ग्राहक ही सारी माणसंच असतात, या माण-सांचाच सामाजिक व्यवहार असतो. त्यांना जर काही जीवनदृष्टी दिली नाही, उच्च विचार सांगितला नाही आणि त्या विचारांचा संस्कार सतत कायम राखला नाही, तर माणसं खडतर मार्गावर टिकू शकत नाहीत. मोहपाश दूर सारू शकत नाहीत. संस्कार सातत्य ही कोणत्याही कार्याची शक्ती असते. संस्कार क्षीण झाले की शिस्त, संयम, प्रखर ध्येयनिष्ठा इ. साऱ्या सद्गुणांना सहज ओहोटी लागते भांडं जर नियमानं घासलं नाही तर कळकट बनतं तसाच हा प्रकार.

## * निसर्गाशी - सुसंवाद हवा !

शुद्ध वातावरण, शांत मन व निरोगी शरीर या गोष्टी जगातल्या कोणत्याही माणसाला हव्याच असतात. आधुनिक जीवनात त्यांच्यापासून माणूस सतत दूर जात आहे. पोटापाण्याचा व्यवसाय कोणताही केला, ईश्वर कोणताही मानला किंवा न मानला तरी जीवनाच्या मूलभूत गरजा कायमच राहतात. त्या भारतीयांच्याही गरजा आहेतच. या गरजा पूर्ण करुन घेण्याचे जे मार्ग आहेत त्यांना आपण आधुनिकतेच्या दिमाखाने कितीही नाके मुरडली तरी उपयोग काय ? निसर्ग निर्घृण व दयावंतही आहे म्हणून निसर्गाशी सुसंवादी विकासच सुस्थिर व आनंददायी असू शकतो.

# जीवनदान

प्रकाश पुना बारी
T. Y. B. Sc.

उन्हाळ्याचे दिवस होते. सायंकाळचे साडेसहा वाजले होते, मनिषा आणि विजय बागेत बसून सूर्यास्त केव्हा होतो याची वाट पाहात होते, सायंकाळचा सूर्य मावळतीला जात होता. मनिषा लांब पाय घालून दोन्ही हाताचे तळवे मागच्या बाजूस टेकवून कसला तरी विचार करीत होती. आणि विजय तिच्या पायाची उशी करुन झोपूनच सूर्याची किरणे निरखत होता त्याने भानावर येत मनिषास विचारले " काय विचार करते आहेस " एवढा मनिषा ?

मनिषा भानावर येऊन गोंधळलेल्या आवाजातच म्हणाली, " अं ! काही नाही- रे ! असाच विचार करते आहे काहीतरी." " भावी जीवनाचा की गत-जीवनाचा? " विजयने विचारले-" गतजीवनाचा " मनिषा उत्तरली. आणि विजय आश्चर्यचकित होऊन प्रश्नांकित मुद्रा करीत म्हणाला, " गतजीवनाचा ?" " अशा कोणत्या क्षणाचा तू विचार करते आहेस की जो क्षण तुझ्या जीवनात कायमचीच स्मृती ठेवून गेला आहे !

" तोच क्षण तुला आठवतोय ना ..... विजय तो क्षण " मनिषाने विचारले.

" होय! " विजय उत्तरला

असं होय ! मग – सांग बघू मी कोणत्या क्षणा-बद्दल विचार करते आहे ते ? का फक्त होकारच भरायचा ? मनिषा ऽऽ !

तिला शांत करीत विजय म्हणाला, " तोच क्षण ! की ज्या दिवशी आपण आपले एकतर्फी प्रेम एक-मेकांजवळ प्रकट करून त्यास दुतर्फी स्वरुप दिले हाच ना तो क्षण ? " मनिषाला कळून चुकलं होतं की, विजयच्या लक्षात तो क्षण आला आहे.

विजय म्हणाला, " मी देखील त्याच प्रसंगाचा विचार करतोय मनिषा !

तुला आठवतं का ? आकाशवाणीवरील एका कार्यक्रमाच्या निमित्तानं आपण प्रथम भेटलो अन् पहिल्याच भेटीत तू मला जिंकून घेतलंस. कारण मला तुझ्यासारखीच माझ्या विचारांची मुलगी जीवनसाथी म्हणून हवी होती. आणि अशातच आपली ओळख झाल्यानंतर मला एके दिवशी तुझी संपुर्ण माहिती मिळाली. आणि समजले की, तू माझ्याच कॉलेजमध्ये आणि तेही माझ्याच वर्गात शिकत आहेस. त्यावेळी माझा आनंद गगनात मावे-नासा झाला होता. मी माझ्या मनात वेडी समजूत पक्की करून घेतली होती की आता तुला आणि मला कोणीही दुरावू शकणार नाही एकच आठवड्यां-पूर्वी तुझी आणि माझी भेट झाली होती ती जिम-खान्यात. तू तिथे बॅडमिंटन खेळत होतीस मी तुझ्याच विचारात बसलो होतो. आणि अशातच कोणीतरी मनिषा .. अशी हाक तुला मारली आणि मी शुद्धी-वर आलो. तुला हाक आली तशीच तू तुझ्या मैत्रि-णींकडे धावत गेलीस. आणि मलाही तुझा संशय आल्यामुळे मी इकडे तुझ्या बरोबर खेळत असलेल्या मुलांपैकी एकाला तुझे संपूर्ण नांव वगैरे विचारले तू दुसरी कोणी नसून माझ्याच मनातील ' ईप्सित ' आहेस अशी खात्री करुन घेतली, तेव्हापासून मी अगदी तुझ्याच विचारात होतो एके दिवशी मी माझं प्रेम तुझ्या जवळ व्यक्त करण्याचा मानस केला आणि तुझ्याजवळ माझं अंतःकरण मोकळं केलं !

त्याचवेळी मला कळून चुकलं की तू माझ्या प्रेमाचा स्वीकार केला आहेस म्हणून. आणि काही क्षणातच आपण मनाने एकमेकांचे झालो. दोघांचेही तोंडातून एकाच वेळेस ते शब्द निघाले होते- " आय लव्ह यू " मनिषा ! या क्षणाला आपण दोघेही खूपच हसत सुटलो होतो. होय ना ? " मनिषाचे लक्ष वेधित विजय म्हणाला.

मनिषाची नजर मात्र अशी काही स्थिर होती की ते सर्व जणू काही तसेच्या तसे आताच घडतय असं वाटत होत. ती ऐकण्यात आणि अनुभवलेलं डोळ्यासमोर पुन्हा आणून बघण्यातच गुंग झाली होती. विजय तिला भानावर आणीत म्हणाला, " काय, बरोबर आहे की नाही आपले रामायण ? "

" होय ! " मनिषा भानावर येवून सावकाश उत्तरली आणि नकळतच तिच्या डोळ्यातून गंगा – यमुना वाहायला लागल्या. हे बघून विजय अगदी चकित होऊन म्हणाला " काय ग ! का रडतेय मनिषा? आणखी काही वेगळं आठवतंय का तुला! " मनिषा मात्र फक्त रडतच होती. बराच वेळपर्यंत तिने विजयच्या प्रश्नास दाद न देता मनसोक्त रडून घतलं. आणि मग म्हणाली, " नाही विजय, मला दुसरं काहीच नाही आठवत पण मी पुढच्या विचारानं अस्वस्थ आहे. विजय चकित मुद्रेने पहात म्हणाला " पुढचा विचार म्हणजे ? " मनिषा म्हणाली " विजय, आपल्या या अतूट प्रेमसबंधात माझे वडिल हा एक फार मोठा अडथळा आहे. त्यांनी माझं बाहेर यणंजाणंही बंद केलयं. आणि म्हणूनच आज मी कहीतरी या बागेत तुला भेटायला आले आहे. त्यांना आपला विवाहच मंजूर नाही. त्यांना कल्पना सुद्धा सहन होत नाही रे" वेळ बरीच झाली होती. सगळीकडे अंधार पडल्यामुळे बागेत ती दोघेच होती ते पाहून दोघेही उठून आपआपल्या मार्गांने घरी परतली ती दुःखी मनानेच

खरंच मनिषाचं बाहेरच फिरणं बंद झालेलं होतं. ती फक्त कॉलेजात येत होती आणि या दोन–तीन दिवसांत विजयलाहि तिच्याशी बोलण्याची संधी मिळाली नव्हती. आणि तिसऱ्याच दिवशी मनिषाचा अपघात होवून ती दवाखान्यात आहे असे विजयला तिच्या बरोबरच्या खेळाडूंकडून समजले. विजयने तिच्या एका मैत्रिणीला सविस्तर विचारले असता त्याला समजले की तिच्या वडिलांनी तिचं लग्न तिच्या मनाविरूद्ध करायचं ठरवलं होतं. आणि ती फारच गंभीर झाली होती. आणि त्याबाबतचा विचार करीत ती कॉलेजात येत असतांना तिला ट्रकने धडक दिली होती आणि तिचे खूपच रक्त गेल्यामुळे ती जागच्या जागी बेशुद्ध पडली होती. तिच्या मैत्रिणीने विजयला सांगितले की, कदाचित तिला रक्ताचीही गरज पडेल.

मनिषाचे खूपच रक्त गेल्यामुळे ती दवाखान्यात मृत्यूशी झुंज देत होती. आणि सारखं विजय' म्हणून हाक मारीत होती· डॉक्टरांनी सांगितले की ' हिला रक्ताची एक बाटली तरी द्यावी लागेल आणि ती तुम्हाला शोधावी लागेल. कारण तिचा रक्तगट ' बी निगेटिव्ह ' आहे. आणि ते माझ्याकड शिल्लक नाही ! तिच्या वडिलांनी खूप शोधाशोध केली पण रक्त कोणत्याही रक्त संचायिकेत शिल्लक नव्हते म्हणून त्यांनी रेडिओ, टी. व्ही. तसेच वर्तमान पत्रातून जाहिराती दिल्या आणि रेडिओवरील बातमी ऐकून विजय भानावर येवून थोडा खुष झाला व म्हणाला ' प्यार कभी झुकता नही ' कारण त्याचे स्वतःचे रक्त बी निगेटिव्ह गटाचेच होते. तो तसाच उठून बेधडक दवाखान्यात गेला. त्याला पाहून तिच्या वडिलांचा पारा अधिकच चढला. त्याने त्याचा विचार न करताच त्यांनाम निषाबद्दल विचारले तोच मनिषाचे वडिल खूपच जोरात म्हणाले, "खबरदार माझ्या मुलीच नांव जिभेवरही आणलंस तर." पण विजय मनातून खूष होता. तो मनातच पुटपुटला

' तिचे नांवच नाही तर प्रत्यक्ष तिलाच घेऊन जाईन बघा तर खरं आणि असं म्हणून विजय प्रत्यक्ष डॉक्टरांना भेटला व मनिषाला स्वःतचं रक्त देण्यासंबंधी त्यानं डॉक्टरांना विनंती केली. वेळ फारच कमी असल्यामुळे डॉक्टरांनी मनिषाच्या वडिलांची परवानगी न घेता विजयला शेजारच्या पलंगावर झोपवून त्याच रक्त तिच्या रक्ताशी जुळणारं असल्याची खात्री करून घेऊन तिला रक्त देण्यास सुरूवात केली. आणि मग बाहेर येऊन तिच्या वडिलांना सांगितले की, एका विजय नावाच्या मुलाचं रक्त तुमच्या मुलीला दिलं जातयं. आणि आता तुमची मुलगी संपूर्णतः धोक्याबाहेर आहे'. ते ऐकून मनिषाचे वडिल खोलीत जाऊन फक्त बघतच राहिले. थोडयाच वेळात मनिषा शुद्धीवर आली. आपल्याला विजयचं रक्त दिल्यामुळे आपण मृत्यूपासून बचावलो असे जेव्हा तिला डॉक्टरांकरवी समजले तेव्हा ती सुद्धा खूपच आनंदित झाली. डॉक्टरांनी विजयचे आभार मानले. आणि म्हणाले "—

" विजय, तू आज रक्तदान नव्हे, तर जीवदान केलं आहेस. एका सुविचारी मुलाने सुविचारी मुलीला जीवदान केलयं."

## कणिका ......

* यथाशक्ति म्हणजे काय ? आपली सर्व शक्ती 'अंगचोरपणा न करता' खर्च करणे म्हणजे यथाशक्ति अशा शुद्ध प्रयत्नानेच सामान्यतः यश मिळते.

* मनुष्याचा लोभ आकाशापेक्षाही उंच जातो तर कधी पाताळापेक्षाही खाली जातो. म्हणून लोभाला मर्यादा पाहिजे.

* आम्ही आमचे दोष पाहू इच्छित नाही. पण दुसऱ्याचे दोष पाहण्यात आम्हाला मौज वाटते. ह्या सवयीतूनच माणसाचे बरेचसे दुःख निर्माण होते.

तिच्या वडिलांची मात्र मनःस्थिती द्विधा झाली पण ते सावरले आणि मनोमन खूष झाले. विजय मनिषाला काही बोलणार तोच तिचे वडिल तेथे आले अन त्याला म्हणाले, —

" बस विजय,! मला माहित आहे तू काय म्हणणार आहेस ते. मी मनिषाचा आणि तुझ्या विवाहाला संमती देत आहे. तू मनिषाला जीवनदान दिलंय! मी तुला नव्हे तुम्हाला कन्यादान करतोय. तुमची मनिषा सफल करतो आहे. मला असं वाटतं आहे की परमेश्वरानं तुम्हा दोघांना जणू एकमेकांसाठीच जन्माला घातलयं. "

डॉक्टरही यावर खूष झाले. आणि विजयला म्हणाले, " कॉन्ग्रेच्युलेशनस् मि. विजय! फॉर युवर सक्सेस! ... मला फक्त लग्नाला बोलवा म्हणजे झाले तुमच्यासारख्या सुविचारी युवकांनाच रक्तदानाचं महत्त्व समजतं तुम्ही रक्तदान नव्हे जीवन दान केलयं ! जीवनदान ! "

* *

* मनुष्य जेव्हा एक नियम मोडतो तेव्हा दुसरे नियम आपोआप गळून पडतात.

* फुकट गेलेला एकही क्षण पुनः परत येत नाही हे जाणूनही आम्ही किती तरी क्षण फुकट गमावतो.

* थेंबाथेंबांनी समुद्र बनला आहे. त्याचे कारण असे की बिंदूबिंदू मध्ये संपूर्ण सहकार्य असते. मनुष्यमात्राने हे समजावून घेतले पाहिजे.

* जे शक्य आहे ते अशक्य करणे जितके सोपे, तितकेच जे अशक्य आहे ते शक्य करणे कठीण आहे. जे अशक्य दिसते ते नेहमीच अशक्य असते असे मात्र नाही...





# 'नियती'

काळे हरी गंगाराम
S. Y. B. A.

दुपारचा १२-१चा सुमार होता. ऊन रणरणत होते. रेल्वे स्टेशनवर शुकशुकाट होता. रेल्वे तिकीट ऑफिसाच्या भिंती आळसावल्या होत्या! दूरवर पसरलेले रुळ! त्यांचा काळाभोर रंग भकास वाटत होता! पलिकडेच फावल्या वेळात गप्पा मारणारे अन् एक कान गप्पांकडे, दुसरा गाडीच्या आवाजाकडे ठेवणारे हमाल बसले होते. त्यांच्या चेहऱ्यावरचे भाव किती सूचक होते? कोणी सांगावे? एखादा मुलाला औषध घेवून जाण्याची इच्छा करीत असेल तर एखादा चैनीला लालसावलेला जीव बिडी पिण्याची मनोराज्ये करीत असेल! किती क्षुल्लक इच्छा! पण त्या देखील सर्वांना पूर्ण करता येत नाहीत!

गोपाळही त्या हमालांच्या गर्दीत मरगळलेल्या स्थितीत बसला होता. खरोखरच निष्पाप जीव-भोळा भाबडा, बायको मोलमजुरी करून अंथरुणाला खिळलेली. घरी म्हातारा बाप, चार कोवळी कच्ची बच्ची, इतकी माणसे, त्यातून बायको आजारी! 'दुष्काळात तेरावा महिना' होता त्याच्या घरात. त्यांच्या पोटासाठी तरी त्याला हमाली करणे भाग होते. अगदी चिडला होता तो त्याच्या परिस्थितीला.पण दोष तरी कोणाला देणार? सारा नियतीचाच खेळ हा ! आज बायकोला औषध न्यायला हवे होते.

'पूना बॉम्बे मेल प्लॅटफार्म नंबर तीनपर आकर खडी रहेगी' या घोषणेबरोबर तो भानावर आला. तो आता ताजा तवाना झाला. आशेची लाट त्याच्या चेहऱ्यावर उमटली. बायकोला औषध नेण्यासाठी तो धावाधाव करू लागला.

'बाई साहब,! आपका सामान तो विचारीत होता. उत्तर येत होते-

'नको, हात लावू नको. निराश होवून तो दुसरे गिऱ्हाईक पहात होता. तो एका ठिकाणी आला. तेथे दोन नखरेल यौवना उभ्या होत्या. 'बबिता आपण चालतच जाऊ बाई'! हो तेवढेच पाय मोकळे होतील व पैसे वाचतील,

'एऽऽ काय घेणार, हे सामान 'लेडीज होस्टेलवर पोहचवायला.?'

'बाई, होस्टेल गावापासून लांब आहे. सामानही फार आहे चार रुपये घेईन.

'छे नको मग, फार पैसे सांगतोय तो मी तीन रुपये देईन'

'बाई गरिबाच्या पोटावर पाय देवू नका'!

'हे बघ पोहचवायचे असेल तर पोचव. नाही तर आम्ही दुसरा हमाल बघतो.' अखेर आपल्या कच्या बच्यांच्या पोटात दोन घास जाण्यासाठी त्याने ते सामान उचलले.

आधीच तो आजारी अन् त्यात हे सामानाचे ओझे; पण लटपटत तो निघाला. 'बबिता, मी इथे आता ५-६ 'शो' पाहणार! पार्टर्या झोडणार, चैन करणार, सध्या माझ्याजवळ १०० रुपये आहेत. शिवाय सीमाची मनिऑर्डर येणार आहे नां ! मग काय काळजीच मिटली'. गोपाळ मनात म्हणत होता- 'चैनीखातर शेकडो रुपये उडविणारे हे जीव आमच्या पोटावर मात्र निर्दयपणे पाय देतात.'

सामान लेडीज होस्टेलवर आले. बाईसाहेबांनी दहाची नोट पुढे केली. ' बाई, माझ्याकडे सुटे पैसे नाहीत. सुटे असले तर दया ना ! त्याने याचना केली. ' हे बघ! माझ्याकडे सर्व दहा दहाच्याच नोटा आहेत; त्यापेक्षा तू असं कर, उद्या येथे येवून पैसे घेवून जा ! आणि त्या दोघी तो बोलायच्या आतच निघून गेल्या. आता त्याला आणखी वणवण करणे भागच होते. दुसऱ्या दिवशी तो लेडीज होस्टेलच्या दाराशी आला. भैय्याने त्याला तेथेच अडविले.

' जाऊ दया ना साहेब मला आत ! काल त्या बाई गावाहून आल्या आहेत ना! त्यांच्याकडून हमालीचे पैसे घ्यावयाचे आहेत. ' त्याने साद घातली–

' बाई ऽऽऽ ' त्याच बरोबर ती तरूणी चरफडत बाहेर आली ' कोण रे तू ? काय पाहिजे तुला ? या प्रश्नानेच त्याचे काळीज फाटत गेले. ' बाई हमालीचे पैसे. जी '...

' मेला गुंडच दिसतोय हा ! वाटेल तिथे घुसून पैसे मागतोस ? ! काही वाटते कारे तुला ? ! ?

## कणिका .....

* सरळ रस्ता जितका सोपा तितकाच कठीण असतो. असे जर नसते तर सर्वांनी सरळ रस्ताच स्वीकारला असता.

* शुद्ध अंतःकरणातून निघालेला शब्द कधीही निष्फळ होत नाही.

* चूक तेव्हांच संपते की, जेंव्हा ती दुरुस्त केली जाते चूक जर दडपून टाकली तर जळवांप्रमाणे फुटते आणि भयंकर रुप धारण करते.

आता तोही संतापला. ' बाई मानुसकीने वागा'

' मेल्या मला माणुसकी शिकवतोस ? गणपत याला बाहेर काढ, मवाली आहे मेला हाकेसरशी गणपत बाहेर आला.

गोपाळचे काहीही न ऐकता धक्के मारून त्याने गोपाळला बाहेर काढले

तो विषण्णतेने खाली मान घालून चालत असताना वरच्या खिडकीतून त्याच्या कानी शब्द पडले–

' बबिता, काय टॉप बनवलाय् नाही त्या मेल्याला ! अग तीन रुपये वाचले. त्यात एक मॅटिनी तर होईलच. हा ऽऽ हा ऽऽऽ !

त्याच वेळी गोपाळला ती दवाखान्याची पांढरी शुभ्र इमारत दिसली. त्याने पुन्हा डोके खाली घातले. अन् त्याच वेळी त्याच्या डोळ्यातून खळकन् अश्रू गळाले अन् ते मातीत मिसळले.

* *

* भीती एकाच गोष्टीची वाटली पाहिजे. ती म्हणजे गलिच्छ किंवा खोटे कृत्य करण्याची.

## * आळस-

आळस हा प्रबळ शत्रू आहे. हुशार शत्रू आहे. माणसाच्या मनाच्या किल्ल्याला त्याचा नेहमीच वेढा असतो. अचानक केंव्हा हल्ला होईल हे सांगता येत नाही. हल्ला सुरु झाला म्हणजे तो थांबत नाही. मग आळशीपणाची सवय लागते. आळशीपणातच आनंद वाटती.



# प्रायश्चित्त .....

कु. मंजुषा चौधरी
S. Y. B. com

रात्रीची वेळ ..बाहेर मुसळधार पाऊस कोसळत होता. रात्रीची भयाण शांतता मन अस्वस्थ करीत होती. मी आणि पायल, माझी मोठी बहीण– आम्ही डाकबंगल्यात उतरलो होतो. डाकबंगला गावापासून बराच दूर होता. डाकबंगल्यातच एका बाजूला दिनू आणि त्याचे कुटुंब रहात होते. बंगल्याचीं सारी व्यवस्था, साफसफाई ते करायचे. पायलची प्रकृती ठीक नसल्यामुळे डॉक्टरानी तिला हवापालट करण्यासाठी शांत निसर्गरम्य ठिकाणी नेण्यास सांगितले म्हणून आम्ही गावाबाहेरचा हा डाकबंगला थोडे दिवस राहण्यासाठी पसंत केला. मी बिछान्यावर पडले होते पण झोप येत नव्हती. त्याचवेळी मला बंगल्याचे फाटक उघडण्याचा आणि नंतर दार ठोठावण्याचा आवाज आला. इतक्या मुसळधार पावसात कोण बरं आलं असेल ? असा विचार करीत मी दिनूला हाक मारली व दार उघडण्यास सांगितले. दारात एक माणूस उभा होता. चेहऱ्यावरून खूप घाबरल्यासारखा वाटत होता. तो आत येऊन म्हणाला, " डॉक्टर ! तुम्ही येथे उतरला आहात हे समजले म्हणून मी इकडे आलो. माझी मुलगी फारच आजारी आहे. बिछान्यात अगदी तळमळते आहे. डॉक्टर! तिला कसेही करून वाचवा हो ! मी तुमचे उपकार जन्मभर विसरणार नाही. आमच्या जीवनाचा ती एकच आधार आहे. " " पण ! " मी म्हटले. " पण वगैरे काही नाही. मी गाडी सुद्धा आणली आहे. तुम्ही लवकर चला " मी जास्त आढेवेढे न घेता पायलला सांगून निघाले.

गाडीतून जातांना तो सांगू लागला, " डॉक्टर मला वाटते माझ्या गतजीवनातील पापाची शिक्षा माझ्या मुलीला मिळते आहे. मी वाईट मार्गाने पैसा मिळवून श्रीमंत झालो. पण माझ्या पापाची शिक्षा मुलीला का बर मिळावी ? मी त्याचे प्रायश्चित्त घ्यायला तयार आहे. त्या दुर्दैवी मुलीचा शाप तर माझ्या मुलीला लागला नसेल ना ? तो प्रसंग मला अजूनही आठवतो. त्या वेळी मी चोरी करून पैसा मिळवित असे, प्रसंगी हत्याही करीत असे. त्या दिवशी मला काहींच मिळाले नव्हते. म्हणून मी रेल्वे स्टेशन-वर फिरत होतो. माझ्या समोर एक जोडपं झोपलेलं होतं. त्याच्या लहान मुलीच्या पायात सोन्याच्या साखळ्या होत्या. त्या चोरायचे मी ठरविले. आजू-बाजूला पाहिले. स्टेशन संपूर्ण रिकामे होते. रात्रीची वेळ असल्याने तेथे कुणीच नव्हते. मी त्या मुलीला अलगद उचलले आणि पाय न वाजवता निघालो. तिच्या पायताल्या साखळ्या काढण्याचा प्रयत्न केला. पण व्यर्थ! शेवटी तिचे पाउल कापून मी साखळ्या पळवल्या. त्यावेळी मला तिच्याविषयी जराही दया उत्पन्न झाली नव्हती, मी तिला तेथेच सोडून निघून गेलो होतो. " तो पुढे सांगत होता पण मला पुढचे शब्द ऐकूच येत नव्हते. माझ्या बहिणीचा, पायलचा चेहरा माझ्या डोळ्यासमोर येत होता. असे वाटत होते या माणसाचा आताच खून करून टाकावा ज्याने माझ्या बहिणीला आयुष्यातून उठविले आहे. त्याच वेळीं गाडी थांबली. गाडीतून उतरतांना एक मन म्हणत होते तेथून परतून जावे. पण दुसरे मन कर्तव्य करण्यास सांगत होते. भावनेपेक्षा कर्तव्य श्रेष्ठ असते आणि बापाची शिक्षा मुलीला का म्हणून द्यावी ?

घेण्याची विनंती केली. मी म्हटले की तुम्हाला माझ्या बहिणीला द्यावी लागेल कारण तिच्या सांगण्यावरूनच मी येथे आले होते. म्हणून मी परत त्याला डाकबंगल्यावर घेऊन आले. आणि पायलच्या खोलीत घेऊन गेले. पायलच्या पायावरील पांघरूण दूर करीत मी म्हंटले, हीच ती मुलगी, जिला तुम्ही आयुष्यातून उठवली. तिच्या पावलं नसलेल्या त्या पायांकडे बघून तो जोरात किंचाळला आणि तो धक्का सहन न होऊन खाली कोसळला. त्याच वेळी पायलला जाग आली. ती म्हणाली, " अग हे काय केलंस ! फी वसूल केली. कारण मला त्याच्या बोलण्यावरून समजलें होते की त्याला दोन वेळा हार्ट-अॅटॅक येऊन गेला होता. आणि तिसऱ्या धक्क्याला तो जिवंत राहणार नव्हता म्हणूनच मी त्याला हे सत्य ऐकविले. माझी फी मी वसूल केली होती. एक प्रकारचे समाधान वाटत होते. त्याने त्याच्या पापाचे प्रायश्चित घेतलं होते.

* *

* Do all the good you can,
by all the means you can,
in all the ways you can,
in all the places you can,
at all the times you can,
to all the people yau can,
as long as ever you can,

– John wesley

## ज्वालामुखी

दुबळेपणा आमच्या रक्तातच भिनलाय
सार शरीर कसं संवेदनाशून्य झालं आहे
पोखरते आहे महागाई आमचे संसार!
पण तरीही आम्ही चिडत नाही
म्हणतो, ' याला काही इलाज नाही '
सारे निमूटपणे सहन करतो
आमच्या डोळ्यादेखत नेत्याचा खून होतो
आईबहिणींची अब्रू लुटली जाते
पण– आम्ही! हताशपणे पहात असतो
त्याच दुबळेपणानं !

कधी बदलणार हे सारं ?
कधी येणार आमच्या मनगटात ताकद ?
कधी पेटणार आमची स्वाभिमानी मनं ?
भडकता ज्वालामुखी
कधी नष्ट करणार
हा दुबळेपणाचा प्रचंड राक्षस ?
हा दुबळेपणाचा प्रचंड राक्षस !

नितीन दिवाकर कुळकर्णी
S. Y. B. Com





साहित्य मंडळ कार्यकारिणी



कलामंडळ कार्यकारिणी



जिमखाना कार्यकारिणी



रत्नाकर नेमाडे
पूणे विद्यापीठ बॉस्केट बॉल संघ कर्णधार १९८६/८७



यशवंत देसर्डा
पूणे विद्यापीठ संघ बॉस्केट-बॉल खेळाडू



प्रशांत देशपांडे
पूणे विद्यापीठ संघ बॉल बॅडमिंटन खेळाडू



"बाळ जोशाला नक्की काय वाटतं"
या पुरुषोत्तम करंडक प्राप्त करुन देणारे यशस्वी
कलाकार



आरती राव
पुणे विद्यापीठ संघात
हॅण्ड बॉल मध्ये निवड



'चिऊ ताई चिऊ ताई दार उघड' धुळे येथील
स्पर्धेत प्रथम व एकूण पाच पारितोषिक
मिळविणारा चमू



विनया साठे
पुणे विद्यापीठ हॉकी संघात
निवड उत्कृष्ट विद्यार्थिनी १९८...



वर्ग प्रतिनिधी समवेत
प्राचार्य व उपप्राचार्य



अल्पना सैनी
पुणे विद्यापीठ बॅडमिंटन
संघात निवड



वसतिगृह कार्यकारिणी



सतीश कोगटा
पुणे विद्यापीठ कबड्डी
संघ कर्णधार



जळगाव विभागाच्या संघात निवड



इ. पी. सुरेश
T.Y.B.Com
पुणे विद्यापीठ फुटबॉल
संघ खेळाडू



आंतर विभागीय खो खो
विजयी संघ



जितेन्द्र चांगरे
१२ वी सायन्स
सायकलने भारत भ्रमण



सतत सहा वर्ष विजय मिळावणारे आंतर विभागीय बॉस्केट बॉल संघातील विद्यार्थी



कु. विद्या सबनीस
M.Sc. (गणित) सर्व प्रथम



जळगाव ते पैठण सायकल प्रवास
उभे असलेले : गो. वि. जाधव, दि. रा. पाटील, दि. र. पवार
बसलेले : स. श्री. कुळकर्णी, मुश्रीफ हुसेन शेरन, मु.ध. पाटील



कु. प्रभा पांडुरंग बुलबुले
M.A (मराठी) सर्व प्रथम



ऑल इंडिया सायकल एक्स्पीडीशन
एन. सी. सी. चे विद्यार्थी



कु. शुभदा सुधाकर भागवत
M.Com सर्व प्रथम

# ॥ हिंदी विभाग ॥

# ❀ अनुक्रम

## ❀ लेख


* मैथिलीशरण गुप्त – एक परिचय – गीता जेठानी १

* किसान विरोधी कृषि नीति – हेमंत पाटील ५


## ❀ कथा


* गंगा – रतन ब्राह्मणे ९

* अंकुराते टूटे पंख – नीलकंठ खडके ११


## ❀ कविता


* सागर धरती और अंबर – महेशकुमार शर्मा ४

* हम एक है – जयप्रकाश चौबे ४

* आस – हर्षा भाटिया १०


# मैथिलीशरण गुप्त– एक परिचय


कु. गीता जेठानी
M. A.


हिन्दी काव्य जगतमें मैथिलीशरण गुप्त जी का वही स्थान है जो आसमान में चंद्रमा का, बगिया में फूलों का है। इस महान व्यक्ति का जन्म ३ अगस्त सन १८८६ को चिरगाँव, जिलाँ झाँसी में हुआ था। इनका संयुक्त परिवार हुआ करता था। गुप्तजी की रामोपासना, अट्ट भक्ति, ललित एवं सरल जीवन का आग्रह यह सब संयुक्त कुटुंब-व्यवस्था के संस्कारोंकी देन थी।

मैथिलीशरण गुप्त जी को कालिदास और भास के प्रति विशेष मोह था। गुप्त जी आदर्श मानवता-वादी कवि थे। इनपर नवीन सभ्यता का प्रभाव था। गांधीजी के अनुयायी होने के नाते गुप्त जी अहिंसा के पुजारी, पतितों के उध्दारक और नारियों की स्वतंत्रता के समर्थक थे। गुप्त जी अपने देश के अतीत गौरव पर अभिमान करनेवाले और उज्ज्वल भविष्य के स्वप्नद्रष्टा थे। इनका बाहरी व्यक्तित्त्व सीधा – सादा था। गुप्त जी के काव्य में उपेक्षित नारियोंके प्रति सम्मान की भावना तथा राष्ट्रीयता की भावना प्रमुख है।

मैथिलीशरण गुप्त ने अपने काव्य में उपेक्षित नारियों का यथार्थ तथा हुबहू चित्रण किया है। इन्होंने न केवल उपेक्षित नारियों के अपने काव्य में अमर किया, बल्कि उनका स्तर भी ऊँचा उठा दिया। गुप्त जी के नारी पात्रों में हृदय की भावनाएँ अधिक व्यक्त हुई है। यह पुरुष की तरह बुद्धिमान नहीं, इसलिए छल, कपट, द्वष–ईर्ष्यादि दुर्गुणों से दूर है। प्रेम, दया, करूणा, सहानुभूति ही उनमें अधिक मिलती है। गुप्त जी के मतानुसार नारी की शोचनीय स्थिति का उत्तरदायित्व पुरूष पर है। इस बारें में प्रो. धर्मेन्द्र ने लिखा है– " गुप्त जी के कवि– संसार की प्रायः सभी नारियों का अवतरण तो अबला रूप में होता है, किन्तु पुरुषों के तिरस्कार की चोट खा कर वही अबला प्रबला में परिवर्तित हो जाती है। "

मैथिलीशरण गुप्त जी का ' साकेत ' महाकाव्य उपेक्षित नारी ' उर्मिला ' पर प्रकाश डालता है। उर्मिला एक ऐसा नारी पात्र है, जिस पर किसी कवि का ध्यान नहीं गया। गुप्त जी के नारी पात्रों का विरह पत्नीरूप, मातृत्व, स्वाभिमान सभी कुछ अपूर्व है। ' साकेत ' में सीता, उर्मिला, कौसल्या, सुमित्रा का पक्ष तो उज्ज्वल है ही किन्तु साथ ही साथ गुप्त जी ने युगों से उपेक्षित पात्र ' मन्थरा ' को भी सहानुभूति का पात्र बना दिया है। उनके मतानुसार सारा दोष मन्थरा का भी नहीं था, कुछ परिस्थिति का भी था।

इनकी पहली रचना ' रंग में भंग ' नववधु के त्याग और वीरत्त्व की कहानी है। 'जयद्रथ-वध' की उत्तरा क्षत्राणी रूप में अभिमन्यु को युद्ध के लिए प्रेरित करती है। सेवा परोपकार में सावित्री, सुकन्या, अंशुमति, गार्हस्थ क्षेत्र में अनसूया, दमयन्ती और गांधारी जैसी पतिपरायण नारियाँ हुई।

' यशोधरा ' महाकाव्य में यशोधरा को गुप्त जी ने एक आदर्श भारतीय नारी के रूप में अंकित किया है। गौतम बुद्ध यशोधरा को छोडकर चले

जाते हैं। यशोधरा विरह में दुःखी तो अवश्य है, किन्तु इस दुख में स्वार्थ का भाव नहीं है, और न वह पथ-बाधा बनना चाहती हैं। वह तो चाहती हैं कि, वे जन के दुख से दुखी न हो और मुक्ति का उपाय खोजे, जो सबकी मुक्तिका उपाय खोज रहे है वे उसकी मुक्ति क्यों नहीं करेंगे ? इस आत्मविश्वास के साथ वह जीती है। यशोधरा के रूप में गुप्त जी ने ऐसी नारी का चित्र साकार किया है .. जिसने सहा सब कुछ है और अपना सब – कुछ दिया भी है। वह अपना संयम कभी नही खोती। गुप्त जी के नारी पात्रों के जीवन में करुणा की एक अन्तर्धारा प्रवाहित रहती हैं।

'यशोधरा' में गुप्त जी कहते है-

"अबला जीवन हाय तुम्हारी यही कहानी,
आँचल में है दूध और आँखों में पानी।"

गुप्त जी का कोई भी पात्र निष्क्रिय नहीं मिलेगा। हाँ, विरह की चरम अनुभूति उनके नारी पात्रों को होती जरूर है। रीति काव्य में व्याप्त विलास से ग्रस्त नारी को उठाकर साधना-तपस्या के उच्चासन पर बिठा देना इनकी विशेषता है। गुप्त जी ने रीतिकाव्य की सडी गली संकुचित गलियोंमें भटकती हुई नारी को पुन भारतीय गौरव से मंडित कर दिया। गुप्त जी ने मानव मन के विश्लेषण से ही कैकयी को सामान्य धरातल से उठाकर हमारी नजरों में महान बना दिया।

डॉ. सत्येन्द्र के अनुसार " गुप्त जी ने स्त्रियों में भारतीय आदर्श के ढाँचे में दिव्यता भरने की चेष्टा की है। स्त्रियों का जो भारतीय आदर्श दीर्घकालीन परम्परा- युक्ति के कारण अनुदार और सूखा सा दीखने लगा था और क्रांति के स्फुल्लिगों को विस्फोटन के लिए प्रेरित कर रहा था, उसी को नये भावुक तर्क से सजाकर नयी आत्मा से अभिसंचित कर दिया है।"

'साकेत' की उर्मिला वियुक्त है, उसका विरह वर्णन एकान्तिक है। 'उर्मिला' के गीतों में उसकी निरीहता, सदाशयता और उत्कट वेदना प्रकट हुई है। चौदह वर्ष की लम्बीं अवधि के वियोग के दिनों में भरपूर भारस्वरूप जीवन को उस बेचारी ने रो-रोकर कैसे काटा इसका सुंदर चित्रण गुप्त जी ने इन दो पंक्तियों में किया है।

"अवधि शिला का था उर पर गुरू भार।
तिल-तिल काट रही थी दृग-जल धार॥"

मैथिलीशरण गुप्त जी के काव्य का चरम तथा महत्त्वपूर्ण बिंदू है राष्ट्रीयता की भावना। यह भावना उनकी हर कृति में कुटकुटकर भरी हुई है। मैथिलीशरण गुप्त जी द्विवेदी-युगीन कवि थे। द्विवेदी युग का काव्यदर्शन समाजोन्मुखी था। देश, समाज और संस्कृति के सुघर चित्र प्रस्तुत करना उस युग के कवियों का लक्ष्य था।

गुप्त जी के समय समकालीन, राजनीतिक और सामाजिक परिस्थितियाँ भिन्न भूमियों को अपना रही थी। काँग्रेस के उत्थान और राष्ट्रीय आन्दोलन के फलस्वरूप देश प्रेम की भावना को जागृत करना और फैलाना ही कवियों का परम कर्तव्य था। आर्यसमाज के आन्दोलन में अन्धविश्वास, अवतारवाद और मूर्तिपूजा का खण्डन किया। जिसके परिणाम स्वरूप देश और समाज के उद्धार में सहयोग देना कवियों का उद्देश बना। यह भावना सर्वप्रथम गुप्त जी के काव्य में मुखरित हुई। उनकी 'भारत-भारती' ने सबसे पहले जन-जागृति को प्रेरित करने का कार्य किया। प्रत्येक व्यक्ति के हृदय में जो क्रान्ति भारत-भर में उत्पन्न हो चुकी थी। वह 'भारत-भारती' की भाषा में प्रतिध्वनित हो उठी।





गुप्त जी ने राष्ट्रवादी गीतों की रचना की जिनमें देश की भक्ति की और तत्कालीन राष्ट्रवादी राजनीति की अभिव्यक्ति हुई है। सामाजिक, राजनीतिक चेतना, मध्यवर्ग का मर्यादावाद और कवि की वैष्णव भावना इन तीनों ने राष्ट्रवादी गीतों की भावधारा को, गम्भीर विचारों को, उदार कल्पनाओं को सौम्य और स्वर को मन्द बनाया है। गुप्त जी की सामायिक चेतना उर्ध्वमुखी थी।

गुप्त जी ने अपनी राष्ट्रीय भावना को 'मंगल घट' तथा 'वेतालिक' में उजागर किया है। 'विश्व-वेदना' में कवि ने युद्ध की विश्व-व्यापी समस्या का समाधान प्रस्तुत किया है। यह युद्ध विरोधी काव्य है जो विश्व वेदना का करूण स्वर है और भौतिक सभ्यता का दुष्परिणाम। इसे पढकर प्रत्येक व्यक्ति के मन में राष्ट्रीयता की भावना उत्पन्न होती है।

'सिद्धराणा' में गुप्त जी की राष्ट्रीयता है- प्राचीन गौरव से मण्डित आधुनिक राष्ट्रीयता। गुप्त जी के 'भारत-भारती' ने राष्ट्रीय चेतना को अधिक उभारकर मुखरित किया। अपना देश, अपनी जाति और अपने कर्तव्य के प्रति प्रेरणा देने का कार्य किया है। गुप्त जी शस्त्र-बल को शांति की स्थापना के लिए आवश्यक मानते है। उनके मतानुसार युद्ध से कोई अन्तिम कार्य सिद्ध नहीं होता।

मैथिलीशरण गुप्त जी ने सामाजिक प्रबोधन कर भारतीय जन-जीवन को समुन्नत बनाने का सफल प्रयत्न किया है। वे मानव को संदेश देना चाहते है कि, ऊपर उठने के लिए बार-बार प्रयत्न करते रहना चाहिए। जनतंत्र और राष्ट्रीयता ने मिलकर गुप्त जी को मानव वाद का पोषक बना दिया।

देश और समाज की प्रबुद्ध भावधारा को अपनाने में गुप्त जी अग्रणी है। इसलिए वे राष्ट्रकवि के रूप में सम्मानित है।

'भारत-भारती' ने गुप्त जी को राष्ट्र कवि के उँचे सिंहासन पर बिठाया। 'साकेत' ने उन्हें सार्थक किया।

"किन्तु हमारा लक्ष्य एक अम्बर, भू सागर,
एक नगर-स्सा बने विश्व, हम उसके नागर।"

* *

पत्नी : अजी सुनते हो, तुम्हे कोई बात की फिकं नही हमे तो राजश्री के शादीका बहुतसा सामान खरीदना है। कल तो इतवार है।

पती : तो क्या हुआ। इतवार को सिर्फ एक दुकान खुली रहती है। वहाँ अपनी पसंद की सारे चीजे मील सकती है और वह भी रिझनेबल दाम और बढीया।

पत्नी : अच्छा कौन सी है यह दुकान? जिसकी तुम इतनी तारीफ करते जा रहे हैं।

पती : वह है वैशाली.

**वैशाली स्टोअर्स**

१८२ नवी पेठ, जळगाव.

# सागर, धरती और अंबर

मेरा मन सागर है

स्वप्न की लहरें उस में आती हैं

एक दिन

वे तुम्हारे प्यार के मोती

मेरे हाथ पर धर जाएंगे।

मेरा मन धरती है

मैंने अपनी कल्पना के बीज उस में बोए है

एक दिन

बहारें, तुम्हारे प्यार के फूलों से

मेरा दामन भर जाएंगी।

मेरा मन अंबर है

मैंने उस में आशा की बदलियाँ देखी है

एक दिन

फुहारें, तुम्हारे प्यार की बूंदे

मेरे तपते हृदय पर बरसा जाएंगी।

उस दिन

मेरे मनका

सागर होना,

धरती होना और

अंबर होना

सार्थक हो जाएगा।

महेशकुमार शर्मा
F. Y. B. Com.

# हम एक है

आओ गायें हम सब मिलकर

एक हैं, हम एक हैं।

नहीं जगत में कोई ऐसा

हृदय न जिसने पाया हो

प्रित प्यार क्यो नहीं दिल में

मानव क्यों भरमाया है।

आओ गायें......।

देख युवा दिल अब तुझको

प्यार सभी को सिखाना है।

भटक चुका हैं जो भी मानव

पथ पर उसको लाना है

आओ गायें .....।

छोडो भेदभाव ये झूठा

तोडो रंगभेद के टंटे

आओ प्यार जगाये दिल में

प्यार का रंग भी एक है

आओ गायें......।

हम युवक है, क्रांतिदूत है

प्यार की क्रांति लायेंगे

सबसे अच्छा सबसे उंचा हिन्दोस्तां बनायेंगे

तिन रंग का बना तिरंगा फिर भी तिरंगा एक है

आओ गायें हम सब मिलकर

एक हैं, हम एक हैं।

जयप्रकाश चौबे
T. Y. B. A.



# किसान विरोधी कृषि नीति

हेमंत सोपान पाटील,
T. Y. B. A.

आज जिन माध्यमों से औद्योगिक पूंजी-संचय के लिए कृषक जनता को लूटा जाता है उनमें सर्वाधिक महत्त्वपूर्ण है वह माध्यम जिसमें कृषि मूल्य वास्तविक लागत खर्च से नीचे रखे जाते हैं। इस माध्यम के प्रयोग में ऐसी सफाई है कि सम्पत्ति की बढोत्तर का वास्तविक नियम इसके चलते कही नजरअंदाज हो जाता है। औद्योगिक उत्पादनों की ऊँची कीमतों तथा कृषि उत्पादनों की गिरी हुई कीमतों की स्थिती औद्योगिक खुशहाली का एक ऐसा माहौल बनाती है जिसमें यह तथ्य साफ भुला दिया जाता है कि सम्पत्ति की वास्तविक वृद्धि सिर्फ खेती में ही होती है और इस बात में खेती से मेल खानेवाला कोई भी उद्योग आज तक नहीं पैदा हुआ।

कृषि उत्पादनों की गिरी हुई कीमतों के उचित होने का आभास बनाने में बडी ही अवांछनीय भुमिका कृषि मूल्य आयोग की रही है। इस आयोग का गठन सन १९६५ में कृषि उत्पादनों के मूल्य सुझाने के उद्देश्य से किया गया था। इस आयोग का कार्य बिना बजह ही गोपनीय रखा जाता है। कृषि उत्पादनों के मूल्य निर्धारण में लागत खर्च के अलावा सामान्य मूल्य स्थिति तथा विभिन्न सामाजिक वर्गों के हितों पर भी विचार करने के लिए आयोग बाध्य है। वैसे आयोग को इन अतिरिक्त मामलों में दखल अंदाजी न करने की न तो कोई छूट है, न ही उसकी इस तरह की दखल अंदाजी करने की कोई शक्ति ही बनती है। इस सबके अलावा लागत खर्च खोजने में आयोग किसी भी उत्पादन के लिए किसी एक कृषि तकनीक पर आधारित विचार नहीं करता। बल्कि एक दुसरे से एकदम विभिन्न तकनीकों की लागत का एक औसत निकालकर अपना काम चलता है। इस तरह से निकाले गये उत्पादन खर्च का वास्तविक खर्च से कोई संबंध नहीं बनता। अक्तूबर १९८३ की शेतकरी ( किसान ) संघटना, महाराष्ट्र की पंढरपूर रैली और मार्च १९८४ के 'शेतकरी संघटना' तथा भारतीय किसान युनियन के चंदीगढ आंदोलन के फलस्वरूप कृषि मूल्य आयोग की ये करतूतें आम तौर पर प्रकाश में आयी।

एक बैलगाडी में करीब ३ कूंतल (क्विंटल) गोबर की खाद बैठती है। लेकिन इस शास्त्रीय और तज्ञ आयोग ने खेत में डाले गये एक बैलगाडी गोबर खाद की कीमत रू. ३।– मात्र तय की है। जबकि आज एक गाडी गोबर की खाद की कींमत लगभग रू. ३५ से रू. ४० से नीचे नहीं है।

फसलोंपर किटकनाशक दवा छिडकने के खर्च का हिसाब भी कृषि मूल्य आयोग ने इसी तरह वास्तविक खर्च से कम दिखाया हैं। छिडकाव की दवा, स्प्रे पंप किराया, पानी लानेवाला, तथा छिडकाव करनेवाला आदमी इनका विचार करते हुए यह लगता है कि कृषि मूल्य आयोग ने कितना गलत हिसाब सामने रखा है। क्या यह संभव है?

कृषि मूल्य आयोग के सिंचाई खर्च के अनुसार बीजली बील का भुगतान तक नहीं हो सकता।

जबकि इसमें कुँआ खुदाई, कुँआ बांधना, इलेक्ट्रीक मोटार, स्टार्टर तथा बीजली कनेक्शन आदि बाकी रह जाता है।

ऊपर निर्देशित आकडों से यह स्पष्ट पता चलता है कि, कृषि मूल्य आयोग के सदस्य तथा तज्ञों का भारतीय किसान तथा किसानी से कोई रिश्ता नहीं है। उनमें वे लोग कार्यरत हैं जिन्हें धूप, ठण्ड एवं बारीश, आँधी, ओले जैसी चीजों की जानकारी नहीं है। ऐसे ही लोग किसानों के पसीने के दाम निर्धारित करते है। यह स्वतंत्र भारत के किसानों का क्रूर मजाक है। उनके साथ जान बूझकर शासन खिलवाड कर रहा है।

बाद में कृषि मूल्य आयोग की कार्यपद्धति के विरोध का माहौल कुछ ऐसा ही हुआ कि चुनाव सभाओं में प्रधानमंत्री श्री. राजीव गांधी को भी इस प्रश्न पर बोलना पडा। लेकिन झुठे आश्वासनों के चुनावी दौर में उन्होंने भी 'सरकार किसानों को उचित मूल्य मिले इस लिए नये कार्यक्रम आरम्भ करनेवाली है।' इस सफेद झूठ को कई सभाओं में दोहराया। २३ फरवरी १९८५ को कृषि मंत्रालय ने घोषणा कर दी कि कृषि मूल्य आयोग का नाम बदलकर 'कृषि व्यय तथा मूल्य आयोग' किया जा रहा है। आयोग की कार्यशैली सरकार के विचाराधीन है तथा इस पर तीन-चार महीनों में निर्णय किया जायेगा। १५ मार्च ८५ को कृषिमंत्री श्री. बटासिंह ने इस बात को लोकसभा में दोहराया कि आयोग की कार्यशैली में महत्त्वपूर्ण सुधार किये जायेंगे। १८ मार्च को इन्होंने यह बताया कि 'इस तरह सुधार सुझाने के लिए कोई आयोग गठित करने का सरकार का विचार नहीं है।' १५ अप्रैल ८५ को उन्होंने लोकसभा में बताया कि 'आयोग में सिंचित तथा सुखे इलाकों के किसानो तथा भूमिहीन मजदूरों के प्रतिनिधियों को भी शामिल किया जायेगा।' दिसम्बर में इसी का पुनरूच्चार किया गया और कहा गया कि 'आयोग में धनी, मध्य तथा छोटे किसानों का एक-एक प्रतिनिधि शामिल किया जायेगा।' इस एक साल के दौरान आयोग के पूनर्गठन या उसकी कार्यशैली के पूनर्निधारण के विषय में कोई भी ठोस कदम नहीं उठाया गया। अर्थात कई जनसभाओं में मंत्रियों ने यह कहना जारी रखा कि किसानों को उचित दाम मिलने चाहिए या मिल रहे है। डायरेक्टर ऑफ मार्केटिंग एन्ड इन्स्पेक्शन के 'सुवर्ण महोत्सव' के अवसर पर बोलते हुए हमारे राष्ट्रपति श्री. जैलसिंह जी ने कहा था कि 'किसानों को न सिर्फ उचित बल्कि ऐसे दाम मिलने चाहिए जिनसे खेती में कुछ मुनाफे की गुन्जाईश हो। (टाईम्स ऑफ इंडिया १६-१-८६) अगर उन सब पूराने झूठे आश्वासनों को ध्यान में लिया जाता है, तो राष्ट्रपति महोदय के कथन का इससे अधिक क्या अर्थ लगाया जाय कि वे यह जानते हैं कि कृषि उत्पादकों के वर्तमान मूल्य मुनाफा नहीं छोडते।

सारे भारतवर्ष के लिए इतने महत्त्वपूर्ण सवाल पर इस तरह का रूख अपनाने के साथ ही नई सरकार ने कृषि उत्पादनों के मूल्यों में लागत खर्च से पूर्णतया असम्बद्ध परिवर्तन लाते रहने की परंपरा ही चालू रखी है। लगता है इस घोषित परिवर्तनों का सम्बन्ध 'इन्डिया' की दूसरी जरूरतों से होता है न कि उत्पादन खर्चों से।

जैसे पिछली साल महाराष्ट्र की विधानसभा के नागपुर अधिवेशन में कुछ फसलों के मूल्य पूछे जाने पर जवाब में महाराष्ट्र के तत्कालीन कृषिमंत्री श्री. विजयसिंह मोहिते पाटील ने दि २३-१-१९८६ को जो स्पष्टिकरण दिया उसमें किसान विरोधी कृषि नीति की झलक स्पष्ट दिखायी पडती है।

| क्र. | फसल का नाम | राज्य समिति द्वारा निकाला गया उत्पादन खर्च रु. प्रति कूतल | केंद्र द्वारा निर्धारीत आधारभूत कि.रु.प्रति कूंतल |
|---|---|---|---|
| १ | कपास बी १००७ | ७६७-२६ | ५००-०० |
| | एच् ४ | ७६६-९८ | ५३५-०० |
| २ | गन्ना ८.५% | २७-६७ | १६-५० |
| ३ | मूंगफली | ४९३-०९ | ३५०-०० |
| ४ | ज्वार | २०२-३८ | १३०-०० |
| ५ | बाजरी | ३३८-३२ | १३०-०० |
| ६ | धान | | |
| | अति उत्तम | | १५०-०० |
| | उत्तम | २३१-१९ | १४६-०० |
| | साधारण | | १४४-०० |

केन्द्र ने गेहूँ के मूल्य भी ऐसे ही १५७ रू. प्रति कूंतल तय की थी पंजाब के किसानों के लिए गेहूँ पर ५ रु. प्रति कूंतल का बोनस दिया गया। बोनस का कारण राजनैतिक ही हो सकता है। क्यों कि, इसके साथ भी गेहूँ की कीमतें जोहल समिति के सुझाव १९० रु. प्रति कूंतल से बहुत नीचे हैं। भारतीय किसान युनियन को उपभोक्ता मूल्य सूचकांक पर आधारित माँग की अपेक्षा तो यह बहुत ही नीचे है।

किसान विरोधी नीति का वर्तमान उदाहरण नई कपडा नीति का है। अधिक उत्पादनवाली कपास की जातियों का सरकारी कार्यक्रमों के माध्यम से फैलाव और परिणामतः आवश्यकता से अधिक उत्पादन, इसके बावजूद समय - समय पर घरेलू दामों से ज्यादा दाम देकर भी कपास का आयात, निर्यात पर पाबंदी इत्यादि सरकारी नीतियों के कारण खुले बाजार में कपास के दाम पिछले दस साल में लगभग जैसे थे बने रहे। नई कपडा नीति का उद्देश्य स्पष्ट है कि कपडा उद्योग में कपास का उपयोग घटाकर मनुष्य निर्मित धागे का उपयोग बढाना। कपडा मिलों पर से कपास के उपयोग के सम्बन्ध में महत्त्वपूर्ण बंधन हटा दिये गये हैं। असर यह हुआ कि कपास के दाम और भी नीचे जाने लगे हैं।

कपास की खेती को इस प्रकार खत्म करनेवाली यह नीति ६ जून १९८५ को घोषित की गई जब कि कई इलाकोंमें कपास की बोआई या तो हो जाती है या बस् होनेवाली होती है। मतलब यह हुआ कि, किसानों को कपास के अलावा दूसरी कोई फसल उगाने का निर्णय लेने की मोहलत तक नहीं दी गई। एक तरफ कपास की आवश्यकता घटाने की योजना है, तो दूसरी तरफ कपास का उत्पादन बढाने के कार्यक्रम हं।

आयात निर्यात नीति भी कैसे कार्य करती है उदाहरण के लिए गत वर्ष से कपास की ३० लाख गाँठें वैसे ही पडी हुई है। इस वर्ष के उत्पादन-अनुमान तथा मिलों की आवश्यकता के आँकडों के आधार पर काफी मात्रा में कपास का निर्यात किया जा सकता था। बची हुई कपास में लम्बे धागे की कपास काफी मात्रा में है। इस कपास की देश की मिलों को अधिक आवश्यकता नहीं है। इन में से सिर्फ १ लाख गाँठों का निर्यात किया गया। (एग्रीकल्चरल सिच्युएशन इन इंडिया, अप्रैल १९८५) कारण यह बताया गया कि अन्तर्राष्ट्रीय बाजार में कपास के दाम घरेलू दामों की अपेक्षा कम है और देश की कपास को वहाँ माँग भी नहीं है। आंतर्राष्ट्रीय बाजार में कपास के दाम १० सेंट प्रति पौंड थे, जो यहाँ के दामों सें कम नहीं है। देश के कपास की बाहरी माँग इस पर निर्भर करती है कि निर्यात की कोई स्थायी नीति है या नहीं। ऐसी स्थायी नीति बनाने में सरकार को दिलचस्पी नहीं है।

दीर्घकाल के लिए वित्त नीति बन सकती है, औद्योगिक निर्बंधों के बारे में नीति बन सकती है, औद्योगिक उत्पादन के आयात - निर्यात की नीति

बन सकती है, लेकित कृषि उत्पादनों के दामों के बारे में दीर्घकालीन नीति आयात-निर्यात के मामले में नहीं बन सकती। हाँ, निर्यात पर बन्धनों के बारे मे दीर्घकालीन नीति कुछ मामलों में जरूर हैं। नई आयात – निर्यात नीति में भी धान उस सूची में हैं जिन चीजों का आमतौर पर निर्यात नहीं किया जा सकता। आज सरकार के अपने दावों के अनुसार ही गेहूँ, धान आदि का ‘ अतिरिक्त ’ उत्पादन हो रहा है। फिर भी इनके निर्यात की स्थायी नीति सरकार ने नही बनाई। पाकीस्तान को गेहूँ निर्यात करने की बात हुई थी। लेकिन इसमें भी श्री. के. पी. सिंहदेव ( टाईम्स ऑफ इंडिया १७-१-८६ ) ने कहा था कि अगर घरेलू दामों पर निर्यात करना पडा तो नहीं किया जायेगा। दो वर्ष पूर्व सरकार ने किसानों को दिये जाने वाले १५० रु. कूंतल के दामों की अपेक्षा बहुत अधिक दाम ( २५० रु. ) देकर गेहूँ का लगातार दो वर्ष तक आयात किया था, और इसमें सार्वजनिक राशि लगाई थी, लेकिन देश के किसानों को अधिक दाम देना मंजूर नहीं किया था। आज अगर थोडी और राशि लगाकर घरेलू दामों से कम मूल्य में निर्यात कर, भविष्य के लिए विदेश में देश के गेहूँ के लिए बाजार निर्माण करने में मदद मिलती हो, तो ऐसा क्यों नही किया जाता ?

फसल बीमा योजना की सरकार ने केंद्रीय बजट में घोषणा की। यह योजना खरीफ की फसलों को लागू हुई। इस योजना में गेहूँ, धान, बाजरा, विभिन्न दालें, तेलबीज और जबार की फसलों का बीमा कराया जा सकता है। यह योजनो वास्तव में फसल ऋण बीमा योजना है। यह योजना जी. आई. सी. और राज्य सरकारों को चलाना है। एक राज्य फसल बीमा फन्ड इसके लिए बनाया जायेगा जिसमें राज्य और केन्द्र सरकारें बराबर मात्रा में राशि जमा करेंगी। इस योजना में युद्ध और परमाणवीय कारणों से होनेवाले नुकसानों को छोड ‘ बाकी सभी ’ तरह के नुकसानों के लिए मुआवजा दिया जायेगा। बाकी सभी से क्या मतलब है यह स्पष्ट नहीं हैं। यह स्पष्ट नहीं किया गया है कि दामों के गिरनें से होनेवाले नुकसान को पूरा करने की व्यवस्था योजना में की जाएगी कि नहीं शायद नहीं— क्योकि नुकसान हुआ या नहीं इसका मापदन्ड कितनी फसल उगी यह होगा, न कि वह फसल बेचकर किसानों को पैसा कितना मिला। यह जाहिर है कि खेती को अस्थायी आरक्षित स्थिति में रखने की सरकार की सामान्य नीति पर इस योजना के चलते कोई भी असर पडने की उम्मीद नहीं की जा सकती।

सरकार की कृषि सम्बन्धी नीतियों से जाहिर हैं कि सरकार वहीं पुरानी नीतियाँ चला रही है जिनसे किसान को लूटा और अनुदानित किया जायेगा। जिनसे किसानों को आपस में लडा कर उन पर राज किया जायेगा। फर्क इतना ही पडा है कि ये नीतियाँ अधिक धारदार हो गई है जैसा कि कपडा नीति से स्पष्ट है। किसानों पर बढता कर्ज, लागत का बढता दाम तथा आधुनिक शहरी उत्पादन पर कृषि की बढती निर्भरता आदि समस्याएँ विशेष ध्यान देने लायक है। लेकिन केन्द्रीय समस्या कृषि उत्पादन को मिलनेवाले दाम सें जुडी है। कृषि व्यवसाय को अलाभकारी बनाये रखकर ही आज के पूरे के पूरे आर्थिक ढाँचे का बिकास किया जा रहा है। सरकार भी यह जानती हैं कि कृषि उत्पादन के लाभकारी मूल्य देने से उत्पादन में तीव्र गति से वृद्धि हो सकती है। लेकिन उसका उद्देश्य उत्पादन में वृद्धि का नही हैं बल्कि खेती की उपज पर सरकारी नियंत्रण कायम रखने और बढाने का है। इसीलिए, उत्पादन बढाने के साधन के रूप में आधुनिक तकनिक को एकमात्र जरिए के रूप में प्रतिष्ठित किया गया है। बाहरी तत्वों पर कृषि वित्तीय और तकनीकी निर्भरता इसी का नतीजा है। किंतु किसान आंदोलन ने आज यह स्पष्ट कर दिया है कि किसानों को उनके उत्पादन का लाभकारी मूल्य मिलना यह उनकी गरीबी और मजबूरी की अवस्था समाप्त करने तथा कृषि उत्पादन में तेजी से वृद्धि करने, दोनों का ही सही साधन है। लेकिन इसके लिए जरूरत है कृषि नीति बदलने की।

* *



# गंगा

रतन ब्राह्मणे
M. A. II.

रेल्वे लाईन से कुछ दूरीपर एक छोटा देहात है। गाँव के अधिकांश लोग खेत में मजदूरी करते हैं। वैसे देहातों में जो भी काम होता है वह खेती से सबंधित होता है। इसी गाँव में रामसा का एक छोटा परिवार है। उसके परिवार में पत्नी के अलावा उसकी बूढी माँ है। रामसा शराबी था। वह दिनभर मेहनत मजदूरी करता और जो कुछ मजदूरी मिलती उससे घर-गृहस्थी के अलावा थोडे पैसे घटिया शराब में खर्च करता था। बिडी की आदत तो उसे छह साल की आयु में ही बकरियाँ चराते वक्त हो गई थी। इस स्थिति में उसकी तबीयत कुछ ठीक नहीं रहती थी। बीमारी की जाँच करने को वक्त चाहिए था और वक्त उसके पास नहीं था। यदि वह बीमारी की चिंता करता रहता तो अपनी बूढी माँ और बीवी का पेट कैसे भर सकता था। दिन ब दिन बीतते गये। रामसा मजदूरी करता रहा। माँ तथा बीवी का पेट भरता रहा।

रामसा की बीमारी ने अब भयंकर रूप धारण कर लिया। अब रामसा की बीवी मजदूरी करने लगी क्योंकि घर के बर्तन आदि रामसा की बीमारी की भेंट चढ गये। लेकिन रामसा में कोई ऐसे आसार नहीं दिखे कि वह फिरसे उठकर बैठे। पत्नी ने भरसक कोशिश की। गाँव के वैद्यजी का इलाज अब पैसे के अभाव में बंद हो गया। पत्नी गंगा चाहते हुए भी रामसा को इलाज के लिए शहर नहीं ले जा सकी। उसने रामसा को भगवान के भरोसे सौंप दिया। लेकिन एक दिन जो होना था वह हुआ। रामसा की मृत्यु हो गयी। सास – बहु ने भगवान को खूब कोसा, गालियाँ दी। गरीब का दुःख भी क्या दुःख होता है ? पेट की आग में सब जल जाता है। गंगा रोज काम पर जाने लगी। बुढीया और भी कमजोर हो गई। लेकिन गंगा को मजदूरी करना जरूरी था। क्योंकि अपने पेट के साथ बूढो सास का जो पेट पालना था।

بڑھے آتے ہیں
دہشت ناک طوفاں کی طرح
اس سے پہلے کہ یہ فولادی حملہ آور
انسانیت کا ہر کعبہ مسمار کر دیں اور
دنیا کو بنا دیں جہنم کدہ
کاش! کسی گوشۂ آسماں سے اُبھر آئیں
غیب سے آنے والی ابابیلیں
چونچ میں دبائے ہوئے
ایٹمی کنکریاں!

لڑکا مایوس و نامراد دوسری طرف چلا گیا۔

نوجوان کا نمبر ٹکٹ کھڑکی کے قریب آ گیا تھا۔ اس نے ۴۵ روپے دیتے ہوئے کہا:

"بمبئی وی ٹی کا ایک ٹکٹ دیجیے۔"

بکنگ کلرک نے کہا "۴۴ روپے پچیس پیسے۔ آپ ۲۵ پیسے چھٹے دیجیے۔"

"فی الحال میرے پاس change نہیں ہیں۔"

نوجوان نے کہا:

"بھائی چھٹے تو میرے پاس بھی نہیں ہیں۔"

"تو پھر آپ کو ٹکٹ دوں یا نہیں؟ جلدی کہیے۔"

نوجوان نے سوچا ۷۵ پیسے ہی کی تو بات ہے۔ اس حجت میں گاڑی نہ نکل جائے۔ اسی وقت ٹرین کی آمد کا اعلان ہوا۔

نوجوان نے کہا: اچھا دے دیجیے ٹکٹ۔ ۷۵ پیسے کی تو بات ہے۔"

ٹکٹ لے کر جب وہ نوجوان پلیٹ فارم کی طرف تیزی سے جانے لگا تو اس کی پالش والے لڑکے سے ٹکر ہو گئی۔ لڑکے نے حسرت بھری نظروں سے اسے دیکھا۔ نوجوان نے شرم کے مارے آنکھیں جھکا لیں۔

••

# میر کی مقبولیت

• شیخ شبیر S.Y.B.A.

میر تقی میر ہر دور میں اردو غزل کے مقبول شاعر رہے ہیں۔ غالب، شیفتہ، ذوق، ناسخ، حالی اور حسرت جیسے بڑے شعراء نے میر کی سخنوری کی داد دی اور ان کے کمالِ فن کے سامنے سر جھکایا۔

غالب اپنا یہ عقیدہ ہے بقول ناسخ
آپ بے بہرہ ہیں جو معتقدِ میر نہیں

نہ ہوا پر نہ ہوا میر کا انداز نصیب
ذوق یاروں نے بہت زور غزل میں مارا

حالی سخن میں شیفتہ سے مستفید ہوں
غالب کا معتقد ہوں مقلد ہوں میر کا

شعر میرے بھی ہیں پُر درد لیکن حسرت
میر کا شیوۂ گفتار کہاں سے لاؤں

میر کی اس مقبولیت کا راز بقول ابو اللیث صدیقی یہ ہے کہ:

"میر کے یہاں اردو غزل آبگینے کی نزاکت کے ساتھ جلوہ گر ہے۔ اس میں سوز و گداز، درد و یاس، حسرت و ملال کے علاوہ اور بھی بہت کچھ ہے . . . ان کا غم ذاتی، اور انفرادی ہونے کے باوجود بڑا آفاقی نظر آتا ہے اور یہ اسی آفاقیت کا نتیجہ ہے کہ میر آج تک مقبول اور ہمارے شعراء کا محبوب ہے۔"

میر کی شاعری محض شیوۂ گفتار یا الفاظ کی بازیگری نہیں ہے۔ انہوں نے زمانے کے سرد و گرم سے آشنا ہو کر اپنے احساسات، مشاہدات اور کیفیات کو شعر میں منتقل کیا ہے۔



جس کی وجہ سے اُن کے اشعار میں سوز و گداز پیدا ہو گیا ہے۔ بہت سے شعراء نے ان کے نقشِ قدم پر چلنے کی کوششیں کیں لیکن کامیاب نہ ہو سکے۔

میر کو یہ دولتِ بیدار اور عالم گیر مقبولیت دیدہ و دل خون کرنے کے بعد ہی حاصل ہوئی ہے۔

••

# حکمت کے موتی

• رنج و راحت کا احساس ہمیں باہر سے لا کر کوئی نہیں دیتا۔ یہ خود ہمارا ہی احساس ہے جو کبھی زخم لگاتا ہے اور کبھی مرہم بن جاتا ہے۔

(مولانا ابو الکلام آزاد)

• جو شخص دنیا چاہتا ہے وہ علم حاصل کرتا ہے اور جس شخص کے اندر آخرت کی طلب ہوتی ہے وہ علم کے ساتھ عمل کی بھی کوشش کرتا ہے۔

(حکیم ابن سینا)

* عبد الاحد جبّار فاروقی
S.Y.B.A.

• اس طرح زندگی بسر کرو کہ ہر شخص کے لیے نمونۂ عمل بن جاؤ۔ (کانٹ)

• جو شخص عزّت کا خواہاں ہے اسے تین چیزوں پر عمل کرنا چاہیے (۱) کسی سے کوئی چیز نہ مانگے، (۲) کسی کا حق نہ کھائے (۳) کسی کی برائی نہ کرے۔

(ٹیگور)

* سیّد شفیق
S.Y.B.A.

# سب سے بڑی خوبی

کسی نے جعفر برمکی سے پوچھا:

"آدمی میں کتنے عیب ہوتے ہیں؟"

جعفر نے جواب دیا:

"عیب تو بے شمار ہیں مگر ایک خوبی ایسی ہے کہ اگر وہ کسی آدمی میں ہو تو اس کے تمام عیب چھپ جاتے ہیں۔"

سائل نے پوچھا:

"وہ خوبی کیا ہے؟"

جواب دیا:

"زبان پر قابو۔"

محمد فاروق F.Y.B.A.

# پسندیدہ اشعار

• مہرباں ہو کے بلا لو مجھے چاہو جس وقت
میں گیا وقت نہیں ہوں کہ پھر آ بھی نہ سکوں
(غالب)

• ہر نفس عمرِ گزشتہ کی ہے میّت فانی
زندگی نام ہے مر مر کے جیے جانے کا
(فانی)

شیخ مشرف
S.Y.B.A.

• یہی ہے عبادت یہی دین و ایماں
کہ کام آئے دنیا میں انساں کے انساں
(حالی)

مولجی جیٹھا آرٹس سائنس اینڈ کامرس کالج جلگاؤں

# AJANTA

# اجنتا

अजिंठा

M.J. COLLEGE JALGAON.

EDITOR:
PROF. AKBAR REHMANI

उर्दू विभाग

سالانہ مجلہ
1986-87

زیر ادارت:
پروفیسر اکبر رحمانی
ایم اے بی ایڈ
صدر شعبۂ اردو ایم جے کالج جلگاؤں

اردو سیکشن

منی افسانہ

## بے بسی

• سہیل اختر رحمانی F.Y.B.A.

ہاوڑہ ایکسپریس کے آنے کی وارننگ ہو چکی تھی، مگر ٹکٹ گھر پر لوگوں کی بھیڑ تھی کہ کم نہیں ہو رہی تھی۔ اُس نے اندازہ لگایا کہ پندرہ بیس آدمی آگے ہیں اور اس سے زائد پیچھے لائن میں کھڑے ہوئے ہیں۔ اس نے سوچا کہ گاڑی آنے تک اس کا نمبر آ پائے گا بھی یا نہیں؟

"بابوجی! جوتے کی پالش کر دوں؟" دس بارہ سال کے ایک معصوم لڑکے نے اس کے جوتے کی طرف نگاہ ڈالتے ہوئے پوچھا۔

"نہیں مجھے پالش نہیں کروانا ہے۔ بس نکل گئی تو بے موت مارا جاؤں گا۔" نوجوان نے جھڑکتے ہوئے کہا۔

"بابوجی! کل سویرے سے بھوکا ہوں...... گاڑی آنے سے پہلے ہی پالش ہو جائے گی.... بابوجی پالش کروا لیجیے نا..." لڑکے نے نہایت عاجزی اور معصومیت سے کہا۔

نوجوان نے دس پیسے کا سکہ نکال کر لڑکے کی طرف بڑھاتے ہوئے کہا:

"لے اور چل پھوٹ یہاں سے۔"

"بابوجی! میں بھکاری نہیں ہوں۔ میں محنت مزدوری کر کے اپنا پیٹ بھرنا چاہتا ہوں۔"

نوجوان کو لڑکے کی اس حرکت پر غصہ آ گیا۔ اس نے دس پیسے اپنی جیب میں واپس رکھتے ہوئے کہا:

"میں نے مزدوری کا ٹھیکہ نہیں لے رکھا ہے۔ اب تو یہاں سے فوراً چلا جا....."



# जिमखाना अहवाल १९८६-८७

## सिनिअर कॉलेज

या वर्षी जिमखाना निवडणुका घेण्यात आल्या. परंतु आनंदाची गोष्ट ही की या सर्व निवडणुका बिनविरोध झाल्या. खालील प्रमाणे जिमखाना कार्यकारिणी तयार झाली.

१) प्राचार्य डी. एस्. नेमाडे
२) उप-प्राचार्य डी. एच्. महाजन
३) उप-प्राचार्य एम्. के. येवले
४) उप-प्राचार्य डॉ. एस्. आर्. चिरमाडे
५) प्रा. नारायण खडके, क्रीडा प्रमुख
६) श्री. बी. एस्. पाटील, कार्यालय प्रमुख
७) श्री. सलीम तडवी, हॉकी सेक्रेटरी
८) श्री. कदीरखान, ॲथलेटिक्स सेक्रेटरी
९) श्री. गणेश महाजन, बास्केट बॉल सेक्रेटरी
१०) श्री.नरेंद्र खडके, विद्यापीठ प्रतिनिधी

या वर्षी आपल्या महाविद्यालयातील खेळाडूंनी अतुलनीय असा पराक्रम गाजवून महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल केले. पुणे विद्यापीठाच्या निरनिराळ्या संघात खेळाडूंची फार मोठया संख्येने निवड झाली.

आंतरमहाविद्यालयीन बॅडमिंटन सामन्यात आपल्या मुलींच्या संघाने जळगाव विभागात विजेते पद मिळविले. कु. अल्पना सैनी हिच्या उत्कृष्ठ खेळामुळे आपल्या महाविद्यालयाच्या संघाने विजेते-पद कायम राखले. जळगाव विभागाच्या संघात कु. अल्पना सैनी व कु. मुनिता पाटील यांची निवड झाली. कु. अल्पना सैनीने जळगाव विभागाच्या संघाचे नेतृत्व केले. आंतरमहाविद्यालयीन टेबल-टेनिस सामन्यात मुलींचा संघ विजयी ठरला. मुलांचा संघ उप- विजयी पदावर राहिला. कु. स्मिता वैद्य हिची जळगाव विभागाच्या संघात निवड झाली. व तिने जळगाव विभागाच्या संघाचे नेतृत्व केले. आंतरमहाविद्यालयीन सामन्यात आपल्या महाविद्यालयातील संघाने उपविजेते पद मिळविले. एकूण ५ खेळाडूंची जळगाव विभागाच्या संघात निवड झाली. १) मारियो विठ्ठल २) अजय शेट्टी ३) सलीम तडवी ४) इ. पी. सुरेश ५)

तसेच पुणे विद्यापीठाच्या संघात श्री. सुरेश इ. पी. याची निवड झाली. आंतरमहाविद्यालयीन हॉकी मुला-मुलींच्या स्पर्धा न झाल्याने त्यांची चाचणी घेण्यात आली, त्या चाचणीमध्ये जळगाव विभागाच्या संघात ( मुली ) कु. विनया साठे, कु. आरती राव, रोहिणी कोतवाल, उज्ज्वला कोतवाल, संगीता जोशी, मोहिनी जोशी, मंजुषा जोशी, विद्या बाजपेयी व मुलां-मध्ये सलीम तडवी, रमेश पाटील, प्रसन्न कुळकर्णी यांची निवड झाली. श्री. सलीम तडवी याची पुणे विद्यापीठाच्या संघात निवड झाली. कु. विनया साठे हिचीसुद्धा पुणे विद्यापीठाच्या संघात निवड झाली.

आंतरमहाविद्यालयीन मुलांच्या बास्केटबॉल संघाने सतत ६ वर्षे मुलांचे विजेतेपद कायम राखले.

सर्वश्री यशवंत देसले, विकास महाजन, रत्नाकर नेमाडे, गणेश महाजन, एस. पी. जोशी, एस. एम. अमृतकर, भावेश शहा या खेळाडूंची जळगाव विभागाच्या संघात निवड झाली. जळगाव विभागाच्या संघात श्री. यशवंत देसले, रत्नाकर नेमाडे, गणेश महाजन, विकास महाजन यांचा खेळ चांगला होऊन विद्यापीठाच्या कॅम्पमध्ये यांची निवड झाली. व कॅम्पमधून यशवंत देसले, विकास महाजन व रत्नाकर नेमाडे यांची विद्यापीठाच्या संघात निवड झाली, जळगाव विभागाचे नेतृत्व यशवंत देसले यांनी केले. पुणे विद्यापीठाच्या संघाचे नेतृत्व रत्नाकर नेमाडे यांनी केले. वजन उचलण्याच्या स्पर्धेत कदीरखान, शकिल शेख, दिलीप ढालपुरे, अजय यादव यांनी आपापल्या गटात आपली कामगिरी उत्तम केली व कदिरखान हा आपल्या गटात पुणे विद्यापीठामध्ये असलेल्या ६ विभागातून प्रथम आला. मुलांच्या हँडबॉल जळगाव विभागाच्या संघात गणेश महाजन याची निवड झाली व मुलींमध्ये कु. आरती राव, उज्ज्वला कोतवाल, निवेदिता नेरकर यांची निवड झाली. पुणे विद्यापीठाच्या संघात कु. आरती राव हिची निवड झाली.

आंतरमहाविद्यालयीन क्रिकेट स्पर्धा न झाल्याने चाचणी घेण्यात आली. त्या चाचणीमध्ये जळगाव विभागाच्या संघामध्ये श्री. गिरीश कुळकर्णी, दत्तात्रय तारे व संजय पोळ यांची निवड झाली.

आंतरमहाविद्यालयीन- खो खो मुलांच्या संघाने विजेते पद सतत ३ वर्षे कायम ठेवले. श्री. दिलीप कोल्हे, किरण जावळे, हेमंत राणे, सर्जेराव सोनवणे, अनिल कुळकर्णी, सतिश घोडके जळगाव विभागाच्या संघात निवड झाली व दिलीप कोल्हे यांनी जळगाव विभागाचे नेतृत्व केले.

नव्यानेच सुरु झालेल्या बॉल बॅडमिंटन संघात पुणे विद्यापीठाचे नेतृत्व मुलांमध्ये प्रशान्त देशपांडे याने केले. व मुलींमध्ये विद्यापीठाच्या कॅंपसाठी कु. अल्पना सैनी हीची निवड झाली.

तसेच कुस्तीमध्ये आपल्या महाविद्यालयातील आदिल शेख व नंदकुमार बारी यांची जळ[illegible] विभागाच्या संघात निवड झाली. व पुणे वि[illegible] पीठाच्या कुस्ती संघात आदिल शेख यांची नि[illegible] झाली.

आंतरमहाविद्यालयीन कबड्डी सामन्यात उ[illegible] विजेते पद मिळविले. सर्वश्री सतीश कोगटा, सं[illegible] झोपे, श्रीराम चौधरी यांची जळगाव विभागा[illegible] संघात निवड झाली. व सतिश कोगटा यांनी जळ[illegible] विभागाचे नेतृत्व पद भूषवून त्यांची पुणे वि[illegible] पीठाच्या संघाचे कर्णधार म्हणून निवड झाली.

या वर्षी आंतरमहाविद्यालयीन पातळीवर चा[illegible] विजेती पदे मिळविली व आठ उप विजेते पदे मिळवि[illegible] जळगाव विभागाच्या निरनिराळ्या संघातून १[illegible] मुली व ३४ मुले यांची निवड झाली. विद्यापीठा[illegible] संघातून १२ खेळाडूंची संघात निवड झाली[illegible] पारितोषिक वितरण समारंभ डॉ. जावळे यां[illegible] शुभ हस्ते व आमच्या महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. डी. एस. नेमाडे यांच्या उपस्थितीत पार पडला.

जिमखान्याचा अवाढव्य पसारा सावरण्या[illegible] करिता प्राचार्य डी. एस. नेमाडे, उप-प्राचार्य डी. एच्. महाजन, एस्. आर्. चिरमाडे व येवले आणि सर्व जिमखाना सेक्रेटरी व विद्यार्थी आणि सहकारी प्राध्यापक यांनी केलेल्या सहकार्याबद्दल धन्यवाद.

**प्रा. नारायण खडके**
क्रीडा प्रमुख



# ज्युनिअर कॉलेज जिमखाना अहवाल सन १९८६-८७

यावर्षी तालुका पातळीवरील पावसाळी स्पर्धांमध्ये हँण्डबॉल, बास्केटबॉल, कबड्डी हे मुलांचे संघ व खो-खो मुलींचा संघ यांनी विजय संपादन केला. हँण्डबॉल मध्ये श्रीकृष्ण जावळे, संजय महाजन, प्रविण उपाध्ये, राजेश चौधरी, कैलास भोळे यांचा खेळ प्रेक्षणीय ठरला. खो-खो मुलींच्या संघात कु. वीणा देशपांडे, सुवर्णा बंब, उर्मिला जगताप, सीमा तडवी यांचा खेळ प्रेक्षणीय झाला. बास्केटबॉल-मध्ये सुहास झांबरे, अतुल गाजरे, कृष्णा जावळे, संजय महाजन यांचा खेळ दैदिप्यमान झाला. कबड्डी मध्ये किशोर पाटील या गत वर्षाच्या सुवर्णपदक विजेत्या खेळाडूने साऱ्या प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करून टाकले. शिवाय किरण अत्तरदे, घनःश्याम काळे, सुहास कोल्हे, कैलास भोळे यांचा खेळ प्रेक्षणीय झाला. फूटबॉल संघास मात्र दुर्देवाने उपविजेतेपदावरच समाधान मानावे लागले. त्यात राजेश चौधरी, एजाज मंसुरी, उपेंद्र दळवी, संदीप चाकणे, मनोष ललवाणी यांचा खेळ उत्कृष्ट ठरला.

जिल्हा पातळीवरील पावसाळी स्पर्धांमध्ये कबड्डी संघास दुर्देवाने उपविजेतेपद मिळाले. त्यात किशोर पाटील, घनःश्याम काळे, संजय काळे, सुहास कोल्हे, यांचा खेळ दैदिप्यमान झाला. खो-खो मुलींच्या संघासही उपविजेतेपद मिळाले. त्यात कु. वीणा देशपांडे, उर्मिला जगताप, सुवर्णा बंब, लीना मुळे, टोके यांचा खेळ दैदिप्यमान झाला. बास्केट बॉल मुलांच्या संघाने मात्र अतुलनीय खेळ दाखवून विजयाची पताका फडकावली. त्यात अतुल गाजरे, सुहास झांबरे, कृष्णा जावळे, पुरुषोत्तम चौधरी यांचा खेळ प्रेक्षणीय झाला.

पोहण्याच्या जिल्हा स्पर्धांमध्ये खालील स्पर्धक विजयी झालेत. कु. उर्मिला जगताप- २०० मी. फ्री स्टाईल, वीणा देशपांडे – १०० मी. बॅकस्टोक सीमा तडवी- १०० मी. बटरफ्लाय तर ४×१०० फ्री-स्टाईल रिले मध्ये उर्मिला जगताप, सीमा तडवी, वीणा देशपांडे, वैशाली महाजन यांनी विजय मिळविला. राजेश चौधरी- १०० मी. व २०० मी. ब्रेस्टस्ट्रोक, संदीप चाकणे ४०० मी. फ्रीस्टाईल, ४×१०० मी. फ्रीस्टाईल व ४×१०० मि. मिड-रिलेमध्ये पुढील स्पर्धक विजयी झालेत. कृष्णा जावळे, अतुल मुळे, संदीप चाकणे, प्रमोद चौधरी, सुराणा.

कबड्डी संघातील किशोर पाटील व खो-खो संघातील अभिजित याज्ञिक यांची राज्य चाचणी-साठी निवड करण्यात आली.

हिवाळी तालुका स्पर्धांमध्ये बॅडमिंटन मुलींचा संघ विजयी झाला त्यात अनुपमा नेहेते व दीपाली कुळकर्णी यांचा खेळ प्रेक्षणीय झाला. हॉकी मुलांचा संघ उपविजयी झाला. त्यात उपेन्द्र दळवी, संजय व्यास, उदय चौधरी, एजाज मन्सुरी, संदीप चाकणे व अंतिम-तोतला- यांचा खेळ उत्कृष्ट ठरला. अॅथेलेटिक्स मध्ये तालुका पातळीवर खालील सर्व स्पर्धक विजयी झालेत. संजय पाटील १०० मी. धावणे, सुहास कोल्हे- हातोडा फेक व गोळा फेक, प्रशांत पाटील थाळी फेक उपेन्द्र दळवी-उंच उडी लहान गटात कैलास भोळे – हातोडा फेक, रवि जाधव थाळी फेक, अश्विनी अभ्यंकर ४०० मी. धावणे व १०० मी. हर्डल्स. कुस्तीमध्ये चंद्रकांत यादव, सुहास कोल्हे, शालिग्राम पाटील हे विजयी झालेत.

हिवाळी जिल्हा स्पर्धांमध्ये रवि जाधव, थाळी फेक प्रथम आला तर कैलास भोळे हातोडा फेकमध्ये द्वितीय आला. विभागीय स्पर्धांमध्ये रवि जाधव हा थाळी फेक मध्ये द्वितीय आला.

जिमखान्याच्या संपूर्ण वर्षाच्या कार्यवाहीत सहकार्यात सिंहाचा वाटा असणारे प्राचार्य डी. एस. नेमाडे, उपप्राचार्य डी. एच. महाजन, उपप्राचार्य एम. के. येवले, प्रा. पी. जी. अभ्यंकर यांनी वेळो-वेळी केलेल्या मार्गदर्शनाबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे. तसेच माझे सहकारी प्रा. पी. डी. तळेले, प्रा. खिराडे, प्रा. जे. टी. अत्तरदे, प्रा. एस. ए. चौधरी यांनी संघव्यवस्थापकाची भूमिका योग्यरित्या सांभाळून केलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचाही आभारी आहे.

तसेच सर्व वर्षाच्या कार्यवाहीत खो खो, कबड्डी, व बास्केटबॉल असोशिएशन, नगरपालिका, एस. टी. डेपो, टेलिफोन एक्सचेंज या संस्थांनी तसेच प्रा. ए. यू. चव्हाण व इतर प्राध्यापक क्रीडा प्रेमींनी केलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचाही आभारी आहे.

**प्रा. बी. एम. महाजन**
क्रीडा प्रमुख
कनिष्ठ महाविद्यालय

❋ ❋ ❋

# युवती सभा

विद्यार्थिनींच्या सुप्त कलागुणांना प्रोत्साहन देण्याचे कार्य ही सभा करीत असते. त्यादृष्टिने या वर्षी विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले. या सर्व कार्यक्रमांना विद्यार्थिनींचा उत्फूर्त प्रतिसाद मिळाला.

**उद्घाटन समारोह –**

यावर्षी दि. २–९–८६ रोजी युवती सभेचे उद्घाटन झाले. त्यावेळी निमंत्रित व्याख्यात्या डॉ. सौ. अरूणा वानखेडे ह्यांनी इंग्लंड, फ्रान्स, जपान इ. देशातील जीवन पद्धतींचे, तेथील वास्तव्यांत त्यांना आलेल्या विविध अनुभवांचे सुंदर निवेदन केले. याच वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डी. एस. नेमाडे ह्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात विद्यार्थिनींच्या समुन्नत व्यक्तिमत्वाच्या दृष्टीने उद्बोधक मार्गदर्शन केले.

**समर-गीत स्पर्धा –**

राष्ट्रीय एकात्मतेच्या भावनेला प्रतिसाद आणि संगीत कलेला प्रोत्साहन देण्याच्या हेतूने दिनांक १६–९–८६ रोजी ‘ समर-गीत ’ स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत एकूण ३० विद्यार्थिनींनी भाग घेतला होता. त्यात खालील स्पर्धकांनी बक्षीसे मिळविली.

१ नं. – कु. अनीता उजागरे (एस. वाय. बी. ए.)
२ नं. – कु. रोहिणी जोशी (एस. वाय. बी. ए.)
३ नं. – ( समूहगीत)
यास्मिनी नेमाडे ( टी. वाय. बी. एस्सी)
रोहिणी जोशी ( टी. वाय. बी. एस्सी. )
नयना पटवे ( एस. वाय. बी. एस्सी )
योगिनी पटेल ( एस. वाय. बी. एस्सी )
जयश्री पाठक ( एस. वाय. बी. एस्सी )

या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून सौ. वन्दना गोखले, सौ. शुभांगी भावसार, प्रा. सौ. जोशी ह्यांनी काम केले.

**कथाकथन स्पर्धा –**

दि. २२–१०–८६ रोजी कथाकथन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत एकूण १८ विद्यार्थिनींनी भाग घेतला होता. उत्कृष्ट कथानक आणि प्रभावी नाट्यपूर्ण कथन शैलीमुळे हा कार्यक्रम श्रोत्यांना फार आवडला. या स्पर्धेत खालील स्पर्धकांनी बक्षिसे मिळवली.

१ नं. – कु. प्रतिभा जगताप (एस. वाय. बी. ए.)
२ नं. – कु. तेजस्विनी सोमण (एफ. वाय. बी. कॉम)

या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रा. सौ. भिरूड व प्रा. पेठे ह्यांनी काम पाहिले.

**एकांकिका –**

दि. १९–२–८७ रोजी विद्यार्थिनींनी ‘ व्यर्थ न हो बलिदान ’ ही वसंत जाधव लिखित हृदयस्पर्शी एकांकिका सादर केली. ह्या एकांकिकेत पुढील विद्यार्थिनींनी भाग घेतला होता.

निवेदिका कु. मंदा महाजन (एम. कॉम. प्रथम वर्ष)
सावित्रीबाई – कु. योजना वाहेकर
( एस. वाय. बी. ए.)
जानकी अक्का – कु. रोहिणी जोशी
( एस. वाय. बी. ए. )
कुन्दा – कु. स्वाती पाठक ( एस. वाय. बी. ए. )
उषा – कु. तेजस्विनी सोमण (एस. वाय. बी. ए.)
शोभा – कु. उज्ज्वला बल्लाळ (एस. वाय. बी. ए.)

सर्व विद्यार्थिनींनी आपल्या भूमिका अत्यंत प्रभावीपणे सादर केल्या.

**पारितोषिक वितरण समारोह –**

दि. १९–२–८६ रोजी युवती सभेच्या समारोप प्रसंगी डॉ. सौ. अरूणा पाटील ह्या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. त्यांच्या शुभहस्ते विविध स्पर्धा आणि एकांकिकेत भाग घेतलेल्या यशस्वी स्पर्धकांना पारितोषिके देण्यात आली. या प्रसंगी त्यांनी विद्यार्थिनींना अत्यंत सोप्या भाषेत उद्बोधक भाषण दिले. या वेळी अध्यक्षस्थान प्राचार्य डी. एस. नेमाडे ह्यांनी भूषविले होते. त्यांनीही विद्यार्थिनींच्या सभाधीटपणाची आणि अभिनयाच्या कलात्मक अविष्काराची प्रशंसा केली. सर्व पारितोषिक विजेत्यांचे हार्दिक अभिनंदन.

**कार्यकारिणी सदस्या –**

प्रा. सौ. उषा मानधने — प्रा. सौ. प्रतिभा जोशी
प्रा. सौ. पिंपरकर — प्रा. सौ. सुजाता देशपांडे
प्रा. सौ. उषा सावंत

या सभेचे सर्व कार्यक्रम यशस्वीपणे पारपाडण्यास महाविद्यालयाचे प्राचार्य डी. एस. नेमाडे, उपप्राचार्य महाजन, उपप्राचार्य येवले, प्रा. सौ. जावळे, प्रा. सौ. अत्तरदे, प्रा. सौ. भिरूड, प्रा. पेठे प्रा. कु. तळेले, प्रा. अत्तरदे, प्रा. राणे, प्रा. शिरसीकर, प्रा. आर. पी. चौधरी इ. प्राध्यापकांचे तसेच कर्मचारी वर्गाचे उत्तम सहकार्य लाभले. युवती सभा याबद्दल सर्वांची आभारी आहे.

**डॉ. सौ. वासंती साळवेकर**
अध्यक्षा

❋ ❋

# कला मंडळ

१९–६–८७ साठी पुढील प्रमाणे समिती निवडली गेली.

| | |
|---|---|
| प्रा. चारुदत्त गोखले | अध्यक्ष |
| प्रा. डॉ. तेजपाल चौधरी | सभासद |
| प्रा. एस्. एम्. जावळे | ” |
| प्रा. डॉ. सौ. वासंती साळवेकर | ” |
| प्रा. डॉ. एस्. एम्. चौबे | ” |
| प्रा. एस्. एस्. राजे | ” |
| प्रा. डी. डी. चौधरी | ” |
| प्रा. जे. टी. अत्तरदे | ” |
| प्रा. सौ. रजनी अत्तरदे | ” |

या वर्षीची सर्वात उल्लेखनीय बाब म्हणजे महाविद्यालयाने मिळविलेला दुर्मिळ असा '**पुरुषोत्तम करंडक**'. या प्रतिष्ठेच्या स्पर्धेसाठी आपल्या महाविद्यालयाने श्री. रविंद्र जोशी लिखित 'बाळू जोशीला नक्की काय वाटत' ही एकांकिका पाठविली. कलाकारांची चिकाटी, मेहनत व जिद्द यामुळेच आम्हाला करंडक मिळू शकला. दिग्दर्शन श्री. धनंजय राजहंस यांनी केले होते. तर संगीत श्री. कौस्तुभ दातार व श्री. नीतीन कोंकरे यांचे होते. गायनाची बाजू शिवाजी चव्हाण यांनी सांभाळली. शिवाय एकांकिकेत संदीप भिसे, संदीप मेहता, प्रमोद बाविस्कर, शशिकांत गुप्ते, संजय, कथुरिया, शैलेश मुळे, अनिल देशपांडे, उमेश कोतवाल, मनोज जोशी, कस्तुरी दातार, विनया साठे, मोहिनी जोशी, आरती वझे, स्मिता उपासनी यांच्याही भूमिका होत्या. (संपादकीयामध्ये याचा उल्लेख असल्यामुळे जास्त लिहीत नाही.) 'बाळू जोशी' साठी आम्हाला ज्यांचे सहकार्य लाभले त्यात श्री. हेमंत कानळदेकर, अमृत सोनवणे, प्रशांत देशपांडे, अंबीकर, माधव अभ्यंकर यांचा सिंहाचा वाटा आहे.

अनेक मान्यवर व्यक्ती व संस्थांनी करंडक मिळाल्यावर आमच्या महाविद्यालयावर व प्राचार्यांवर अभिनंदनाचा वर्षाव केला. कारण धुळे, जळगाव, नाशिक जिल्ह्यात हा मानाचा करंडक पहिल्यांदाच आला होता.

राष्ट्रभाषा प्रचार समिती, मुंबई तर्फे दरवर्षीप्रमाणे हिंदी एकांकिका स्पर्धा पार पडली. त्यासाठी डॉ. तेजपाल चौधरी लिखित व श्री. रमेश भोळे दिग्दर्शित 'आदमखोर' ही एकांकिका पाठविण्यात आली होती. पण यावर्षी मात्र एकांकिकेला पाचव्या क्रमांकावर समाधान मानावे लागले. एकांकिकेत श्री. शैलेश मुळे, अमृत सोनवणे, प्रशांत देशपांडे, विपुल पारेख, राजेंद्र मेहता, संदीप मेहता, शफी पटेल, मनोज जोशी, अनिल देशपांडे, उमेश कोतवाल, शिवाजी चव्हाण, शशिकांत गुप्ते, संदीप भिसे, संजय कथुरिया, कु. दीपा मोडक, कु. चंदा चव्हाण, कु. छाया भाटिया यांनी कामे केली होती. युवक बिरादरी, धुळे आयोजित स्वर्गीय स्मिता पाटील स्मृति चषक राज्य स्तरीय एकांकिका स्पर्धेलाही ही एकांकिका पाठविण्यात आली होती. एकांकिकेला सांघिक तृतीय क्रमांक कप व रु. १०१ रोख मिळाले तर शैलेज मुळे यांना अभिनयाचे पारितोषिक मिळाले.

त्यानंतर या वर्षीचे आमचे गाजलेले प्रॉडक्शन म्हणजे प्रदीप राणे लिखित 'चिऊताई, चिऊताई, दार उघड.' धुळ्याच्या मुक्त व्यासपीठ संवाद तर्फे झालेल्या राज्य स्तरीय स्पर्धेत या एकांकिकेला सांघिक प्रथम-सातशे रुपये, सर्वोत्कृष्ट प्रायोगिक एकांकिका, दिग्दर्शन प्रथम- श्री. संदीप भिसे, स्त्री अभिनय कु. कस्तुरी दातार, पुरुष अभिनय श्री. संदीप मेहता अशी एकदम एकूण पाच बक्षिसे मिळाली. परीक्षा यंदा लवकर झाल्यामुळे या एकांकिकेचे आणखी प्रयोग मात्र होऊ शकले नाहीत याचे वाईट वाटते. एकांकिकेत श्री. सजय कथुरिया, संदीप भिसे, संदीप मेहता, शशिकांत गुप्ते, शफी पटेल, उमेश कोतवाल, प्रशांत देशपांडे, कौस्तुभ दातार, अनिल देशपांडे, शैलेश मुळे, मनोज जोशी, राजू मेहता, अमृत सोनवणे, अनिरूध्द बर्वे, धनंजय पाटील, शिवाजी चव्हाण, प्रसन्न देशपांडे, त्रिपुल पारेख, कु. आरती वझे, कु. कस्तुरी दातार व मोहिनी जोशी यांच्या भूमिका होत्या. श्री. सतीश उर्फ लाल्या देशमुख व श्री. सदानंद मुझुमदार यांच्या प्रयत्नांमुळेच एकांकि[illegible] केला हे घवघवीत यश मिळू शकले.

मनमाड व कोपरगाव येथील एकांकिका स्पर्धेत श्री. व. पु. काळे लिखित व नरेंद्र तोरवणे दिग्दर्शित 'निरंजन मला उत्तर हवय' ही एक आगळी वेगळ्या विषयावरची फक्त तीनच पात्रे असलेली एकांकिका पाठवण्यात आली होती. दोन्ही ठिकाणी प्रयोग समाधानकारक झाले पण बक्षिसांच्या यादीत मात्र नाव येऊ शकले नाही. एकांकिकेत कु. मंदाकिनी महाजन, उत्तम राठोड, मच्छींद्र पठारे यांच्या भूमिका होत्या. प्रमोद चौधरी यांचे नेपथ्य तर ध्वनि व प्रकाश व्यवस्था संदीप भिसे यांची होती.

बागलाण जिमखान्यातर्फे सटाण्याला राज्स्तरीय कथाकथन स्पर्धा झाल्या. त्यासाठी श्री. नरेंद्र तोरवणे, व श्री. मोतीलाल खैरनार यांना पाठविण्यात आले होते.

जायन्टस् ग्रुप ऑफ जामनेर तर्फे झालेल्या राज्य स्तरीय कथाकथन स्पर्धेत श्री. नरेंद्र तोरवणे याने द्वितीय क्रमांक मिळवून कप महाविद्यालयाकडे कायम ठेवला. हाच कप मागील वर्षी कु. मुक्ता महाजन हिने जिंकला होता.

यंदा विद्यापीठाचे नाट्य प्रशिक्षण शिबिर शिरपूर महाविद्यालयात पार पडले. त्यासाठी श्री. संदीप मेहता, कु. कस्तुरी दातार व कु. मोहिनी जोशी या तीनही प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांनाच पाठविण्यात आले होते. त्यांना तेथे मिळालेल्या शिक्षणाचा उपयोग पुढील दोन वर्ष महाविद्यालयास नक्कीच होईल.

यंदाच्या वर्षी असलेल्या तीव्र दुष्काळी परिस्थितीमुळे जैन करंडक व संघवी ढाल आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धा घेण्यात आल्या नाहीत तसेच याच कारणास्तव या वर्षीचा युवक महोत्सवही पुणे विद्यापीठाने रद्द केला होता.

कला मंडळाचे कोणतेही काम प्राचार्य डी. एस. नेमाडे यांच्या मार्गदर्शनाशिवाय अशक्य होते. त्यांनी प्रत्येक वेळी योग्य मार्गदर्शन तर केलेच शिवाय कलाकारांना आपल्या कार्यालयात बोलावून त्यांचे कौतुक करून त्यांच्या अडचणीही दूर करण्याचा प्रयत्न केला.

या शिवाय उपप्राचार्य डी. एच. महाजन व एम. के. येबले उपप्राचार्य यांचेही वेळोवेळी मार्गदर्शन लाभले त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. कार्यकारिणीच्या सर्व सभासदांनी मला पूर्ण सहकार्य दिले त्याबद्दल मी त्यांचाही ऋणी आहे. याशिवाय प्रा. एम. एस. भावे, प्रा. पी. जी. अभ्यंकर, प्रा. पी. टी. चौधरी, प्रा. शरद छापेकर, प्रा. राजा महाजन, प्रा. नारायण खडके यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल मंडळ त्यांचे आभारी आहे.

शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचेही चांगले सहकार्य मिळाले. त्यात श्री. बी. एस. पाटील, मधू नारखेडे, अशोक पाटील, डी. पी. चौधरी, देशमुख, दगडू परदेशी, पंढरी पाटील, देवरे, भालेराव, जितलाल यांचा मुद्दाम उल्लेख करणे आवश्यक आहे. इतर प्राध्यापक वर्ग व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल मी सगळ्यांचा आभारी आहे.

**प्रा. चारुदत्त श्रीधर गोखले**

अध्यक्ष

| | |
|---|---|
| प्रा. एस्. एम्. जावळे | डॉ. सौ. वासंती साळवेकर |
| प्रा. एस्. एस्. राजे | प्रॉ. सौ. रजनी अत्तरदे |
| प्रा. डी. डी. चौधरी | प्रा. डॉ. एस्. एम्. चौबे |

❁ ❁ ❁

# राष्ट्रीय सेवा योजना

सन १९८६-८७ या शैक्षणिक वर्षात राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्याचा प्रारंभ महाविद्यालयीन साफसफाई व स्वच्छता या कार्यक्रमाने झाला. राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्याचे उद्घाटन माननीय प्राचार्य डी. एस. नेमाडे यांचे शुभहस्ते झाले. त्यांनी विद्यार्थ्यांचे उत्तम प्रबोधन केले व राष्ट्रिय सेवा

योजनेच्या कार्याची विद्यार्थ्यांना ओळख करून दिली. यावर्षीचे ठळक कार्यक्रम खालीलप्रमाणे-

### १) विशेष उन्हाळी शिबीर-

हे शिबीर जून महिन्यात आयोजित करण्यात आले. या शिबीरात मुख्य कार्यक्रम श्रमदानाचा व वृक्षारोपणाचा होता. गावातील एक ऐतिहासिक पडकी गढी गावाच्या मध्यभागी असल्यामुळे तिचा दुरुपयोग नागरिकांकडून होत असे. उकिरडे करणें, संडासपाणी वापर करणे इ. सार्वजनिक आरोग्य बिघडविणाऱ्या गोष्टी नागरिकांकडून चालल्या होत्या. शिबीराच्या काळात नागरिकांच्या सहाय्याने ती गढी संपूर्ण साफ करण्यात आली. त्यातील मोठ-मोठे खड्डे बुजविण्यात आले व तिचे समाज मंदिरा-साठी जागेचे भूमीपूजनही केले. तसेच आजूबाजूला खड्डे खोदून त्यात पुढे ग्रामपंचायतीने वृक्षारोपण व वृक्ष संगोपन करावे असे ठरले. त्यासाठी आम्हास सामाजिक वनीकरण विभागाचे सहकार्य लाभले.

### २) मन्यारखेडे येथील रस्ते दुरुस्ती -

मन्यारखेडे हे राष्ट्रीय सेवा योजनेने दत्तक घेत-लेले गाव. तेथील जीवनावश्यक सुविधा वाढविण्याच्या दृष्टीने आम्ही प्रयत्नशील आहोत. संबंधीत अधि-काऱ्यांना भेटून त्यांच्या अडचणी सोडविण्याचा प्रयत्न सतत चालू असतो. तेथील अत्यंत भेडसवणारा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आम्ही त्या भागातील विद्यमान आमदार श्री. डी. के. चौधरी यांना भेटून अवघ्या आठच दिवसात सोडविला. सरकार तर्फे या गावात ट्यूब-विहीर खोदण्यात आली व त्याठिकाणी वीजेची मोटर बसवून गावात सर्व ठिकाणी पिण्याचे पाणी देण्यात आले. गावातील निरनिराळ्या जातींच्या, धर्मांच्या व वर्गांच्या लोकां-मध्ये परस्पर स्नेह वृद्धिंगत करणे, त्यांनी परस्परांशी प्रेमभावनेने वागावे, संकटकाळी एकत्र यावे म्हणून वेळोवेळी सांस्कृतिक कार्यक्रम आखले. समाजसेव-कांच्या भेटी आयोजित केल्या. लघुउद्योग सुरु करता येण्याच्या दृष्टीने बँकेकडून आर्थिक मदत मिळवून देण्यात मध्यस्थी करणे. इ. कामे या गावात सतत चालू असतात.

### ३) वृक्षारोपण-

महाविद्यालयातील आवारात काही नवीन वृक्ष लावण्यात आले व मागच्या वर्षीचे लावलेले वृक्षांचे चांगले संगोपन होत आहे किंवा नाही याकडे वर्षभर लक्ष दिले गेले. रोटरी क्लबच्या मदतीने मन्यारखेडे येथील बेघर वस्तीमध्ये प्रत्येक गरीब कुटुंबाला एक लिंबाचे रोप लावून देण्यात आले व त्या कुटुंबाने त्याची काळजी घेवून पुढे त्यापासून मिळणारे उत्पन्नही त्यांनीच घ्यावे असे ठरले.

### ४) विशेष हिवाळी शिबीर-

यावर्षीचे विशेष हिवाळी शिबीर तुरखेडे येथे घेण्यात आले. गावातील गटारी व रस्ते तयार करण्यात आलेत. आर्थिक व सामाजिक सर्वेक्षण केले. प्रौढसाक्षरतेचा कार्यक्रम घेणे तसेच गावाबाहेरील रिकाम्या जागी वृक्षारोपणाचे खड्डे खोदून देण्याचे कार्य व कार्यक्रम ही करण्यात आले. प्रमुख कार्यक्रम म्हणजे गावातील विविध कार्यकारी सोसायटी व दूध सोसायटी यांच्यासाठी नियोजिलेल्या इमारतीचा संपूर्ण पाया शिबीरार्थी मित्रांनी अवघ्या आठच दिवसात पूर्ण करून दिला. तसे आजूबाजूच्या खेड्यां-मधून आर्थिक व सामाजिक सर्वेक्षण करण्यात आले. त्या नंतर विद्यार्थ्यांमध्ये चर्चा घडवून आणली.

### ५) कार्यात्मक साक्षरता-

या वर्षी भारत सरकारच्या सूचनेनुसार राष्ट्रीय सेवा योजनेतील शे. ४० विद्यार्थ्यांनी या योजनेत भाग घ्यावयाचा आहे. आमचे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे ८० विद्यार्थी या योजनेत सामील झालेत. या विद्यार्थ्यांना प्रौढांना शिकविण्या-साठी साधनसामुग्रीची प्रत्येकी एक एक कीट संच देण्यात आली. प्रत्येक विद्यार्थ्याने कमीत कमी दोन प्रौढांना साक्षर करावे असे ठरविण्यात आले. या योजनेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रबोधन घेण्यात आले. प्रौढांना कसे शिकवावे, काय शिकवावे व विद्यार्थ्यांना त्यात सहभाग कशासाठी इ. बाबी समजावून देण्यासाठी प्रशिक्षण आयोजित करण्यात आले.

### ६) व्यवसाय शिक्षण -

विद्यार्थ्यांना भावी जीवनात उत्तम प्रकारे व्यवसाय करता यावा व आपले जीवन चांगले घडविता यावे यासाठी समाज कल्याण विभाग, रोजगार-विनिमय केंद्रातर्फे एक दिवशीय शिबीर मु. जे. महाविद्यालयात आयोजित करण्यात आले.

**कार्यक्रम अधिकारी-**

प्रा. एम्. डी. बोंडे — प्रा. व्ही. जे. चौधरी
प्रा. एस्. एस्. राणे — डॉ. ए. एस्. भोळे

❁ ❁

# सायन्स असोसिएशन

ह्या वर्षापासून जीवशास्त्र मंडळ, रसायनशास्त्र मंडळ, भौतीक - मंडळ वगैरे मंडळाचे एकच मंडळ ' विज्ञान मंडळ ' स्थापन करण्यात आले. त्या मंडळाचे चेअरमन म्हणून प्रा. ए. जी. कर्णिक ह्यांचीनिवड झाली. मंडळाच्या यशस्वितेसाठी एक ' सल्लागार समिती ' नेमण्यात आली. त्या समि-तीत प्रत्येक शास्त्र शाखेसाठी एक एक प्राध्यापक घेण्यात आला होता.

विज्ञान मंडळाच्या घटनेनुसार ता. १४-८-८६ रोजी निवडणुका होणार होत्या. पण खालील सर्व प्रतिनिधी बिनविरोध निवडून आले. म्हणून निव-डणूका झाल्या नाहीत.

१) श्री. व्ही. एस्. बोरोले Sr. M. Sc. (Zool.) G. S.
२) मिस् जे. एस्. कुळकर्णी, Sr. M. Sc. (Maths) L. R.
३) श्री. एस्. डी. कुळकर्णी, Sr. M. Sc. (Maths) Cr. M. Sc. Sr.
४) श्री. आर्. ए. पवार, Jr. M. Sc. (Maths) Cr. M. Sc. (Jr.)
५) श्री. डी. व्ही. चौधरी, S. Y. B. Sc. Cr. B. Sc. S. Y.
६) श्री. डी. के. कोल्हे, F. Y. B. Sc. Cr. B. Sc. F. Y.

विज्ञान मंडळाने ह्या वर्षात खालीलप्रमाणे कार्यक्रम केले.

१) विज्ञान मंडळाचे उद्घाटन दि. २९-८-८६ शुक्रवार रोजी दुपारी ४ बाजता जळगावातील प्रसिध्द स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. अविनाश आचार्य ह्यांच्या हस्ते झाले. त्यांनी ' टेस्ट ट्यूब बेबी ' ह्या विषयावर भाषण केले.

२) उद्घाटन झाल्यावर जळगाव आकाशवाणीचे निवेदक श्री. दत्ता सरदेशमुख ह्यांनी काही निवडक विज्ञान कथा वाचून दाखविल्या.

३) विज्ञान मंडळाच्या उद्घाटनाचा वृतांत शनिवार दिनांक ६–९–१९८६ रोजी रात्री ९–१६ ला आकाशवाणी जळगाव ह्यांनी ‘ आकाश वार्तेत ’ दिला.

४) दिनांक ३०–८–१९८६ रोजी दुपारी ३–३० वाजता सायंटिफिक फिल्मस् दाखविण्यात आल्या. अ) पक्ष्यांचे स्थलांतर ब) अस्वलं क) प्रदूषण

५) प्राणिशास्त्राचे प्राध्यापक श्री. सुरेश जावळे ह्यांनी १–९–१९८६ रोजी दुपारी ४ वाजता “ Parental care in water bag ” ह्या बिषयावर माहितीपूर्ण व्याख्यान दिले.

६) सोमवार दिनांक १५–९–१९८६ रोजी दुपारी ४ बाजता अत्यंत विद्यार्थी–प्रिय असलेला कार्यक्रम ‘ एक प्रश्न पांच उत्तरे ’ करण्यात आला. त्यात प्रा. जे. व्ही महाजन, प्रा. म. मो. केळकर, डॉ. विवेक खटावकर, सौ. शारदा मुदलियार व श्री. हेमंत गोखले ह्यांनी प्रा. ए. जी. कर्णिक ह्यांनी विचारलेल्या प्रश्नांना आपापल्या मिश्किल शैलीत उत्तरे दिली.

७) रविवार दि. २१–९–१९८६ रोजी ‘ पाल ’ येथे एक दिवसाची सहल आयोजित करण्यात आली होती.

८) गुरुवार दि. २९–१–१९८७ व शुक्रवार दि. ३०–१–१९८७ रोजी दुपारी ३–३० वाजता ‘ Science Quiz Contests ’ घेण्यात आल्या. त्यात आठ गटांनी भाग घेतला होता. विज्ञान मंडळातर्फे पहिल्या आलेल्या गटाला रु. ५१ दुसऱ्यास रु. ३१ त्याचप्रमाणे सर्व स्पर्धकांना प्रत्येकी एक बॉलपेन व प्रेक्षकातून उत्तरे देणाऱ्यांस प्रत्येकी एक एक चॉकोलेट देण्यात आले. ही स्पर्धा अत्यंत चुरशीची होऊन प्रेक्षक मोठ्या संख्येने हजर होते.



९) शुक्रवार दि. १३–२–१९८७ रोजी दुपारी ४ वाजता व्हिडीओवर दोन चित्रपट दाखविण्यात आले. १) *Beautiful People* २) खुबसुरत.

वरील सर्व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कॉलेजचे प्राचार्य, उपप्राचार्य, सल्लागार समिती, आणि आमच्या सहकार्यांनी जे सहकार्य केले ह्याबाबत आम्ही त्यांचे अत्यंत आभारी आहोत.

**व्ही. एम्. बोरोले** — जनरल सेक्रेटरी
**ए. जी. कर्णिक** — चेअरमन

# एन्. सी. सी.

दरवर्षीप्रमाणे या वर्षीही ३७२ विद्यार्थी-विद्यार्थिनींनी एन. सी. सी. चे ट्रेनिंग पूर्ण केले.

वृक्षारोपण, रक्तदान व इतर सामाजिक उपक्रमात नेहमी प्रमाणेच या वर्षी सुद्धा एन. सी. सीच्या विद्यार्थी–विद्यार्थिनींनी मोठ्या प्रमाणावर सक्रीय भाग घेतला.

नेहमीप्रमाणे या वर्षी विद्यार्थ्यांचे वार्षिक प्रशिक्षण शिबिर नलगंगा येथे तर विद्यार्थिनींचे वार्षिक प्रशिक्षण अमरावती येथे मोठ्या उत्साहाने व चांगल्या प्रकारे संपन्न झाले.

या वर्षी पुढील प्रमाणे वेगवेगळ्या कॅम्पमध्ये सहभागी होउन विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य दाखविले. आर्मी अॅटचमेंट कामठी यादव ए. आर. नांदोडे, एस. एस. भावसार, व्ही. ओ. पाटील, डी. आर. पाटील, एस. एस. चौधरी, डी. एस. थोरात, के. बी. यांनी सहभाग घेतला. गोवा ट्रेनिंग कॅंपमध्ये एलटी एस. एम. रडे, सोल. भावसार जे. जे, भार्गव ए. वो; कोल्हे एस. वाय; पाटील एम. डी. सोनवणे, डी. बी. महाजन, एस. ए. यांनी सहभाग घेतला. अॅग्रिकल्चर बामस परभणी येथे कॅंपमध्ये यूवो डी. आर. पाटील, आर. एस. भाटिया तर एम. डी. पाटील, डी. आर. पाटील, व्ही. जी. विसपुते, कुळकर्णी यांनी जळगाव ते पैठण असा सायकल प्रवास केला. CATC कॅंपमध्ये 2/LT. भालसिंग आर. आर. व यूनो राजेंद्र चौधरी यांनी सहभाग घेतला. R. D. Parde दिल्ली येथे होणाऱ्या परेडसाठी युवो राजेंद्र चौधरी यांची निवड झाली.



१५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनी प्राचार्य नेमाडे यांच्या हस्ते ध्वजारोहण समारंभ पार पडला.

अमरावती येथे झालेल्या प्रशिक्षण शिबिरात वेगवेगळ्या स्पर्धांमध्ये विद्यार्थिनींनी मोठ्या उत्साहाने भाग घेऊन आपले नैपुण्य दाखविले. या वर्षी सुद्धा ड्रीलमध्ये पहिल्या क्रमांकाचे बक्षीस मिळवले. तसेच मेडिकल सांस्कृतीक कार्यक्रम या स्पर्धांमध्ये L/C स्वप्ना रंगलानी. Sgt. स्वाती कुलकर्णी, CPL वैशाली सराफ या विद्यार्थिनींनी आपली चुणूक दाखविली.

शांतीनिकेतन येथे झालेल्या बेसिक लीडरशीप कॅंपमध्ये स्वाती कुळकर्णी, उज्ज्वला कोतवाल, माधुरी जावळे व छाया पाटील या विद्यार्थिनींनी यशस्वीपणे कार्य करुन विविध अनुभव संपादन केले.

२६ जानेवारी १९८७ रोजी प्राचार्य नेमाडे यांनी ध्वजारोहण करुन एन. सी. सी. कॅडेट्सकडून मानवंदना स्विकारली. परेडचे संचालन S/Uo जितेंद्र भावसार याने केले तर २६ जानेवारीला पोलीस ग्राउंड परेड संचालनाचे नेतृत्व U/o संजय भार्गव व Sgt. उज्ज्वला कोतवाल यांनी केले. प्राचार्यांच्या हस्ते खालील विद्यार्थ्यांना मेडल्स दिलेत. Best S/Uo जितेंद्र भावसार, बेस्ट कॅडेट अजय ठाकूर, बेस्ट रॅंक होल्डर सिताराम खटोड, मॅपरिडिंग एम. एल. डोंगरे, फर्स्ट इन फायरिंग पी. टी. ओसारी, फर्स्ट इन क्रास कंट्री दिलीप पवार.



विद्यार्थिनींमध्ये विशेष प्राविण्य मिळविण्याऱ्या खालील विद्यार्थीनींना प्राचार्यांच्या हस्ते मेडल्स देण्यात आलीत. शोभा मेहंदळे, उज्ज्वला कोतवाल, स्वाती कुळकर्णी, अश्वीनी अभ्यंकर, व कावरा. या वर्षीही ‘ B ’ Cert परीक्षेचा निकाल दरवर्षी प्रमाणे १०० % लागला. व ‘ C ’ Cert चा पण चांगला लागला.

महाविद्यालयात पुढील मान्यवर व्यक्तींनी भेटी देऊन एन. सी. सी. च्या विद्यार्थ्यांचा विविध उपक्रमात असलेला सहभाग पाहून व एकून कामकाजाबद्दल आनंद व्यक्त केला. १) ग्रुप कमांडर कर्नल सतनामसिंग २) असिस्टंट डायरेक्टर एन. सी. सी. उन्नी कृष्णन ३) एन. सी. सी. चे महाराष्ट्र डायरेक्टर ब्रिगेडियर – आय. जी. एस. बल यांनी भेटी दिल्या.

सर्व विभाग प्रमुख व सहकारी प्राध्यापक यांनी वेळोवेळी दिलेल्या सहकार्याबद्दल आभारी आहोत.

**सौ. मालती जावळे** — कॅप्टन
**एस. एम. रडे** — लेफ्टनंट
आर. आर. भालसिंग, सेकंड लेफ्टनंट
व सर्व अंडर आफिसर्स

❋ ❋ ❋

# भूगोल विभाग

**जायकवाडी शैक्षणिक सहल –**

दि. ११-१-८७ रोजी द्वितीय वर्ष विज्ञान भूगोल घेणाऱ्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल जायकवाडी येथे आयोजित केलेली होती. या सहलीस ५५ विद्यार्थी / विद्यार्थिनींनी भाग घेतला होता. सहलीस प्रा. बी. एम. पाटील,प्रा. एस. आर. पाटोल, प्रा. आर. आर. भालसिंग व मिसेस सुनंदा चौधरी यांनी मार्गदर्शन केलेले आहे.

**सम्मेलने, चर्चा-सत्र इ. –**

दि. १४ ते १७ आक्टोबर १९८७ या काळात 'महाराष्ट्र भूगोल शास्त्र परिषद' या संस्थेतर्फे नागपूर येथे चर्चा-सत्र आयोजित केलेले होते. या सत्रासाठी भूगोल विभागातील प्रा. अे. पी. चौधरी प्रा. मिस् व्ही. जी. तळेले व प्रा. (मिसेस) एस. अे. चौधरी ह्या प्राध्यापकांनी चर्चा सत्रात भाग घेतलेला होता.

दि. २१ सप्टेंबर १९८७ रोजी मू. जे. महाविद्यालयात पुणे विद्यापीठ, पर्यावरण शास्त्र विभागातर्फे आयोजित एक शिबिर आयोजित केलेल होते. जिल्ह्यातील ३० ते ४० भूगोल विषय शिकविणारे प्राध्यापक या कार्यक्रमास हजर होते. डॉ. प्र. र. करमरकर व डॉ. एस. सी. गुप्ते या शिबिरासाठी मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते.

दि. २० ते २३ फेब्रुवारी १९८७ रोजी मुंबई विद्यापीठात The Institute of Indian Geographers तर्फे आयोजित चर्चा सत्रात डॉ. अे. स. भोळे, प्रा. आर. आर. भालसिंग व प्रा. एस. आर. पाटील सहभागी झालेले होते.



Dr. A. S. Bhole Department of Geography M. J. Colloge has submitted research project to ICSSR, entiled 'Socio economic development of tribals in Jalgaon District; A Geographical perspective.'

ICSR has sanctioned fincial assistance for this project.

**प्रा. स. दि. सिरसीकर**
प्रमुख, भूगोल विभाग

# मानसशास्त्र विभाग

मानसशास्त्र हा विषय आपल्या महाविद्यालयात ११ वी पासून तर तृतीय वर्षापर्यंत शिकविला जातो. शिवाय गेल्या २ वर्षापासून विशेष मानसशास्त्राचीही सुरूवात करण्यात आली. विशेष मानसशास्त्रासाठी अत्यावश्यक असणारे प्रात्यक्षिक साहित्यही उपलब्ध करण्यात आले. याशिवाय वेगवेगळ्या चांचण्या व कसोटयाचीही उपलब्धता करण्यात आली आहे. अशाप्रकारे सर्व सोयींनी युक्त अशी मानसशास्त्रीय प्रयोग शाळा कार्यरत झाली. तसेच विद्यार्थ्यांनीही मानसशास्त्र विषयात उत्तम प्रतिसाद दिला. सत्र ३ व ४ मध्ये महाविद्यालयीन गुणवत्ता यादीत मानसशास्त्र विभागाची कु. ज्योती कुळकर्णी प्रथम क्रमांक, कु. आरती [illegible] द्वितीय क्रमांक, जयप्रकाश चौबे चतुर्थ क्रमांकाने उत्तीर्ण झाले. कु. ज्योती कुळकर्णीस इतर सवलती मिळत असल्यामुळे महाविद्यालयीन शिष्यवृत्ती ऐवजी महाविद्यालयाने प्रशस्तीपत्रक दिले व कु. आरती [illegible] व जयप्रकाश चौबे यांना महाविद्यालयीन शिष्यवृत्ती मिळाली. तसेच सत्र ५ मध्ये त्यांनी चांगलेच नेत्र-दीपक यश मिळविले व इतर विद्यार्थ्यांनीही उत्कृष्ठ प्रतिसाद दिला. मानसशास्त्र विभागातील कु. अनिता उजागरे हीस प्रथम वर्ष (कला) यात प्रथम क्रमांक आल्याबद्दल महाविद्यालयीन शिष्यवृत्ती (रु. १५०) मिळाली.



विद्यार्थ्यांच्या दृष्टीने मानसशास्त्र विषय किती महत्त्वपूर्ण आहे व मानसशास्त्राचा कोणत्या, कोणत्या क्षेत्रात खरोखर उपयोग होतो याबद्दलचे मार्गदर्शनपर व्याख्यान डॉ. सु. वा. देशपांडे, पुणे विद्यापीठ यांनी दिले.

या वर्षी तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या आगमनाचे स्वागत केले. तसेच तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी भावपूर्ण निरोप दिला. या दोन्ही कार्यक्रमास माननीय प्राचार्य उपस्थित होते. प्राचार्यांचे मार्गदर्शनामुळे व सहकार्यामुळे मानसशास्त्र विभागाचे कार्य यशस्वीरित्या पूर्ण झाले.

**प्रा. एस. एस. राणे**
विभाग प्रमुख
मानसशास्त्र विभाग

✲ ✲ ✲

# वसतिगृह

१९८६-८७ या वर्षी विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या वसतिगृहात अनेक सुधारणा करण्यात आल्या. विशेष म्हणजे याच वर्षी मुलींचे नवीन वसतिगृह कॉलेज आवारात सुरु करण्यात आले असून त्या वसतिगृहात अत्याधुनिक सोई करण्यात आलेल्या आहेत.

विद्यार्थ्यांना आपल्या जीवनात वेगवेगळ्या गोष्टी शिकता याव्या, त्यांना चांगले मार्गदर्शन लाभून त्यांनी स्वयंस्फूर्तीने कार्य करावे यासाठी वसतिगृहात अनेक कार्यक्रम आयोजित केले गेले. १५ ऑगष्टच्या शुभ मुहूर्तावर विद्यार्थी सांस्कृतिक मंडळाची स्थापना आकाशवाणी कलावंत श्री. भैय्या उपासनी यांच्या हस्ते झाली. त्या दिवशी त्यांनी 'माझ्या गावच्या रीति भाती' ही बहारदार कथा व शानदार कविता सादर करून विद्यार्थ्यांची मने प्रफुल्लित केली. विद्यार्थिनींसाठी डॉ. सौ. वानखेडे यांचे 'स्त्री जीवन व त्यांचे विविध प्रश्न' या विषयावर मार्मिक व उद्‌बोधक भाषण झाले. तसेच विद्यार्थिनींच्या शंकांचे त्यांनी समाधान केले.

विद्यार्थी सांस्कृतिक मंडळातर्फे 'विकास' नावाचे भित्तीपत्रक सुरु केले. विकासचे संपादक श्री. नरेंद्र तोरवणे व श्री. शशिकांत मगरे यांनी रेक्टर श्री. चौधरी यांच्या कुशल मार्गदर्शनाचा लाभ घेऊन चार अंक चांगल्या प्रकारे काढून विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर टाकली, भित्ती पत्रकाचे उद्‌घाटन आकाशवाणी जळगाव केंद्राचे युवावाणी प्रमुख श्री. गोपाळ आवटी यांनी केले. त्या वेळी त्यांनी विद्यार्थ्यांच्या या कार्याची प्रशंसा केली. त्यांच्याबरोबर उपस्थित असलेले उपजिल्हाधिकारी श्री. श्याम देशपांडे यांनी वसतिगृहाबद्दल आदर्श संयोजन; आदर्श वसतिगृह व आदर्श परिसर हे प्रशंसोद्गार काढून स्पर्धात्मक परीक्षांबद्दल मार्गदर्शन केले.

प्रजासत्ताक दिनी श्री. व सौ. कांबळे यांचे बहारदार काव्य वाचन झाले. वसतिगृहातील विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच अनेक स्पर्धांमध्ये आपली चुणूक दाखविली. त्यात प्रामुख्याने शशिकांत मगरे, संदीप भिसे व नरेंद्र तोरवणे यांनी विविध स्पर्धांमध्ये पारितोषिके मिळवून वसतिगृहाचा लौकिक वाढविला. वसतिगृहाच्या व महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी 'निरंजन मला उत्तर हवय !' व 'डॉक्टर आणि

वैद्य ' हृया एकांकिका धुळे, मनमाड व कोपरगाव येथे सादर करून आपले कौशल्य दाखविले. सांस्कृतिक कार्यक्रमाचा समारोप श्री. भैया उपासनी यांच्या हस्ते झाला. त्यावेळी त्यांनी व प्रा. शरद छापेकर यांनी विद्यार्थ्यांच्या कार्याचा गौरव केला.

विकास भित्तीपत्रकाच्या साहित्य गंगेची इतिश्री दि. २०–२–८७ रोजी होऊन पुढील वर्षासाठी दुसरे संपादक मंडळही नेमण्यात आले. दर वर्षाप्रमाणे या वर्षी सुद्धा मेसमधील कर्मचाऱ्यांना विद्यार्थी–विद्यार्थिनींकडून ज्या भेट वस्तु देण्यात आल्या त्यांचे वाटप प्राचार्य श्री. डी. एस. नेमाडे यांच्या शुभहस्ते झाले. गरीब, हुषार व होतकरू विद्यार्थ्यांसाठी ' कमवा व शिका ' ही योजना आहे. त्याचा लाभ अनेक विद्यार्थी घेतात. दर वर्षाप्रमाणे याही वर्षी सहभोजन व ट्रीप यासारखे कार्यक्रम मोठ्या खेळीमेळीने व आनंदाने पार पडले.

म. अध्यक्ष व म. चेअरमन, खानदेश कॉलेज एज्युकेशन सोसायटी यांनी वसतिगृहाकडे अधिक लक्ष देऊन नवीन सुधारणा करण्याचे मान्य केले आहे. त्यांच्या वेळोवेळी मिळालेल्या सहकार्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. वसतिगृहातील विविध कार्यक्रमांना प्राचार्य नेमाडे जातीने हजर राहून मार्गदर्शन व सहकार्य करीत गेले त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. तसेच उपप्राचार्य डी. एच. महाजन, उपप्राचार्य एम्. के. येवले व इतर प्राध्यापकही कार्यक्रमांना उपस्थित राहून त्यांनी वेळोवेळी मार्गदर्शन व सहकार्य केले याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. कार्यक्रमांची चोख व्यवस्था ठेवण्याचे काम प्रा. एस्. एस्. राणे, प्रा. आर्. बी. चौधरी, प्रा. कु. तळेले, मेस मॅनेजर श्री. कोपरकर यांनी केले. या सर्वांच्या सहकार्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

| | |
|---|---|
| **प्रा. ए. पी. चौधरी** | **प्रा. सौ. मालती जावळे** |
| रेक्टर | रेक्टर |
| विद्यार्थी वसतिगृह | विद्यार्थिनी वसतिगृह |

✽ ✽ ✽



# कर्मचारी सेवा प्रतिष्ठान

१९४५ साली ८-१० कर्मचारी वर्गाने सु[...] झालेल्या ' मुळजी जेठा महाविद्यालया ' चे [...] एका मोठ्या प्रौढ आणि प्रगल्भ अशा संस्थेत रूपांत[र] झालेले आहे. या महाविद्यालयात आज जवळ जव[ळ] २५० ( शिक्षक, शिक्षकेतर ) कर्मचारी आहे[त]. कर्मचारी वर्गाला अनेकदा कौटुंबिक अडच[णी] येतात. काहींना नैसर्गिक संकटांना तों[ड] द्यावे लागते. तेव्हा संकट काळात मदत व्हावी [...] हेतूने प्रेरित होऊन वरील कर्मचारी वर्गाने ' मुळजी जेठा महाविद्यालयाचे कर्मचारी सेवा प्रतिष्ठान, जळगाव ही संस्था यावर्षी सुरू केलेली आहे. वरी[ल] संस्था कर्मचाऱ्यांकडून अल्पशी ठेव घेवून सुरू करण्यात आलेली आहे. संस्थेची रीतसर नोंदणी सहाय्यक धर्मदाय आयुक्त, जळगाव विभाग यांचेकडे झालेली आहे.

एखाद्या कर्मचाऱ्यास सेवाकाळात मृत्यू आल्यास किंवा दीर्घकालीन आजाराने ग्रस्त असल्यास वरील संस्था त्या कर्मचाऱ्यास तावडतोब आर्थिक मदत कर[ते]. यासाठी कुठलेही अर्ज किंवा फॉर्म भरण्याची आव[श्‍]यकता नाही. ही मदत त्यास कायम स्वरूपी देण्यात येते. दुर्दैवाने मे १९८६ मध्ये ग्रंथालयात काम करणारे कर्मचारी एम्. ए. पटवारी यांचे अपघाती निधन झाले. संस्थेने त्यांच्या कुटुंबियांना हे वृत्त कळताच तावडतोब आर्थिक मदत दिलेली आहे. तसेच प्रा. एम्. एल्. पाटील यांचा १९८६ मध्ये [...] दुर्दैवी मृत्यू झाला. प्रा. एम् एल्. पाटील जरी [...] संस्थेचे सभासद नव्हते तरी संस्थेने त्यांच्या कुटुंबि[यां]ना आर्थिक मदत केलेली आहे.

**समूहबचत विमा योजना –**

' आयुर्विमा महामंडळ ने ' सुरू केलेली समूह बचत विमा योजना या वर्षीच मुळजी जेठा महाविद्यालय कर्मचारी वर्गाने स्विकारलेली आहे. ही योजना पूर्वी फक्त सैन्यातील अधिकारी वर्गा[...] साठीच होती. पण नवीन शासकीय धोरणानुसार आता ती निमसरकारी कार्यालयातील कर्मचाऱ्यांसाठी सुद्धा लागू आहे. आपल्या महाविद्यालयातील १६० कर्मचाऱ्यांनी ही योजना स्विकारलेली आहे. नाशिक विभागात ( धुळे, जळगाव, नाशिक, नगर ) मु. जे. महाविद्यालय हे ही योजना स्विकारणारे पहिलेच महाविद्यालय होय.

**प्रा. आर. जी. खारुल**

✽ ✽ ✽

# साहित्य मंडळ

१९८६–८७ या वर्षासाठी खालील प्रमाणे ' साहित्य मंडळ कार्यकारिणी ' ची निवड करण्यात आली.

| | |
|---|---|
| प्रा. डॉ. सौ. प्रमिला भिरूड | चेअरमन |
| प्रा. टी. आर्. चिरमाडे | सभासद |
| प्रा. एस्. आर्. याज्ञिक | " |
| प्रा. पी. एम्. कोठारी | " |
| प्रा. सौ. एम्. एम्. जावळे | " |
| प्रा. सौ. सुरेखा गोखले | " |
| प्रा. सौ. उषा सावंत | " |

या वर्षीच्या साहित्य मंडळाच्या कार्यक्रमाचा शुभारंभ मंडळाच्या उद्घाटन समारंभाने झाला. साहित्य मंडळाचे उद्घाटन मा. प्राचार्य डी. एस्. नेमाडे यांनी केले. आपल्या उद्घाटनपर भाषणात प्राचार्यांनी साहित्य मंडळाचे ध्येय व धोरण यासंबंधी उद्बोधक विचार मांडले. तसेच याच प्रसंगी थोर हिंदी साहित्यिक मैथिलीचरण गुप्त यांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने ' महाकाव्य साकेत ' या विषयावर प्रा. डॉ. तेजपाल चौधरी यांचे अभ्यासपूर्ण भाषण झाले.

साहित्य मंडळाच्या वतीने या वर्षी कथाकथन स्पर्धा व काव्य वाचन स्पर्धा घेण्यात आल्या. कथाकथान स्पर्धेत नरेंद्र तोरवणे यांना प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले तर नरेंद्र नेरकर यांना द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

काव्य वाचन स्पर्धेत कु. संगीता भागवत हीस प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. तर द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक जयप्रकाश चौबे आणि नरेंद्र तोरवणे यांना विभागून देण्यात आले.

पारितोषिक वितरण समारंभ उपप्राचार्य डी. एच्. महाजन यांच्या शुभ हस्ते संपन्न झाला.

या कार्यक्रमासाठी मा. प्राचार्य डी. एस्. नेमाडे उपप्राचार्य डी. एच्. महाजन, उपप्राचार्य एम्. के. येवले यांनी केलेल्या योग्य मार्गदर्शनाबद्दल त्यांचे आभारी आहोत. प्रा. पी. एम्. हुपरीकर, प्रा. एस्. आर्. याज्ञिक, प्रा. डॉ. तेजपाल चौधरी, प्रा. ए. बी. पाटील, प्रा. एस्. एम्. छापेकर यांनी केलेल्या अमूल्य सहकार्याबद्दलही मंडळ त्यांचे आभारी आहे. तसेच शिक्षकेतर वर्गाने जे सहकार्य केले त्याबद्दलही आभार !

**प्रा. डॉ. सौ. प्रमिला भिरूड**
चेअरमन

✽ ✽

# ग्रंथालय

सुसज्य आणि अद्ययावत ग्रंथालय हेच खऱ्या अर्थाने ज्ञान मंदीर होय. आदर्श शिक्षण संस्थेला अशा समृद्ध ग्रंथालयाचा अभिमान असतो. असे ग्रंथालय आमच्या महाविद्यालयाला लाभलेले आहे हे आम्हास एक भूषण आहे, दर वर्षाप्रमाणे १९८६–८७ या वर्षात विविध विषयावरील एकूण २५०१ ग्रंथ खरेदी केले. विद्यापीठ मंडळाकडून मिळालेली यू. जी. सी. ग्रँट आणि बेसिक ग्रँट या योजनांतर्गत ही

खरेदी करण्यात आली. त्यामुळे आधिच्याच विपुल समृद्ध ग्रंथसंभारात आणखी मोलाची भर पडली. आज मितीला ग्रंथालयातील ग्रंथसंख्या ८३८८५ झालेली अ हे.

नेहमी प्रमाणे ग्रंथालयातील अभ्यासिका सकाळी ७–३० ते संध्याकाळी ५ पर्यंत व संध्याकाळी ७ ते रात्री १० पर्यंत अशी सतत उघडी असते. वसतिगृहातील व महाविद्यालयाच्या परिसरात राहणाऱ्या बहुसंख्य विद्यार्थ्यांना या अभ्यासिकेचा लाभ होत असतो.

१) पुस्तक पेढी योजनेतून जवळ जवळ २१६ विद्यार्थ्यांना पुस्तके देण्यात आली.

२) एस्. वाय्. बी. ए. व टी. वाय्. बी. ए. मराठी स्पेशल आणि संस्कृत स्पेशल घेणाऱ्या विद्यार्थ्यांना वर्षभर अभ्यास करण्यासाठी पुस्तके देण्यात आली.

३) विद्यार्थ्यांना अभ्यासास उपयुक्त अशी नियतकालिके अभ्यासिकेत ठेवण्यात येतात.

४) ज्युनिअर कॉलेज मधील विद्यार्थ्यांना अवांतर वाचनाची गोडी लागावी म्हणून अक्षरमेवा योजना कार्यान्वित केली. मराठीतील श्रेष्ठ व जेष्ठ लेखकांचे उत्तोत्तम ग्रंथ विद्यार्थ्यांना वाचता यावे यासाठी अभ्यासिकेत ठेवण्यात आले.

वरील योजनांप्रमाणे विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरतील अशा विविध योजना वेळोवेळी विद्यार्थी, प्राध्यापक यांच्या सहकार्याने राबविता येतात. ग्रंथाप्रमाणेच विविध विषयांच्या अभ्यासासाठी संदर्भ म्हणून नियतकालिकेही मागविली जातात.

ग्रंथालयाचे कामकाज सुविहीतपणे वर्षभर चालू असते. या कामी सर्वांचा चांगला प्रतिसाद व सहकार्य मिळत असते. प्राचार्य डी. एस्. नेमाडे, उपप्राचार्य डी. एच्. महाजन, उपप्राचार्य एम्. के. येवले, लायब्ररी इनचार्ज डॉ. प्रा. एस. आर्. चिरमाडे, ग्रंथालय समितील सदस्य, प्राध्यापक वर्ग, विद्यार्थी वर्ग व ग्रंथालयातील कर्मचारी वर्ग या सर्वांचे मनःपूर्वक सहकार्य लाभले त्याबद्दल त्यांचे हार्दिक आभार.

**पी. डी. बऱ्हाटे**
ग्रंथपाल





# ENDOWMENT & PRIZES 1986-87

| | |
|---|---|
| 1) Kher Gambhirmal Prize for the Best student in the college ( 1986—87 ) | Miss Sathe Vinaya Laxman T. Y. B. Com.<br>Shri Chhapariband Jayraj Ramdas T. Y. B. A.<br>( equally divided ) |
| 2) P. V. Ratnaparkhi Prize for standing first at the F. Y. B. A. & F. Y. B. Sc. Sem. Examination, 1986. | Miss Patwe Naina Subhashchandra |
| 3) Dr. K. V. Paradkar prize for the student who stands first at the XII Sc. Exam, 1986 in Biology. | Miss Chaudhari Manisha Janardan |
| 4) D. U. Wani prize for obtaining highest number of marks in Mathematics at the XII Sc. Exam. 1986. | Jadhav Prashant Bhimrao |
| 5) D. R. Nadkarni Science prize for the student who stands first at the XII Sc. 1986. | Jadhav Prashant Bhimrao |
| 6) Tapiram Bhagwan Chaudhari and Ramabai Chaudhari ( Thorgavan ) prize for—<br>a) The student who stands first in XII Sc. 1986 | Jadhav Prashant Bhimrao |
| 7) V. V. Gandhe and Satyabhama Gandhe prize for the student for obtaining highest number of marks in Marathi ( Spl. ) at. T. Y. B. A. Exam. 1986 | Miss Bhagwat Sangita Prabhakar |
| 8) Prof M. N. Advant Endowment prize for the student for obtaining highest no. of marks in Marathi ( Spl. ) at the T. Y. B. A. Exam. 1986 | Miss Bhagwat Sangita Prabhakar |

9) Narmadabai Navalram Patil prize for the student for obtaining highest number of marks in Marathi ( Spl. ) at the T. Y. B. A. Exam. 1986 — Miss Bhagwat Sangita Prabhakar

10) Barjibhe Endowment prize for obtaining highest no of marks in English at XII Arts Exam. 1986 — Miss Soman Sandhya Dattatraya

11) Mrs. Shantabai Patil ( Hyderabad ) Scholarship to be awarded to the student obtaining highest no. of marks in H. S. C. Exam. in Arts & joining this College in F.Y.B.A.Class. — Miss Bahekar Sunita Atmaram

12) Mrs. Leela Mahadeo Advant prize to be awarded to the student obtaining highest no. of marks in H. S. C. XII Exam. in Arts, 1986 — Miss Bahekar Sunita Atmaram

13) Mrs. Shantabai Patil ( Hyderabad ) Scholarship to be awarded to the student 'obtaining highest marks in S. S. C. ( xth ) & joining this College in XI th Arts Class — Miss Pawar Bharati Bhalchandra

14) Mrs. Shantabai Patil ( Hyderabad ) Scholarship to be awarded to the student obtaining highest no. of mark in H. S. C. ( XII ) in commerce & joining this College in F. Y. B. Com. Class — Miss Lahoti Pushpa Poranchand

15) Patil-Potnis prize for student in any class from XII to Post-graduate with 'good character', good academic record ( desirable but not essential ) working in College Mess for self-help & continuing his College Education. — Gawai Vasant Jagdeo

16) Vimal father Bhoju Chaudhari prize for lady student obtaining highest no of marks in Chemistry Principal, at T. Y. B. Sc. — Miss Tiwari Sunita Rameshchandra

17) Mrs. Shantabai Patil ( Hyderabad ) Scholarship to be awarded to the student obtaining highest no of marks in ( H. S. C. XII ) in Science & joining this College in F. Y. B. Sc Class — Bendale Anil Meghashyam

18) Prof. A. G. Chiplunkar prize for obtaining highest no. of marks in English ( Spl. ) at the T. Y. B. A. Exam. & joining this College for M. A. offering English as spl. Subject — More Deelip Nawalsing

19) Mrs. Shantabai Patil ( Hyderabad ) Scholarship to be awarded to the student obtaining highest no. of marks in S. S. C. ( X th ) & joining this College in XI th Science Class. — Kolhe Sanjay Vasant

20) Mrs. Shantabai Patil ( Hyderabad ) Scholarship to be awarded to the student obtaining highest no. of marks in S. S. C. ( Xth ) & joining this College in XI Commerce. — Miss Bheda Leena Khimji

21) Mahadeo Kashinath Thatte prize to be awarded to student obtaining highest no. of marks in Chemistry Principal at T. Y. B. Sc. without any backlog — Chaudhari Rajendra Ramdas

22) Tapiram Bhagwan Chaudhari and Ramabai Chaudhari ( Thorgavan ) prize for standing first amongst lady student in XII Arts. Exam. 1986 — Miss Bahekar Sunita Atmaram

23) Mrs. Shantabai Patil ( Hyderabad ) Scholarship to be awarded to the student standing first at the T. Y. B. Com. Exam. 1986 — Miss Mahajan Mandakini Keshav

24) Manubai Desai prize for the student from Khandesh who has highest no. of marks at the Xth Exam. amongst those joining this College. — Kolhe Sanjay Vasant

25) Lata Baburao Lale prize to be awarded to student obtaining highest no. of marks in English compulsory at the B. A. final degree Exam. April, 1986 — Miss Patil Sunanda Baliram

26) Mrs. Leela Mahadeo Advant prize to be awarded to the student obtaining highest no. of marks in F. Y. B. A. Exam. April, 1986. — Miss Uzagare Anita Prasannakumar


मे. विजय मेडीकल्स जळगाव
डॉ. अनिल आचार्य हॉस्पिटल समोर
दुकान : ५२३३
घर : ५९३३

मे. राहुल मेडीकल्स
२, रजनीगंधा, शॉपिंग सेंटर,
माहेश्वरी वोर्डींग समोर
जळगाव.

– मे. एस. पी. फार्मास्युटीकल्स –
२१, माऊली, गुरुकुल कॉलनी, जळगाव. ५९३३

राहण्याची उत्तम व्यवस्था

☆ मसाला डोसा
☆ वडा सांभार
☆ सर्व प्रकारची थंड पेये
☆ शुद्ध शाकाहारी स्वादिष्ट जेवण

: हॉटेल वृंदावन :
नव्या एस. टी. स्टॅण्डजवळ,
जळगाव – ४२५ ००१

ऑफिसकरिता व घराकरिता लागणारे
सर्व प्रकारचे फर्निचर
तसेच
डायनोरा, ओनिडा, क्राऊन टी. व्ही.
रेडिओ व टेप याकरिता →

– शिल्पा ट्रेडर्स –
दुकान नं. ५२, ५३
खान्देश मिल्स शॉपिंग कॉम्प्लेक्स,
जळगाव – ४२५ ००१
फोन नं. ३१९४


# अजिंठा संपादक मंडळ १९८६/८७



प्रा. सौ. प्रमिला दातार, प्रा. श्री. र. याज्ञिक, प्रा. राजा महाजन, उप प्राचार्य मु. के. येवले, प्राचार्य द. स. नेमाडे, प्रा. अरविंद पाटील, प्रा. श. मु. छापेकर

कु. विनिता महाजन, प्रा. ना. द. पाटील, हे. सो. पाटील, प्रा. अकबर रहेमानी, प्रा. शा. न. पाटील, वि. ह. पाटील